साप्ताहिक
माणूस
२३ मे ८४ / २ रुपये




# आर्थर कोएस्लर-

## कम्युनिझम ते परामानसशास्त्र

साप्ताहिक

**माणूस**

वर्ष : तेविसावे

अंक : एक्कावन्नावा

१९ मे १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :


साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

संजय पवार



# मुंबापुरी

## पांगुळगाडा

आदिक प्रकरणाची किक् अद्याप शमली नाहीये. रामारावांच्या दैदीप्यमान चाळचांना 'चियर्स' म्हणून बढावा देणाऱ्या चौदा मंत्र्यांना काढून टाकायला वसंतदादा पाटील कसे अगदी उतावीळ झाले आहेत. पहा, पहा कसे विंगेत परसू परजीत उभे आहेत (काठी घेऊन हं!)

पण वसंतदादांना हे सगळं इतक्या सहजासहजी शक्य होणार नाही. त्या चांदोबातल्या गोष्टीत दाखवतात तसं दादांची अख्खी प्राणशक्त. तिथे दिल्लीत गोठली आहे. तेव्हा दादा कितीही बेत आखोत, पक्षश्रेष्ठी जोवर सुहास्य वदनाने वरदान देत नाहीत तोवर दादांना 'त्या' चौदा मंत्र्यांपैकी एकाचंही वस्त्रहरण करता येणार नाही. त्यात पुन्हा चंद्रकांत त्रिपाठी दिल्लीश्वरांकडून कसलं तरी मंतरलेलं पाणी आणण्याच्या खटपटीत गुंतलेयत त्यामुळं दादा सांप्रत शिळावत झाले आहेत यालाच वर्तमानपत्रवाले—'दादा आजारी आहेत' असं म्हणतात.

आम्हाला वाटलं होतं की, दादांनी महाराष्ट्राचा गोवर्धन व्यवस्थित पेलून धरल्यामुळे पक्षश्रेष्ठी किमानपक्षी त्यांना मुख्यमंत्र्याचा साधा 'प्रिरॉगटिव्ह' तरी बहाल करतील; पण उफ्...

पक्षश्रेष्ठींना दादा सध्या नावडते झाले आहेत. म्हणजे पूर्वीपास्नं दादांचं—पक्षश्रेष्ठींचं मेतकूट जमलं नव्हतंच; पण आता जरा ही नाराजी जास्तच तिखट झालीये असं वाटतं. पूर्वी दादा अखिल भारतीय कॉंग्रेस (आय)चे जनरल सेक्रेटरी असताना त्यांच्याशी त्यांच्याबरोबर प्रेमाने भाकरतुकडा मोडणारे विश्वनाथ प्रताप सिंग आणि कमलापती त्रिपाठी सुद्धा फिलहाल दादांवर नाराजसे दिसतायेत.

अर्थात यात विशेषसं नवल नाही. अल्लाची मर्जी खप्पा झाल्याने अंतुले तिथे अदालतमे मजबूर झाले आहेत, तर दुसरीकडे आदिकांचा वनवास सुरू झाला आहे. दोन्ही गोष्टी दादांच्या फेवरच्या. दादांनी एकदम वसंतोत्सव सुरू केला तर काय घ्या? म्हणून ही खास करडी नजर!

शेवटी दादांनी हताशपणे पत्रकारांसमोर तोंड उघडलंच. म्हणाले, या चौदा मंत्र्यांना काढण्यासंबंधी पक्षश्रेष्ठींनी कोणताच निर्णय अद्याप न घेतल्याने माझं सरकार पांगळं झालंय. आता बोला. तिकडे राजीव गांधी छातीठोकपणे सांगतायेत की सगळं कसं कुशल-मंगल चाललंय. आमचा आमच्या मुख्यमंत्र्यांवर जबरदस्त विश्वास आहे वगैरे वगैरे अन दादा म्हणतात सरकार अधू झालंय!

दादा, सरकार पांगळं झालंय म्हणून चिंतातुर अजिबात होऊ नका. पांगुळगाडा पक्षश्रेष्ठी देतील ना. त्यांचं कामच आहे हो ते. भक्कम गड्याला लुळं करून टाकायचं अन् आपल्याच पांगुळगाड्यावर त्याला खेळवायचं. आता आम्ही हे तुम्हाला नव्यानं का सांगायला हवं?

आधीच अंतुले-आदिक प्रकरणांनी पक्षाला चढलेली झिंग अद्याप उतरलेली नाहीयं. सगळ्यांनाच भोवळ आलीय. त्यात तुम्ही नि तुमचं सरकार पांगुळगाड्यावर. तेव्हा येत्या वर्षी हातात मतपेटी घेऊन 'दार उघड बया, दार उघड' चा खेळ कोण खेळणार?

## ज्ञानवंत अवलिया

मुंबईच्या भयाण, लुक्केबाज संस्कृतीशी सरळसरळ काडीमोड घेऊन आपल्या ज्ञान

व्रतात लीन असलेल्या काही मूठभर मुंबईकरात डॉ. अरुण टिकेकरांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

सर्वत्र झटपट ज्ञानाचे शॉर्टकट प्रयोग यशस्वी होत असताना टिकेकरांनी ज्ञानाच्या दशदिशा धुंडाळण्याचं चिरंतन व्रत घ्यावं, जीविताचं चिंतनशील कुतूहल जपून ठेवावं याचं हे थोर वाटतं. या ज्ञानव्रती अवलियाचा हा प्रवास जितका घनघोर वाटतो तितकाच तो आतबाहेरून उजळून काढणारा आहे, हे नि:संशय !

परवा डॉ. टिकेकरांच्या 'अ क्लॉयस्टर्स पेल : हिस्टरी ऑफ बॉंबे युनिवर्सिटी' या ग्रंथाचं राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन झालं· टिकेकरांनी या साक्षेपी ग्रंथात समग्र मुंबई विद्यापीठाचा समग्र इतिहास विणून काढला आहे. या विशाल ज्ञानडोहाचा तळ गाठायला डॉ. टिकेकरांइतका दर्दी दुसरा मिळणं विरळा !

गेली काही वर्षे नियमितपणे डॉ. टिकेकर मुंबई शहराच्या जडणघडणीचा वेध घेणारी 'बॉंबियाना' ही लेखमाला मुंबई महानगरपालिकेच्या 'सिविक जर्नल'मध्ये लिहून काढतायेत. ह्या लेखमालेने मुंबईच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांवर टिकेकरांनी उपकार करून ठेवले आहेत.

एक प्रखर व्यासंगी म्हणून डॉ. टिकेकरांचं मूल्यमापन करण्याची आमची पात्रता नाही; पण माणूस म्हणून टिकेकर थेट भिडून जातात. एकदम डायरेक्ट.

आपण स्वत:विषयी खूपसे फाजील गैरसमज करून ठेवले आहेत असं जेव्हा वाटेल तेव्हा एखाद्या ज्ञानवंत अवलियासमोर लीन व्हावं असं कन्फ्युशिअसने लिहून ठेवलंय. अस्मादिकांची शकलं उडवायला डॉ. टिकेकरांएवढा जालीम दुसरा कोणी नाही.

¤

हायकोर्टाला आता महिनाभराची सुट्टी लागल्याने अंतुल्यांना फार हायसे वाटले असेल. या आनंदाच्या भरात शेवटच्या दिवशी त्यांनी चक्क रामदास नायकांशी हस्तांदोलन केले. आता सुट्टीत होमवर्क करायला अंतुले मोकळे होतील.

मुंबापुरीच्या उकाड्याला कंटाळून राम जेठमलानी जर्मनीला गेलेत. त्यांचे सुपुत्र महेश जेठमलानी फ्रान्सला चालले आहेत. नायकांचे दुसरे वकील जयसिंगानी लंडनला चालले आहेत. आम्ही मात्र फ्लॉरा फाउंटनमध्ये अडकून पडलो आहोत. आम्ही अंतुल्यांना विचारले आता सुट्टीत ते कोठे बाहेर जाणार आहेत का ? तर ते म्हणाले 'For Antulay and his lawyers there is no holiday·'

— विष्णू जयदेव

## पुणे–नासिक रस्त्यावरचे

# पिंपरी बुद्रुक गाव आणि टेल्को कंपनी

महंमद नैसर्गी, चाकण

एक छोटंसच अगदी आडबाजूला वसलेलं गाव ! कुणी तरी 'क्ष' पाठीशी उभं रहातं आणि बघता-बघता दोन-एक वर्षांत खूप काही घडून जातं. दुरावलेली मनं जवळ येतात, एकमेकांच्या हातात हात घालून उभी रहातात आणि दशकानुदशके ओसाड पडलेल्या जमिनीत पिकं मोठ्या दिमाखाने माणसापेक्षाही ताठ अभिमानाने उभी रहातात. आनंदाने डोलू लागतात. तिथे पावसाचे थेंब पाण्याचे नसतात— आपुलकीचे, घामाचे असतात. दु:ख किंवा संकटही कुणा एकट्याचं नसतं. उभं गाव त्याला पाठीशी घालतं. जीवनाला आणि जगण्यालाही नवीन अर्थ प्राप्त होतो. स्वत:बरोबरच गावाचा उत्कर्ष साधायला, सहकार्याच्या पताका फडकवत प्रत्येकजण पुढे–पुढे धावत असतो. केवळ सुधारणेच्या घोषणा देणाऱ्या कुणा पुढाऱ्याची ही वांझ कल्पना नाही. ही आहे वास्तवता ! कुणीही, कधीही जाऊन उघड्या डोळ्यांनी पाहून घ्यावी, अशी सहकार्यातून उभी राहिलेली, अचंबित करणारी सुधारणा! फक्त दोन हजार लोकवस्ती असलेल्या या छोट्याशा गावाचं नाव आहे–पिंपरीबुद्रुक!

पुणे–नासिक रस्त्यावर चाकणपासून पाच किलोमीटर नासिकच्या दिशेने गेल्यावर रस्त्याच्या डाव्या बाजूला एक शासनाचा बोर्ड दिसतो. 'कोल्हापूर पद्धतीचा पाटबंधारा,' त्याच्याच समोरून एक कच्चा रस्ता आत जातो. या रस्त्याने आणखी पाच किलोमीटर खाच–खळग्यांतून पुढे गेल्यास, गावाच्या सुरुवातीलाच एक छोटीशी पण डोळ्यात भरणारी एकाकी वास्तु दिसते. ही वास्तु म्हणजे माजी सभापती वामनराव ठाकूर यांचे निवासस्थान. तिथून थोडं पुढं गेलं की, एक इवलासा बोर्ड आपलं लक्ष वेधून होतो— 'महात्मा फुले सामुदायिक कृषि सहकारी संस्था !' आणि हीच पिंपरीबुद्रुकची महत्त्वाची नोंद घेण्यासारखी संस्था. तेरा हरिजन कुटुंबानी एकत्र येऊन आपली एकूण पंचवीस-तीस एकर जमीन एकत्र करून ही संस्था स्थापन केलेली आहे; पण हे दोन वर्षांपूर्वीच कसं घडलं ? अचानक कुणी तरी त्यांच्यावर जादूची कांडी फिरविली का ? नाही. यामागे एक मोठी कंपनी व त्याच्या पदाधिकाऱ्यांचे तेवढ्याच आत्मीयतेने घेतलेले कष्टही कारणीभूत आहेत, कंपनीचे नाव आहे– टेल्को !

मोठ्या कंपन्यांनी अशी अविकसित गावं दत्तक घ्यावीत व त्यांचा सामाजिक विकास साधावा अशी शासनाची योजना आहे; परंतु ही योजना नव्हती तेव्हादेखील टाटा रिलीफ फंड काही सामाजिक बांधिलकी पाळतच होता. म्हणूनच टेल्को समाजविकास केन्द्रानेही ही योजना उचलून धरली; पण टेल्कोने पिंपरीबुद्रुक या गावाचीच निवड का केली? याच गावाचा विकास करावा असं त्यांना का वाटलं ? तडकाफडकी निर्णय घेऊन काही तरी करायचं म्हणून या गावाची त्यांनी निवड केलेली नाही. गावाच्या निवडीबाबत त्यांनी काही निकष काढले होते. उदाहरणार्थ— ज्या गावाची निवड केली जाईल, तिथला कुणीही माणूस कंपनीचा

कर्मचारी नसावा. खरोखर विकास करण्यास वाव असावा. गाव एकीचे असावे. त्यांना मदतीची आवश्यकता असावी. अशी काही धोरणं आखून जवळजवळ दीडशे गावांची पहाणी करून, टेल्कोने पिंपरी-बुद्रुक हे गाव निश्चित केलेले आहे. निवड झाल्यानंतर स्वतः डे. जनरल मॅनेजर श्री. मेहरुणकर-साहेब, समाज विकास केन्द्राचे सेक्रेटरी श्री. जयंत जोशी, श्री. पाराळकर व त्यांचे सहाय्यक श्री. दळवी यांनी वारंवार गावकऱ्यांशी संपर्क साधून १९७८ सालापासून काही योजना आखल्या आणि या परिश्रमातून गेल्या दोन वर्षांत त्यांनी उल्लेखनीय यश मिळवलं.

गावाचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने त्यांनी केवळ दलित वा हरिजनांवर आपलं लक्ष केन्द्रित न करता, संपूर्ण गावाचा विचार केलेला आहे. मुख्य म्हणजे आड-बाजूला असणाऱ्या, केवळ दोन हजार लोक-वस्ती असलेल्या इवल्याशा गावात, खूप मोठ्या प्रमाणात व्यापारी उलाढाल वा मोठी बाजारपेठ उभी करणं शक्यच नाही. तेव्हा शेती हाच मुख्य व्यवसाय त्यामुळे गावातली जास्तीत जास्त शेतीची जमीन पाण्याखाली कशी येईल, बागायतीच्या दृष्टीने या जमिनीचा वापर कसा करता येईल, या विचाराने महाराष्ट्र शासन व टेल्कोने मिळून जवळजवळ आठ लाख रुपये खर्च करून, कोल्हापूर पद्धतीचा पाट-बंधारा बांधला. या बंधाऱ्यासाठी एकूण ७,२४०० रुपये खर्च आला असून पैकी ३,१२०० रुपये खर्च केले आहेत. या बंधाऱ्याला एकूण तेहतीस मोऱ्या असून, त्यावर सहा सामुदायिक लिफ्ट चालतात. १९८० साली या पाटबंधाऱ्याचे काम पूर्ण झाले. शिवाय ८२-८३ मध्ये पाझर तलावाचेही काम पूर्ण झाले आहे. गावातल्या विहिरी, पाझर तलाव व पाटबंधारा यांचा विचार करता आता एकूण ७५% जमीन या पाण्याखाली आहे. गावात एकूण ८० विहिरी असून त्यावर ७५ इलेक्ट्रिकपंप व १५ ऑइलइंजिन्स आहेत. पाझरतलावा-साठी शासनानेदेखील चार ते साडेचार लाख रुपये खर्च केलेला आहे.

शेतीबाबत विचार करता हा संपूर्ण गावाचा आढावा झाला; परंतु या शेतकी सुधारणेचा विचार करताना 'महात्मा फुले सामुदायिक सहकारी कृषि संस्था' ही नुकतीच रजिस्टर झालेली संस्था कशी उदयास आली, एकदिलाने ही माणसं एकदोन वर्षांतच कशी नांदू लागली, ही बाबदेखील लक्षात घेण्यासारखी आहे. हरिजनांच्या या कृषिसंस्थेचे एकूण १३ सभासद आहेत. या तेरा कुटुंबांत मिळून २५ ते ३० एकर जमीन आहे. १९७२-७३ साली जिल्हा परिषदेने (जी. के. डब्ल्यू.) एक भली मोठी चाळीस फूट व्यासाची विहीर देखील बांधून दिलेली आहे. या विहिरीवर मोटर बसवून शेतात पाइपलाइनसुद्धा टाकून दिलेली आहे; पण प्रत्यक्षात गेल्या दहा वर्षांत या विहिरीचा कुणीही उपयोग करून घेतलां नव्हता आणि उपयोग करून घ्यायचा झाला तरी लाइट-बिल कुणी भरावयाचे या वादात त्यांनी चुकीच्या वापराने दोन वेळा मोटर जाळून ठेवली. त्यामुळे शेतीतून उत्पन्न वा पीक घेण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. त्यातून आपल्याच समाजातल्या एका माणसाला दुसऱ्याने पाण्यात पहाण्याची वृत्ती, ही आम्हा भारतीयांच्या दृष्टीने तशी काही नवीन बाब नाही. हाच किता तेही अगदी यथायोग्य गिरवत होते. एकाचे तोंड उत्तरेकडे तर दुसऱ्याचे दक्षिणेकडे. शेवटी १९७८ साली जेव्हा टेल्कोने हे गाव दत्तक घेतले तेव्हा-पासूनच या हरिजनबांधवांना संघटित करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला; पण सुरुवाती-सुरुवातीला त्यातील कुणीही एक दुसऱ्याला साधा निरोप द्यायलाही उत्सुक दिसत नव्हता. सहकारी तत्त्वावर त्यांची अशी एक चांगली संस्था निर्माण करता येईल, ही कल्पनाच त्यांच्या डोक्यात शिरत नव्हती. अनेक वेळा सांगूनही जेव्हा काहीच उपयोग होत नव्हता तेव्हा टेल्कोच्या संबंधित अधिकारीवर्गाने, प्रामुख्याने श्री. जयंत जोशी यांनी त्या सर्वांना मिरजेजवळ म्हैसाळ या गावी घरातलंच एखादं कार्य असावं तसं ओढून नेलं.

## म्हैसाळचा प्रभाव!

म्हैसाळ या गावी ही सहकारी संस्था असून १९६९ सालापासून ही संस्था कार्य करीत आहे. या संस्थेचे वीस सभासद आहेत आणि विशेष म्हणजे ही संस्था देखील मागासवर्गीयांनीच चालवलेली आहे. कौतुक करण्यासारखी गोष्ट म्हणजे आजतागायत ही संस्था उत्तम प्रकारे कार्य करीत आहे. श्री. जोशी यांनी पिंपरीबुद्रुकच्या लोकांना ही संस्था दाखवायला नेलं खरं; परंतु आपण सांगतोय म्हणून या संस्थेचे लोक आपल्याला काही तरीच सांगत आहेत अशी शंका पिंपरीकरांना वाटू नये म्हणून स्वतः मिरजेत थांबून फक्त त्यांनाच जोशींनी पुढं पाठवलं. त्यांचं कार्य पाहून मंडळी प्रभावित झाली आणि तिथून परत फिरतानाच टेल्कोचे संबंधित पदाधिकारी जे सांगतील ते आम्ही ऐकू असं स्टॅम्पपेपरवर त्यांनी लिहून दिलं आणि मग खऱ्या अर्थाने या कार्याला प्रारंभ झाला.

या योजनेचे महत्त्व त्यांच्या लक्षात येताच कंपनीने आपले धोरण त्यांना समजावून सांगितले. प्रत्यक्ष आम्ही तुमच्याकरता काहीच करणार नाही. तुमचा विकास हा तुम्हीच करून घ्यायचा आहे. आम्ही केवळ तुमच्या कार्यात तुम्हाला सहाय्य करणार आहोत. सुरुवातीलाच आम्ही अशी स्पष्ट कल्पना देऊन, त्यांना प्रथम त्यांची वस्ती स्वच्छ करायला लावली. पंचवीस एकर शेतात मुक्तपणे छातीएवढं वाढलेलं गवत काढायला लावलं आणि मग हवी ती साधनसामुग्री देऊन त्यांना आपल्या शेताची मशागत करायला लावली. संस्था स्थापन करून त्यांच्यातल्याच एकाला अध्यक्ष, सेक्रेटरी इत्यादी पदांवर नेमणूक केली. सुरुवातीला एखाद्या बँकेकडून त्यांना भांडवल मिळवून देण्याचा प्रयत्न केला; पण त्यांच्यावर पूर्वीचे कर्ज असून त्याची परत-फेड झाली नसल्याने कोणतीच बँक त्यांना कर्ज देण्यास तयार नव्हती. शेवटी टेल्कोने २०,००० रु. कर्जाऊ म्हणून दिले व याच पैशातून गतवर्षी प्रथमच त्यांनी ३६,००० चे उत्पन्न घेतले.

यापूर्वी देखील त्यांनी काही वेळा आपल्या शेताची मशागत करण्याचा प्रयत्न केला होता; परंतु त्यांच्याजवळ स्वतःचे असे बैल, शेतीची अवजारे नसल्याने या बाबतीत त्यांना गावकऱ्यांवरच अवलंबून रहावं लागत होतं आणि साधारणतः हंगाम सुरू झाला की, सामान्य शेतकऱ्याला स्वतःचीच कामं उरकत नसल्याने, या लोकांना त्यांची

मदत मिळेपर्यंत वेळ निघून गेलेली असायची. त्यातूनही मोठ्या आशेने ते कशी तरी पेरणी करायचे आणि आपले श्रम फक्त वाया घालवायचे; पण आज त्यांचे स्वतःचे सहा बैल आहेत. टेल्को समाजविकास केन्द्राने याहीबाबत थोडा विचार केला आणि त्यांना आणखी काही गुरे घेऊन दिली. त्यांच्या इंधनाचा प्रश्न सुटावा म्हणून कम्युनिटी बायोगॅस सुरू करून दिला आणि याच कल्पनेतून पुढे आली—

## स्वस्त संडासयोजना

या योजनेद्वारे तेरा कुटुंबांत मिळून एकूण सहा संडास बांधलेले आहेत आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रत्येक संडासासाठी त्यांना फक्त ५५० ते ६०० रु. खर्च आलेला आहे. यासाठी प्रामुख्याने नदीतील जाड वाळू आणून दहा घमेली वाळूत एक घमेलं सिमेंट मिक्स करून ६'×३'×३' अशा बॉक्समध्ये ते मिश्रण घट्ट दाबून भरले. दोन दिवस तो बॉक्स तसाच ठेवून दिला की त्या आकाराची एक घट्ट वीट तयार होते. त्यावर पुन्हा तोच बॉक्स ठेवून पुन्हा सिमेंट वाळूचे मिश्रण भरावयाचे. अशा पद्धतीने ९' इंच उंचीची भिंत बांधलेली आहे. वरती टाकण्यासाठी स्क्रॅपमधून पत्रा आणला आणि एका बाजूला उघडणारा साधा लाकडी दरवाजा रीतसर सुताराकडून करून घेतला. आता फक्त प्रश्न उरला तो पांढऱ्या शुभ्र कुंडीचा, पण श्री. मेहरुणकरसाहेबांना दोन–अडीचशे रुपये खर्च करून बाजारातून रेडीमेड कुंडी आणणे मान्य नव्हते. त्यासाठी त्यांनी टेल्कोमध्ये कुंडीच्या आकाराचा एक पॅटर्न बनवायला लावला आणि गावातल्या कुंभाराकडून साध्या मातीची कुंडी त्या पॅटर्नच्या साहाय्याने बनवून घेतली व त्यावर गुळगुळीत पांढरे रेक्झिन बसवून, कुणीही विश्वास ठेवणार नाही अशी सुरेख कुंडी तयार केली. या सहा संडासांवर प्रत्येकाच्या मालकीचे बोर्ड आहेत आणि या संडासाला गोबर गॅसचा प्लॅन्ट जोडलेला आहे. त्यातूनही शेणाचा तुटवडा भासू लागला तेव्हा पुन्हा एक युक्ती योजली. दुधाकरता म्हशी अथवा गाय घ्यावी तर त्यातून कोणताही वाद उपस्थित होऊ नये म्हणून चांगल्या जातीच्या गाभण असलेल्या चार म्हशी दहा हजारांत विकत घेतल्या. त्यामुळे शेणाचा प्रश्न मिटला आणि तीन-चार महिन्यांतच या म्हशी आता एकदम तयार झालेल्या आहेत आणि त्या व्यायला येतील तेव्हा त्या पुन्हा विकून टाकायचा त्यांचा विचार आहे. कारण त्या वेळी किमान वीस हजारात या म्हशी विकल्या जातील. पुन्हा अशाच म्हशी केवळ दहा हजारात घेता येतील. म्हणजेच दुधाचा व्याप न करता हा मार्ग जास्त सोयीचा आहे. या पद्धतीने त्यांचा मुख्य म्हणजे शेणाचा तर प्रश्न सुटलाच; शिवाय चार पैसेही मिळतील. या गोबरगॅसप्लँटमधून नऊ कुटुंबांना गॅस पुरवलेला आहे. प्रत्येकाला एकेक शेगडी देऊन त्यांचा इंधनाचा प्रश्न सोडवलेला आहे.

गावात इतरत्र फारसे संडास पहावयास मिळत नाहीत; परंतु या हरिजनवस्तीत एका ओळीत छान असे सहा संडास आहेत. याच वस्तीत एक बोअरवेल असून त्यावर मोटर बसवलेली आहे. उन्हाळ्यात नदीला पाणी नसतं त्यामुळे गावातले अनेक लोक या बोअरिंगचे पाणी वापरतात. इथे एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते की, गावाचा पाणवठा आता हरिजनवस्तीत आहे. याशिवाय त्यांच्या शेतात जिल्हा परिषदेने बांधून दिलेल्या विहिरीव्यतिरिक्त अन्य दोन पडक्या विहिरी होत्या. त्यांची पुन्हा खोदाई करून त्याही बांधून घेतलेल्या आहेत. त्यामुळे आता भरपूर पाण्याच्या त्यांच्या स्वतःच्या तीन विहिरी आहेत. त्यातल्या एका विहिरीला तर भरपूर पाणी आहे. या वर्षीचे खरीप उत्पन्न अंदाजे ५५ ते ६० हजारांचे झाले आहे. त्यांच्या शेतातून मिळणारे उत्पन्न म्हणजेच कांदा, बटाटा, गहू, कोथिंबीर इत्यादी भाजीपालाही बाजारभावाने स्वतः टेल्कोच त्यांच्या कॅन्टीनसाठी विकत घेते. त्यांच्या पिकासाठी त्यांना ही एक चांगलीच बाजारपेठ लाभलेली आहे. शेतात काम करणारी माणसं या तेरा कुटुंबियांपैकीच असल्याने त्यांनी रोजच्या कामाची मजुरीदेखील ठरवून घेतलेली आहे. पुरुषाला ७ रुपये, स्त्रीला ५ रुपये आणि केवळ मजुरीच्या रूपानेच त्यांना आजपर्यंत जवळजवळ ३५,००० रुपये मिळालेले आहेत. या कुटुंबांपैकी बरीचशी तरुण मंडळी मुंबईला वेगवेगळ्या ठिकाणी कामाला आहेत. आता त्यांचेही लक्ष शेतीकडे व कृषि–संस्थेकडे लागलेले आहे. महिन्यातून किमान दोन–तीन दिवस रजा घेऊन ते गावी येतात व आणखी काय करता येईल, याचा एकमेकांशी विचारविनिमय करतात. रोज संध्याकाळी त्यांची बैठक होते व दुसऱ्या दिवसाच्या कामाची आखणी केली जाते.

## शिक्षण प्रसारक मंडळ

१९८० साली कंपनीच्या सहकार्याने गावकऱ्यांनीच या मंडळाची स्थापना केलेली आहे. याच संस्थेच्या वतीने श्री सुमंत विद्यालय या नावाने एक माध्यमिक विद्यालय सुरू झालेले आहे. या विद्यालयामुळे पंचक्रोशीतील सव मुलांची आणि मुलींची शैक्षणिक गैरसोय दूर झालेली आहे. कारण जवळपासच्या परिसरात म्हणजे चाकण किंवा खेडशिवाय या मुलामुलींना दुसरे हायस्कूल नव्हते. इतक्या दूर आपल्या मुलांना, त्यातूनही मुलींना पाठवणे सर्वच पालकांना शक्य नव्हते.

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला निसटलंच पाहिजे!

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

श्री सुमंत विद्यालयामुळे त्यांची ही प्रमुख अडचण दूर झाली असल्याने या परिसरातील मुला–मुलींचा शैक्षणिक दर्जा निश्चित उंचावेल यात शंकाच नाही. या वर्षी एस. एस. सी. ची पहिलीच बॅच या विद्यालयातून बाहेर पडत आहे. एकूण ३६ विद्यार्थी या वर्षी एस. एस. सी. ला बसले होते. सुदैवाने या विद्यालयाला अद्यावत साधन–सामुग्रीने सज्ज अशी प्रयोगशाळा लाभलेली आहे. आज पिंपरी-बुद्रुकच्या या विद्यालयात जेवढी उपकरणं उपलब्ध आहेत, तेवढी माझ्या माहितीप्रमाणे चाकण वा खेडसारख्या ठिकाणीदेखील उपलब्ध नाहीत. अर्थात यासाठी लागणारी भांडवली गुंतवणूक टेल्कोनेच केलेली आहे. शिवाय आवश्यक असणारे फर्निचर व संस्थेच्या लायब्ररीकरता अडीच ते तीनहजार पुस्तकेही कंपनीने दिलेली आहेत. शिक्षकांचा पगार मात्र गावकरी देत आहेत. विद्यालयास शासकीय मदत मिळत नसल्याने गेली तीन वर्षे अगदी वेळच्या वेळी त्यांनी शिक्षकांना पगार दिलेला आहे. चालू वर्षापासून त्यांना शासनाचीही मदत मिळण्याची शक्यता आहे आणि आता लवकरच हायस्कूलची मोठी व वेगळी इमारत बांधण्याची त्यांची इच्छा आहे.

मराठी शाळेत इयत्ता १ ली ते ७ वीपर्यंतचे वर्ग असून एकूण ४०० विद्यार्थी या शाळेत आहेत. सात–आठ खोल्यांची ही मोठीच्या मोठी शाळा आंतरबाह्य देखणी आहे. शाळेच्या आतील भिंतीवर शालोपयोगी तक्ते रंगवलेले आहेत. हे तक्ते स्वतः शिक्षकांनीच तयार केलेले आहेत. शाळेला फुलझाडे व फळझाडांनी सुशोभित असे मोठे अंगण आहे. १९७८ साली याच शाळेला कंपनीने दोन खोल्या बांधून दिलेल्या आहेत आणि दोन गावकऱ्यांनी बांधलेल्या आहेत. गेली दोन वर्षे या शाळेत क्रीडास्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धेत जवळपासच्या सर्व शाळा भाग घेतात. स्पर्धेसाठी लागणारा सर्व खर्च टेल्कोच करते. तसेच मुलांना गणवेश व वह्या, पुस्तके ठेवण्याकरता स्कूलबॅग देखील त्यांना कंपनीने पुरविल्या आहेत. सद्यःस्थितीत शाळेच्या सर्व त्रुटी भरून काढलेल्या आहेत. याशिवाय शाळेचा एकूणच शिक्षकवर्ग अतिशय हौशी व उत्साही आहे. त्यांनी स्वतः गावकऱ्यांकडून व या गावातल्या परगावी स्थायिक झालेल्या लोकांकडून शाळेकरता देणग्या गोळा केलेल्या आहेत आणि त्या रकमेतून शाळेकरता लाउडस्पीकरसेट, लोखंडी कपाट, ३२५ बैठकपट्ट्या, टेपरेकॉर्डर, हॅन्डफिल्मप्रोजेक्टर, साउंड बॉक्स, ड्रम, ढोल, लेझीम व बाजापेटी इ. साहित्य जमा केलेले आहे. शाळेला मोठ्या व्यक्तींचे फोटो नाहीत म्हणून स्वतः गावकऱ्यांनी ५१ फोटो दिलेले आहेत. प्रत्येक वर्गात एक साउंडबॉक्स बसवलेला आहे आणि वेगवेगळ्या इयत्तांचा जेव्हा आकाशवाणीवरून कार्यक्रम सादर केला जातो तेव्हा मुख्याध्यापकांच्या ऑफिसमधून त्या–त्या वर्गाच्या साउंडबॉक्समधून तो कार्यक्रम त्या मुलांना ऐकवला जातो. शिवाय कुणा शिक्षकाला वा मुलाला ऑफिसमध्ये बोलवायचे झाल्यास माईकवरून केवळ त्याच वर्गात सूचना देता येईल, अशी उत्तम सोय या शाळेने केलेली आहे. कंपनीच्या सहकार्याबद्दल गावकऱ्यांबरोबरच सगळा शिक्षकवर्ग देखील संतुष्ट आहे. ग्रामीण विभागातली एक आदर्श शाळा असा शिक्षण-अधिकाऱ्यांनी या शाळेला शेरा दिलेला आहे.

ग्रामीण विभागातल्या शाळेवरून आठवण झाली. वामनराव ठाकूर सांगत होते. ६२–६३ सालातली गोष्ट आहे. गावात फक्त चौथीपर्यंतच शाळा होती. एकच शिक्षक हे चारी वर्ग सांभाळत होता. सांभाळत होता म्हणजे शाळेत मुलं तर येत नव्हतीच; पण हे शिक्षकमहाशय शाळेचं दारदेखील न उघडता तब्बल दोन वर्षे केवळ पगार घेण्याचीच नोकरी करीत होते! मग मुलांचं शिक्षण आणि त्यांची प्रगती हा भागच अलाहिदा. असो. आजचं चित्र त्यामानाने खूपच चांगलं आहे.

टेल्कोने आजपर्यंत पिंपरीबुद्रुक या गावासाठी आठ ते दहा हजार फळझाडे दिली आहेत. हे वृक्षारोपणाचं कार्य करताना टेल्कोने अशीच एक चांगली योजना याही बाबतीत राबवलेली आहे. गावातल्या होतकरू तरुणांकडून त्यांनी वृक्षारोपणासाठी खड्डे खणवून घेतले. थोडक्यात त्यांना श्रमदान करायला लावलं आणि हे करत असताना त्यांना प्रत्येक खड्ड्यामागे एक रुपया त्याचा मोबदला दिला. एकूण सहा हजार खड्डे तयार झाले. त्यात सहा हजार झाडे लावली आणि खड्ड्यामागे एक रुपया या पद्धतीने सहा हजार खड्ड्यांचे गोळा झालेले सहा हजार रुपये हायस्कूलला मदत म्हणून देऊन टाकले. त्यातूनच श्री सुमंत विद्यालयाची प्रयोगशाळा उभी राहिली!

आठवड्याच्या दर सोमवारी व शुक्रवारी कंपनीची मोबाइल व्हॅन (फिरते आरोग्य-पथक) पिंपरीबुद्रुकला येते. गावात तशी मलेरियाची लागण खूप मोठ्या प्रमाणात होती; पण या फिरत्या आरोग्यपथकाने मलेरियाचे आता जवळजवळ उच्चाटण केलेले आहे. फिरत्या पथकात एक एम. बी. बी. एस. डॉक्टर, एक नर्स व एक ड्रायव्हर असतो. जवळपासच्या गावातही हे फिरते पथक कार्य करत आहे. प्रत्येक रुग्णाचा केसपेपर बनवताना केवळ एक रुपया फी आकारली जाते व तपासणी, औषधे मोफत दिली जातात. या फिरत्या दवाखान्यात पुरुष नसबंदी शस्त्रक्रियादेखील केली जाते. तसेच नसबंदी करून घेणाऱ्या पुरुषास ४०० रु. मोबदलाही दिला जातो. महिन्यातून एकदा गावातल्या मुलांची वैद्यकीय तपासणी केली जाते.

जवळपासच्या गावातील नऊ महिलांना वैद्यकीय ट्रेनिंग देऊन त्यांना प्रशिक्षित केलेले आहे. कंपनीची गाडी म्हणजेच आरोग्यपथक फक्त दोनच दिवस येत असल्याने, इतर दिवशी जेव्हा गाडी येत नाही, तेव्हा लोकांना निदान प्रथमोपचाराची तरी सोय व्हावी या हेतूने या महिलांना ट्रेनिंग दिलेले आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे यातील बऱ्याचशा महिला अशिक्षित आहेत. त्यांना लिहिता–वाचतादेखील येत नाही. तरीही त्या आपलं कार्य व्यवस्थित बजावीत आहेत.

## विस्तारकार्य

पिंपरीबुद्रुक या गावावरच समाधान न मानता टेल्कोने खेड तालुक्यातील अशाच अन्य अविकसित गावांकडेही आता आपलं लक्ष वळवलेलं आहे. त्याचा थोडक्यात आढावा खाली दिल्याप्रमाणे आहे.

(१) बराळे, शिवे व राजूबाईची वस्ती येथे पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी व शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी मध्यवर्ती नळयोजना.

(२) आरोग्ययोजनेखाली पिंपरीबुद्रुक, चांदुस, गोणवडी, पिंपरीखुर्द, रोहकल, बोरदरा, लादवड, वराळे, कोरेगावखुर्द, राजूबाईची वस्ती, शिवे, करजविहिरे इत्यादि अकरा गावांना फिरत्या आरोग्यपथकाची सोय, प्रतिबंधात्मक उपाय, आरोग्यशिक्षण, ग्रामआरोग्यसेविका, पुरुष नसबंदीसाठी ४०० रुपये अनुदान.

(३) वराळे येथे प्राथमिक शाळेची योजना.

(४) पाच वर्षांत १५,००० वृक्षरोपण

(५) गोबरगॅसयोजना, पिंपरीबुद्रुक येथे १० सुरू. प्रगतिपथावर ३४, शिवे गावी १० इतर ३० असे एकूण ८४ गॅस.

(६) स्वस्त संडास-योजना.

(७) फळझाडांचे वाटप इत्यादि–

पिंपरीबुद्रुक या गावातील सर्व लोक टेल्कोच्या संबंधित अधिकाऱ्यांवर तसेच त्यांच्या सहकार्याने साधलेल्या विकासकार्यावर संतुष्ट आहेत. गावातून रोजगाराच्या निमित्ताने बाहेर पडलेले लोकही आता पुन्हा गावाकडे परत फिरण्याच्या विचारात आहेत. सहकार्यातून व सामोपचाराने अनेक गोष्टी घडू शकतात हे पिंपरीबुद्रुकच्या लोकांनी टेल्कोच्या सहाय्याने पुन्हा एकदा प्रकर्षाने निदर्शनास आणून दिलेले आहे. एक साधं उदाहरण. दहा वर्षांपूर्वी केवळ अडीच हजारात हरिजनांची एक एकर जमीन खरेदी करून घेतलेल्या ग्रामस्थाने नुकतीच ती जमीन फक्त अडीचहजार रुपयेच घेऊन परत दिलेली आहे. एवढं औदार्य दाखवायला तशाच खंबीर मनाची गरज असते. केवळ शासनावर अवलंबून न रहाता हाच विचार जर प्रत्येक मोठ्या कंपनीने केला व गावकऱ्यांनीही तशीच साथ दिली तर भारतातील अविकसित खेडी विकसित व्हायला वेळ कितीसा लागणार आहे ? त्यामुळे अनेक समस्या दूर होतील. रोजगाराच्या निमित्ताने दिवसेंदिवस खेड्यांमधून शहराकडे जाणारा माणसांचा अमर्याद लोंढाही त्यामुळे आपोआपच थांबेल ! □


या संघर्षातील माझे सर्वोच्च ध्येय ना गुलामी प्रथेला अभय देणे आहे ना तिचे उच्चाटन करणे आहे. ते आहे देशाची अखंडता अबाधित ठेवणे. जर एकाही गुलामाला मुक्त न करता मी देशाची अखंडता राखू शकलो तर ते मी करेन. जर काही गुलामांची मुक्तता केल्याने आणि काहींना तसेच ठेवून देश अखंड ठेवता आला, तर ते मी करेन मी गुलामी प्रथेबाबत वा काळ्या वंशाच्या लोकांबाबत जे करतो ते देशाची अखंडता कायम रहावी यासाठीच करतो आणि त्याला विरोध करतो तो यासाठी की त्यामुळे देश अखंड रहायला साहाय्य होणार असते – **लिंकन**

**देशाचे विच्छेदन हेच पाप मानणाऱ्या सर्वात महान राजकीय नेत्याची संपूर्ण ओळख करून देणारा ग्रंथ.**

अब्राहम लिंकन

**फाळणी टाळणारा महापुरुष**



वि.ग.कानिटकर

**फाळणी एकदा झाली पुनः होणार नाही ह्याची शाश्वती वाटावी अशी परिस्थिती नाही. प्रत्येकाने अभ्यासायला हवी अशी लिंकनची राजकीय कहाणी.**

**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली पहिली डिलक्स आवृत्ती.**

**मोठा क्राऊन आकार**

**पृष्ठे : सुमारे ४००**

आमची पंधरावी कला

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव पेठ, पुणे. ४११ ०३०.

# प्रदूषणाच्या मायावी वाघाच्या पंजात

गीता साने, धनबाद

गेली काही वर्षे प्रदूषणावर बरेच वाङ्मय प्रसिद्ध होत आहे. मध्यंतरी एक चांगल्यापैकी कादंबरीही माझ्या वाचनात आली. त्या वाङ्मयात घडणाऱ्या घटना जणू पृथ्वीवरच्या नाहीतच अशा अलिप्त मनाने मी सारे वाङ्मय वाचीत असे. १९७८ च्या उन्हाळ्यामधल्या एका रम्य-सुंदर सकाळी माझ्या भ्रमाचा भोपळा फुटला. त्या दिवशी मला समजले की हा वाघ आहे, हा वाघ शोभेचा–कागदी नसून खरा–खरा वाघ आहे. हा वाघ झू-मधला, पिंजऱ्यामधला वाघ नाही की, सर्कशीमधला काही प्रमाणात माणसाळलेला वाघही नाही. हा वाघ जिम कार्बेटच्या जंगलामधलाही नाही ! हा वस्तीत शिरून धुमाकूळ घालणारा नरभक्षक आहे आणि आपली नखे, दात घासून त्यांना सतत धार लावतो आहे.

मे महिन्याच्या त्या सकाळी मी सांताक्रूझहून व्ही. टी. ला गीतांजली गाठायला जात होते. पुणे–धनबाद तिकिट न मिळाल्याने मी मुंबईला माझा भाचा श्री. विकास जोशी यांच्याकडे आले. गीतांजलीचे तिकिट त्यांनीच काढले होते. गीतांजली ही राजेशाही गाडी व्ही. टी. हून सकाळी सहाला निघते. तिचे पुढचे स्टेशन म्हणजे नाशिक. विकास मला आपल्या कारने पोचवून, गाडीत बसवून देणार असल्याने मी त्याबाबत निश्चित होते. 'आपण ५ वाजता जाऊ म्हणजे तुला स्वस्थतेने गाडीत चढवता येईल' हे रात्रीच ठरले होते.

सकाळी ५ ला आम्ही बाहेर पडलो. स्नान-चहा झाल्यावर ताजे वाटत होते. कार समुद्राच्या काठाने भरधाव निघाली होती. उत्तम स्थितीतली कार व तसेच उत्तम राखलेले, धक्के–गचके न देणारे रस्ते– अशा वेळी कार भरधाव काढण्यात खूप मजा येते. रस्त्यावर रहदारी अजून सुरू नव्हती. रस्ता झाडून–धुऊन स्वच्छ करताना अधून–मधून सफाई-कामगार भेटत होते. रात्रीच्या दवाने झाडे धुऊन निघालेली. कारच्या वेगामुळे थंड वाऱ्याची झुळुक लागू लागली. रात्री दमट व कोमट हवेमुळे, पंख्याखाली निजूनही आंबलेले शरीर सैलावले, मन सुखावले. मी मान मागे टेकली.

अंग–प्रत्यंगात भिनणारे हे सुख फार वेळ लाभले मात्र नाही. समुद्राकाठची मोकळी हवाही मनाची हुशारी टिकवायला असमर्थ होती. कारण पहाता–पहाता जीव गुदमरून टाकणारा सडणाऱ्या वस्तूचा दुर्गंध व हायड्रोजन सल्फाइडवायू ह्यांचा भपकारा अंगावर येऊ लागला. काही वेळाने त्या वासाने मळमळ सुरू झाली, डोके दुखू लागले, डोळे चुरचुरू लागले. नाकाला पदर लावावा लागला.

हा घाणेरडा वास व हा वायू माझ्याबरोबर स्टेशनपर्यंत तर आलाच; पण गीतांजलीतही त्याने माझी पाठ सोडली नाही. स्टेशनामागे स्टेशने गेली. अगदी कल्याण–अंबरनाथ देखील गेले; पण वास येतच होता. तो कमी तेवढा झाला ! ह्या वायूने मला इतका त्रास झाला, तर झोपडपट्ट्यांमधल्या मुलांची, तान्ह्यांची अवस्था काय होत असेल ?

## मजुरांचे काम बंद !

हायड्रोजन सल्फाइट माझ्या परिचयाचा. आमच्या प्रयोगशाळेत रसायनविभागात त्याचा उपयोग आम्ही रोजच करीत असू; पण तेथे त्याची निर्मिती, सुरक्षित अलमारीत केली जाई. इथे हा राक्षस आपल्या बाटलीतून मोकाट सुटला होता. मी त्याला परत सीलबंद करण्याची जादू माझ्याजवळ नव्हती, नव्हे अजून कोणालाही ती साध्य झालेली नाही.

माझ्या मनातला प्रदूषणाचा वाघ त्या दिवशी असा जागा झाल्यावर, त्याला आता कुठे–कुठे कसे–कसे तोंड द्यावे हा प्रश्न सारखा सतावू लागलेला आहे. हळकुंडे लाल दिसावीत म्हणून लेडक्रोमेटच्या पाण्यात बुडवतात असा प्रवाद. मग हळद घरच्या अंगणात लावायची, ती वाढवायची, तयार झालेले कंद उकडून... इ. सारी सव्यापसव्ये आलीच. ती हळद कमी पडल्यास घरची हळद लोणच्यांच्यासाठी राखून ठेवून, रोजचा स्वैपाक विनाहळदीचा रंगहीन, रूपहीन! लेडची सारीच रसायने फार विषारी आहेत म्हणून ही सारी दगदग. अलीकडे तुरीच्या डाळीत खिसाडीची डाळ मोठ्या प्रमाणात मिसळून येते आहे. ही डाळ स्वस्त आहे. तिची डाळिंबी बारकूल असली तरी मऊ–मेण शिजते. तुरीच्या डाळीसारखीच दिसली तरी तुरीच्या वरणाचा घरभर सुटणारा सुवास मात्र तिला नाही. हेही सगळे चालवून घेतले असते; पण खिसाडीच्या पिकावर एक रोग पडतो व त्या रोगाने पछाडलेल्या खिसाडीची डाळ फार दिवस खाण्यात आली तर एका जातीचा पक्षघात Paralysis होतो. त्याला डॉक्टरांकडे औषध नाही. घरच्या फूड–कौन्सिलपुढे ती बाब ठेवण्यात आली व तुरीची डाळ वर्ज्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याऐवजी मूग व मसूर ह्या डाळी वापरण्याचे ठरले आहे. अगदी सील केलेल्या डब्यांमधूनही तेलात–डालडात भेसळ केली जाते. एकदा वरचे सील तसेच ठेवून आलेल्या डालडाच्या डब्यात अर्धे–अधिक तेल आले म्हणून डबा तपासला. खालच्या बाजूला रुपयाएवढे गोल भोक पाडून चटकन ओळखले जाणार नाही असे ते भोक बेमालूम सील केलेले होते.

घरामध्ये हा वाघ इतका गोंधळ घालतो आहे. बाहेर तर त्याच्या डरकाळ्या ऐकूनच पोटात गोळा उठतो. धनबाद जिल्ह्यात, कोळसा खाणींमुळे लघुउद्योग पुष्कळच आहेत. कोल्डफील्ड प्राइव्हेट लि. हा त्यापैकीच एक लघुउद्योग. ह्या कारखान्याने पिच क्रॅशिंग प्लँट १९८३ मध्ये बसवला व इतरत्र काम करणाऱ्या मजुरांपैकी पंधरा मजूर त्या प्लँटमध्ये पाठवले.

प्लँटमध्ये कामाला जाऊ लागल्यावर दोन-अडीच महिन्यात मजुरांच्या अंगावर पुरळ उठू लागला. प्रथम तो उघड्या अंगावर उठे व नंतर झाकलेल्या भागावरही पसरू लागे.

भूक कमी होऊ लागली, बद्धकोष्ठाची तक्रार सुरू झाली. डोकेदुखीची सुरुवात झाली. थकवा खूप येऊ लागला व काही मजुरांना घेऱ्यांचा त्रासही होऊ लागला. त्रास वाढला म्हणजे मजूर जवळच्याच एका डॉक्टरकडे जात, मेडिकल सर्टिफिकेटवर सुट्टी घेऊन घरी बसत. हळू-हळू त्यांच्या ध्यानात असे आले की, सुट्टी घेऊन घरी राहिल्यास, एक-दोन आठवड्यात दुखणे कमी होते आणि कामावर रुजू होताच पुन्हा दुखण्याचा जोर वाढू लागतो. अखेर मजुरांनी काम बंद केले व ते सर्व प्लँटच्या बाहेर उन्हात बसून राहू लागले. दिवस हिवाळ्याचे आलेले असल्याने तेही सुखाचेच होते.

## कातडीचा रंग काळा का ?

ह्या प्रकाराचा छडा लावण्यासाठी, प्लँटच्या मॅनेजरने मजुरांना आपल्या फिजीशियनकडे पाठवले. डॉक्टरांच्या चौकशीत त्यांना मजुरांनी सांगितले की, प्टलँमध्ये कामाला लागलेल्या मजुरांना कामावर घालण्यासाठी, कपडे मिळाले होते. मजुरांच्या घरात कपडे फारसे नसतात. शिवाय हे कपडे रोज धुऊन कारखान्यात ठेवण्याबद्दल त्यांना मॅनेजरने सांगितलेही नव्हते. तेव्हा कारखान्याने दिलेले कपडे घरात वापरण्याच्या कपड्यांचा एक भाग झाला. मजुरांनी घरी जातानाच काय, पण घरी गेल्यावरही कपडे बदलले नाहीत.

डॉक्टरांनी मजुरांना तपासून रिपोर्ट दिला तो असा—

पिच क्रशिंग प्लँटमध्ये पिचची धूळ उडते ती मजुरांच्या अंगावर पडते आणि नाका-डोळ्यातही जाते. काम संपल्यावर मजूर कपडे धूत नाहीत. रात्रीही बहुश: त्याच कपड्यांनी झोपतात. पिचच्या धुळीचा पहिला परिणाम उघड्या अंगावर दिसू लागतो. नंतर हेच कपडे न धुता वापरल्यामुळे धुळीचा संसर्ग झाकलेल्या शरिरालाही होतो. धूळ नाका-डोळ्यात व पोटात गेल्याने इतर लक्षणे दिसतात. त्याला उपाय म्हणजे मजुरांच्या शरिराचा संस्पर्श धुळीशी येणार नाही अशी व्यवस्था करावी लागेल. कामाच्या वेळेचा स्वतंत्र ड्रेस तोंडाला मास्क, डोळ्यांना गॉगल्स, हातमोजे, पायमोजे व बूट द्यावे लागतील. घरी जाताना स्नान करून हे कपडे धुऊन स्वत:चे स्वच्छ कपडे घालावे लागतील. अधिक माहिती कलकत्त्याच्या 'ट्रापिकल स्कूल ऑफ मेडिसिन' कडे संबंधित विभागाकडे मागता येईल.

ह्या रिपोर्ट मिळाल्यावर मजुरांना आजाराची सुट्टी देण्यात आली व परत आल्यावर त्यांना आपल्या जुन्या कामावर पाठवण्यात आले. कंपनीने हा प्लँट बंद करून टाकला व प्रदूषणाचा प्रश्न तात्पुरता सोडवला.

अनेकदा प्रदूषण विस्तृत प्रदेशात पसरलेले असते, तसेच त्याचे परिणाम जास्त घातक असले तरी तो परिणाम अत्यंत सावकाश होतो. कधी-कधी त्याची लक्षणें इतर एखाद्या दुखण्यासारखी असतात आणि रोग्याचे दुखणे काही विशेष प्रकारचे आहे, हे डॉक्टरांच्या ध्यानात यावयालाही बराच काळ लागतो. अलीकडे पश्चिम बंगालच्या काही ट्यूबवेलसच्या पाण्यात अर्सेनिक मोठ्या प्रमाणात विरघळलेले सापडले. त्याची हीच कथा झालेली आहे.

चोवीस परगणा जिल्ह्यातील दोन खेड्यांमधून, पोटाच्या दुखण्याच्या जोडीला, रोगी काळेही पडत असल्याच्या तक्रारी १९८२ पासून डॉक्टरांच्याकडे येऊ लागल्या. रोगी फिकट पडताना डॉक्टर नेहमी पहात होते; पण कातडीचा रंग काळा का पडतो हे त्यांना एक कोडेच. सुरुवातीला त्यांनी ह्या लक्षणाकडे फारसे लक्ष पुरवले नाही. हळहळू रोगाचा जोर वाढू लागला व त्याचे परिणाम लिव्हरवर होताना दिसू लागले. एका वर्षात रोग्यांची संख्या वाढत जाऊन ती साठावर पोचली. हे रोगी दोनच खेड्यांतून येत होते. डॉक्टरांनी रोगाचा छडा लावण्यासाठी, साऱ्या चाचण्या करवल्या व पिण्याचे पाणीही तपासणीसाठी पाठवले.

## चौकशी-निराकरण ?

कलकत्त्याच्या ट्रॉपिकल स्कूल ऑफ मेडिसिन ह्या संस्थेने केलेल्या पाण्याच्या तपासणीत आर्सेनिक हे विष पाण्यात मोठ्या प्रमाणात सापडले. आर्सेनिक हे विष जलाल तर आहेच; पण त्यावर विश्वासार्ह उतारही नाही; त्यामुळे लागलीच पुढची हालचाल सुरू झाली. आर्सेनिकचा रिपोर्ट केंद्रखात्याच्या आरोग्यकमिशनरला मिळताच ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस ह्या संस्थेची एक टीम ऑक्टोबर १९८३ त बंगालमध्ये आली. ह्या टीमबरोबर सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्डाचे प्रतिनिधीही होते. ह्या टीमने रोगग्रस्त क्षेत्राचे निरीक्षण, परीक्षण व चाचण्या केल्या. टीमचे प्रमुख डॉ. चक्रवर्ती ह्यांनी डिसेंबर १९८३ च्या सुरुवातीला वृत्तपत्रांना सांगितले की, ह्या विशिष्ट भागातील तीन-तीन ट्यूब-वेलसचे पाणी दूषित असून त्यांच्या पाण्यात अर्सेनिकचे प्रमाण माणसाला सहन होईल त्याच्या ४० पट आहे. हे आर्सेनिक कुठून व कसे आले ह्याचा छडा त्यांना लागला नाही. ह्या भागात आर्सेनिक रसायन वापरणारे कारखाने नाहीत. पिकावर जंतुनाशकांचे फवारे किंवा उंदीर-घुशी मारणारी विषे घातल्याची माहिती मिळालेली नाही. विहिरी १२० फुटांपेक्षा जास्त खोल नाहीत. भूगर्भात काही थर खाली-वर झाले असावेत हा एक अंदाज नंतर व्यक्त करण्यात आला, पण ह्या भागातील तीनच विहिरींच्या पाण्यात आर्सेनिक का यावे ते कोणी सांगितलेले नाही.

ट्यूब-वेलस्च्या पाण्यात आर्सेनिक सापडल्याबद्दल लोकांना माहिती होताच सर्वत्र भीतीचे वातावरण उत्पन्न झाले. त्या प्रदेशामधले लोकप्रतिनिधी कलकत्त्याला ट्रंककॉल्स करू लागले. वेगवेगळ्या ट्यूबवेलसच्या पाण्याच्या बाटल्या तपासणीसाठी ट्रॉपिकल स्कूलमध्ये पाठण्यात येऊ लागल्या.

टीमचा रिपोर्ट मिळताच, बंगाल सरकारने राज्य आरोग्यखात्याचे आरोग्य-कमिशनर, आरोग्यइंजिनियर, डॉक्टरांचे व शिक्षणसंस्थांचे प्रतिनिधी तसेच ऑल इंडिया पब्लिक हेल्थ व हायजीन ही ट्रॉपिकल स्कूलचीच एक शाखा आहे. (कलकत्ता) ह्यांचा प्रतिनिधी, घेऊन एक चौकशी कमिटी नेमली. दूषित विहिरींच्या भोवतालच्या सर्व ट्यूब-वेलसच्या पाण्याचे नमुने एकापेक्षा अधिक जागी तपासून घेऊन, त्यांचे रिपोर्ट परस्परांशी ताडून पहाणे. गंभीर रोग्यांना दवाखान्यात दाखल करून घेणे, रोगांच्या केस हिस्ट्रीज तयार करणे, विषबाधेच्या क्षेत्रातील भाज्या गोळा करून त्यांच्यातले आर्सेनिकचे प्रमाण पहाणे इत्यादी सर्व गोष्टी ह्या कमेटीवर सोपवण्यात आल्या.

ह्या कमिटीची चौकशी पूर्ण होता-होता

ह्याच जिल्ह्यातील आणखी काही खेडी आणि बरद्वान व नडिया जिल्ह्यातील काही खेडी प्रदूषणाची शिकार झाल्याचे रिपोर्ट आले. ह्या सर्व ट्यूबवेल्सचे पाणी खेचणारे पाइप्स् व पाणी गाळणारी चाळणी बनवताना वापरलेल्या मिश्रधातूत आर्सेनिक रसायन आहे का ? असा संशय आला. कारण अशा तऱ्हेची केस चंदीगढ येथे १९७६ मध्ये घडलेली होती. ह्या संशयाचे निराकरण करण्यासाठी पाइप व चाळणीच्या ऐवजी पॉलिथिन-पाइप वापरून त्यातून घेतलेले पाणी तपासण्यात आले. ह्या नमुन्यातही आर्सेनिक सापडले आहे, तेव्हा प्रदूषण पाइप्स किंवा चाळणी त्याच्यामुळे होत नाही असा निष्कर्ष निघाला. चारशे फूट खोल विहिरीचे पाणी शुद्ध सापडल्याने ट्यूबवेलसच्या पाइप्सचे तोंड अधिक खोल नेऊन ४०० फुटांवर पोचवण्याची शिफारस कमिटीने केली आहे.

असा हा प्रदूषणाचा वाघ. पुराणामधल्या एखाद्या मायावी राक्षसाप्रमाणे हा विविध रूपे घेऊन आपल्यावर झडप घालतो. कधी एखाद्या रसायन-कंपनीच्या सांडपाण्यातून तो वाहात असतो, कधी एखाद्या कारखान्यावरून येणाऱ्या हवेबरोबर तो धूळ होऊन पसरतो, तर कधी जंतुनाशक फवाऱ्यामधील औषधांच्या स्वरूपात तो अन्नधान्याबरोबर घरात येतो. कधी त्याची ओळख असूनही ओळख पटत नाही. एक शतक जुन्या कोळसाखाण उद्योगांच्या क्षेत्रात १९७२ मध्ये मी दम्याने आजारी पडले. तेव्हा एक सहकारी म्हणाले 'इथून गया ओडांडून गेलात की तुम्हाला बरे वाटेल.' डॉक्टर ह्यावर हसत म्हणाले, 'कोळशाची वस्त्रगाळ भुकटी व कोळशाचा धूर ह्यांनी आपली हवा काठोकाठ भरली आहे ना !'

अशा ह्या बहुरूपी शत्रूला तोंड द्यायला एकाकी व्यक्ती असमर्थ असते. विविध संकटांना गटाने तोंड देऊन मानव आजवर, सर्वांवर मात करीत आला आहे. आजही प्रदूषण आटोक्यात ठेवावयाचे तर संघटित प्रयत्नांची गरज आहे. विकसित देशात, प्रदूषण-विरोधी संघटना, प्रदूषण कायदे व जनजागृती ह्या दोन गोष्टींच्या आधारे, प्रदूषणाला आवर घालीत आहेत. झपाट्याने वाढणारे औद्योगीकरण व लोकसंख्या ह्यांच्यामुळे भारतात, सैरावैरा धावणारे प्रदूषण आटोक्यात आणण्यासाठी कायदा झालेला आहे; पण ह्या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करून घेण्याइतकी सामाजिक संघटना व जागृती होण्यास किती काळ थांबावे लागेल कोण जाणे !

□

# ग्रामीण प्रौद्योगिक केंद्र कुवे, जि. रत्नागिरी

नॅशनल रिसर्च डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया हे स्वदेशी तंत्रज्ञानाचे एक भांडार आहे. ह्या संस्थेकडे ग्रामोद्योगास, लघुउद्योगास आणि कुटीरोद्योगास उपयुक्त अशी अनेक तंत्रे आहेत. ही सर्व तंत्रे जवळजवळ ग्रामीण जीवनास उपयोगी पडणारी अशीच आहेत. थोडक्यात असे म्हणता येईल की, हे तंत्रज्ञान स्वस्त आणि वापरण्यास अगदी सोपे असेच आहे.

एन. आर. डी. सी. च्या तंत्रज्ञानाचे आणखी एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे ही सर्व तंत्रे अगदी कमी शक्तीवर चालवता येतात. जवळजवळ सर्वच तंत्रे ही मानवी शक्तीवरच चालणारी आहेत. उत्पादनात स्थानिक साधनसंपत्तीचाच वापर. भांडवल अगदी अल्प प्रमाणात. रोजगाराच्या उपलब्धतेबरोबरच उत्पादित वस्तूंचा उत्तम दर्जा आणि सर्वांत महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य या तंत्रज्ञानात कोणतं असेल तर ग्रामीण लोकांचं जीवनमान उंचावणं आणि ग्रामीण लोकात आत्मविश्वास, आत्मनिर्भरता निर्माण करण्याचं सामर्थ्य.

देशाच्या समृद्धीचा तंत्रज्ञान हाच गाभा आहे. हे तंत्रज्ञान केवळ प्रयोगशाळेत बंदिस्त न करता हे तंत्रज्ञान खेड्यात आणि गल्लीबोळात नेणे हेच एन. आर. डी. सी. चे काम आणि ती जबाबदारी त्या संस्थेने उचलली आहे.

आपला देश हा जसा कृषिप्रधान आहे तसाच तो खेड्यांत राहणारा आहे. खेड्यांत साक्षर लोकांचं प्रमाण कमी असल्याने पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष ज्ञानाची म्हणजे यंत्राचीच गरज आहे. ग्रामीण लोक पुस्तके वाचू शकत नाहीत; परंतु थोडयाशा जुजबी माहितीने ते यंत्र चालवू शकतात. त्यासाठी एन. आर. डी. सी. देशातील विभिन्न भागात ग्रामीण प्रौद्योगिकी प्रदर्शन आणि प्रशिक्षणकेंद्रे स्थापन करत आहे. या केंद्रात स्थानिक लोकांच्या आवश्यकतेप्रमाणे काही तंत्रांचे, यंत्रांचे प्रदर्शन आणि प्रशिक्षणाची सोय केली जाते. उदा.– पिण्याच्या पाण्याची स्वच्छता, उपसासिंचन, कृषिअवजारांचा वापर, स्वस्त आणि सुरक्षित घर, शैक्षणिक साधने ( पाटी, पेन्सिल इत्यादी ), प्रौद्योगिकी आणि सौर व वायुऊर्जांचा वापर, धूरविरहित चुलींचा प्रसार, दोरखंड वळण्याचे यंत्र, पत्रावळी–द्रोण बनवण्याचे यंत्र, पशु चाट, रोपलावणीयंत्र इत्यादी.

आपल्या उद्देशपूर्तीसाठी एन. आर. डी. सी. बँका ग्रामीण विकास कार्याबाबत उत्सुक असलेल्या सेवा–संस्थांना सहकार्य देते.

कुवे हे खेडे मुंबई–गोवा या राजमार्गावर ता. लांजा, जि. रत्नागिरीपासून केवळ चार कि. मी. अंतरावर आहे. गोकुळप्रतिष्ठान या संस्थेने इमारतीसाठी या हमरस्त्यालगतच एका उजाड–ओसाड माळावर काही जागा विकत घेतली. या जागेवर आश्रमशाळा व निवास–इमारतीच्या ( मंगलोरी कौले ) बांधकामाचा खर्च काढला. तो आला चार–पाच लाखांच्यावर. या उजाड माळरानावर पिण्याच्या पाण्याचा थेंबही नाही !

यातून मार्ग काढण्यासाठी गोकुळप्रतिष्ठानचे प्रमुख श्री. गंगावणे यांनी एन. आर. डी. सी. कडे मार्गदर्शनाची विनंती केली. या विनंतीवरून डिसेंबर ८३ ला एन. आर. डी. सी. चे डेप्युटी प्रोजेक्ट को–ऑरडिनेटर श्री. राजेश्वर दयाळ यांनी कुवे येथे येऊन

परिसराची संपूर्ण पाहणी केली आणि त्यानंतर इंजिनियर श्री. दवे यांनी संपूर्ण इमारतीचा आराखडा तयार करून, त्यांनी तो एन. आर. डी. सी. कडे सादर केला. या आश्रमशाळेच्या छताचे तंत्र सी. बी. आर. आय. या संस्थेने तयार केले. एन. आर. डी. सी. ने एन. बी. ओ. कडून बांधकाम-आराखडा व सी. बी. आर. आय. कडून छप्पर-आराखडा घेऊन केवळ आश्रमशाळेसाठी इमारत न बनवता शाळेच्या इमारतीला लागूनच एन. आर. डी. सी. ची इमारतही उभी राहत आहे. ही इमारत म्हणजेच 'ग्रामीण प्रौद्योगिक प्रदर्शन व प्रशिक्षणकेंद्र.'

यामागे एन. आर. डी. सी. चा जो उद्देश आहे तो संपूर्णतया सफल होईल असा अंदाज आहे. कारण गोकुळ-प्रकल्प-प्रतिष्ठान ही संस्था ग्रामीण विकासासाठी वाहून घेणारी असून अनेक कार्यकर्ते प्रौढ साक्षरतेचे वर्ग चालवत असल्याने यंत्रांचे प्रदर्शन व प्रशिक्षण सुलभतेने होऊ शकते. या शाळेत सव्वाशेच्यावर विद्यार्थी शिक्षण घेतात. ती सर्व मुले या शाळेच्या लगतच्या केंद्रामध्ये जाऊन प्रशिक्षण सहज घेऊ शकतात. दुसरे म्हणजे या केंद्राभोवतालचा परिसर पूर्णतया ग्रामीण आणि अनेक दृष्टींनी मागासलेला असा असून आर. टी. डी. ने जी यंत्रसामुग्री प्रदर्शनासाठी व प्रशिक्षणासाठी आणलेली आहे ती या भागात नवीन आणि उपयुक्त अशीच आहे.

*'ग्रामीण प्रौद्योगिकी प्रदर्शन व प्रशिक्षणकेंद्र, कुवे'* येथे ज्या यंत्र आणि तंत्राचे प्रदर्शन आणि प्रशिक्षण दिले जाणार आहे त्या सर्वांची क्रमशः माहिती पुढीलप्रमाणे –

**(१) अग्निरोधक गवताचे छपरी घर :** आपल्या देशातले अनेक खेडूत ज्या घरांत रहातात त्या घरांची छपरे गवताची किंवा त्या भागात उपलब्ध असलेल्या पालापाचोळ्याचीच असतात. उन्हाळ्याच्या दिवसांत ही छपरे अगदी सहजगत्या पेटू शकतात आणि एकदा आग लागली की, संपूर्ण घर खाक होऊन जाते. कधीकधी तर एका घराची आग ही संपूर्ण गावात पसरून अग्निकांडाचेच रूप धारण करते.

अशा प्रकारच्या संकटापासून मुक्त होण्यासाठी सी. बी. आर. आय. रुडकीने अगदी सोप्या पद्धतीने म्हणजे त्या परिसरातच उपलब्ध असलेली चिकण माती, शेण, भुसा, डांबर आणि रॉकेल इत्यादींच्या योग्य त्या प्रमाणात एकत्रीकरणाने छप्पर तयार केले. हे अग्निरोधक असेल. अशा छपरांना आग लागण्याची भीती नाही व हे छप्पर पारंपारिक छपरापेक्षा ३ ते ४ पटींनी जास्त टिकाऊ असते. या छपराची आयुमर्यादा कमीत कमी आठ ते दहा वर्षे इतकी असते. या छपराची प्रचीती कुवे येथील आश्रमशाळेच्या प्रांगणात जाताच येईल.

**(२) पत्रावळी आणि द्रोण बनवण्याचे यंत्र :** आपल्या देशात झाडांच्या पानांपासून पत्रावळी आणि द्रोण बनवण्याची परंपरा वर्षानुवर्षे प्रचलित आहे. मिठाई, लोणी ठेवण्यासाठी, धार्मिक वा लग्नसोहळ्याच्या उत्सवात जेवणावळी घालताना पत्रावळी आणि द्रोणाच्या वापराशिवाय खेड्यात तरी पर्याय नाही. ह्या पत्रावळी किंवा द्रोण खेडेगावातील कारागिरांद्वारे करोडोंच्या संख्येने बनवले जातात. हा व्यवसाय शहरातही काही गरीब कारागीर करतात; परंतु या व्यवसायातून फारच कमी उत्पन्न मिळते.

द्रोण बनवण्याच्या पारंपारिक पद्धतीत अनेक दोष आहेत. यात बरीच पाने वाया जातात. पानास धूळ आदी लागलेली असते. द्रोण-पत्रावळी एके ठिकाणी ठेवल्याने कुजून वापरण्यास योग्य रहात नाहीत. याव्यतिरिक्त हे द्रोण वा पत्रावळी कामचलाऊ आणि दिसण्यासही आकर्षक नसतात आणि आजच्या रंगीबेरंगी प्लॅस्टिकच्या आधुनिक सामानामध्ये, स्पर्धेमध्ये टिकू शकत नाहीत. आज कागद आणि प्लॅस्टिकच्या वस्तूंनाच मागणी आहे.

केंद्रीय खाद्य प्रौद्योगिकी संशोधनसंस्था, म्हैसूरच्या खाद्य पॅकेजिंग केंद्राने विविध झाडांच्या पानांपासून द्रोण व पत्रावळी बनवण्याचे यंत्र तयार केले आहे. यातून बनवलेले द्रोण आणि पत्रावळी आकर्षक आणि किंमतीने स्वस्त. या यंत्रातून बनवलेल्या पत्रावळी व द्रोण दिसायला सुंदर, मजबूत आणि विभिन्न आकृतींच्या बनवल्या जातात. उदा.– षटकोनी, गोल, चौकोनी.

या मशिनद्वारे एक व्यक्ती एका तासात दोनशेपन्नास द्रोण किंवा पत्रावळी बनवू शकते. या यंत्रावर एक कुशल आणि एक अकुशल (स्त्री किंवा मुलगा) अशी दोन माणसे लागतात. दोघात मिळून रोज कमीत कमी वीस रु. सहज कमवू शकतात. पारंपारिक पद्धतीने दोन ते पाच रुपयांपेक्षा जास्त मिळवणे अशक्य. या मशिनची किंमत चार हजार रु. आहे आणि एक हजार रुपये कच्च्या मालासाठी म्हणून सुरुवातीला लागतात.

**(३) दोरखंड वळण्याचे यंत्र :** *खेड्यातील जीवनमानात* दोरखंडाचे स्थान अनन्यसाधारण आहे. दोरखंडाशिवाय शेतातला नांगर चालू शकत नाही की विहिरीवरली मोट चालू शकत नाही की खुंटाला गुरे रहाणार नाहीत. ही दोरखंडे त्या-त्या भागात उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीवर तयार होतात. कोकणात नारळाच्या


# राम गणेश गडकरी

साऱ्या मराठी वाङ्मयाला आपल्या दैदीप्यमान व प्रमत्त प्रतिभेने दिपवून टाकणारा, अंतर्मुख करणारा, मराठी नाटकाला शेक्सपिअरच्या उंचीवर नेऊ पाहणारा, दम्याने, क्षयाने पोखरलेल्या कुडीतील दुर्दम्य महत्त्वाकांक्षेने अशी उंची नाट्यक्षेत्रात गाठून साऱ्या मराठी वाङ्मयाला छेद देणारा नाटककार.

गडकऱ्यांच्या जन्मशताब्दीच्या सुरुवातीला गडकऱ्यांच्या नाटकांचे आगळेपण उलगडून दाखवणारा लेख – माणूस पुढील अंकी.

**लेखक : डॉ. भीमराव कुलकर्णी**

काथ्यापासून कोल्हापूर–सांगलीकडे अंबाडी, तागाच्या धाग्यापासून तर मराठवाड्यात केकताडाच्या धाग्यापासून ही दोरखंडे वळली जातात. या अशा महत्त्वपूर्ण दोरखंडाची निर्मिती ज्या पारंपारिक पद्धतीने केली जाते ती पद्धती मात्र अत्यंत कष्टप्रद. शिवाय अत्यंत कमी प्रमाणात ही दोरखंडे वळली जातात.

या अशा कष्टप्रद कामाला सोपे करण्यासाठी उत्तरप्रदेशातील जि. सुलतानपूरच्या विकास इंजिनियरिंग कॉर्पोरेशनने एक सुटसुटीत यंत्र बनवले आहे. कपडे शिलाईमशिन जसे पायांद्वारे चालवले जाते त्याचप्रमाणे ही दोरखंडे वळली जाणारे मशिन चालवले जाते. या यंत्रातून अर्ध्या इंचाच्या जाडीपर्यंत दोरखंड वळता येते. या यंत्राद्वारे प्रत्येक दिवशी सात ते आठ किलोग्राम दोरखंड वळले जाते.

(४) *उन्नत चूल* : आपल्या देशातील खेड्यांत आजही स्वयंपाकासाठी इंधन म्हणून लाकडाचाच उपयोग करतात. लाकडाच्या जळणासाठी जी चूल वापरली जाते, त्या चुलीतून जे इंधन म्हणून ऊर्जा बाहेर पडते त्यातील केवळ दहा ते पंधरा टक्के ऊर्जेचाच वापर होतो. एवढ्या मोठ्या ऊर्जेचा अपव्यय होण्याचे मुख्य कारण म्हणजे खेड्यांतील पारंपारिक चुली होत. कारण या चुलीत लाकूड पेटण्यासाठी जो ऑक्सिजन लागतो तो उपलब्ध होत नाही आणि त्यामुळे धूर देखील जास्त प्रमाणात निर्माण होतो. त्यामुळे स्वयंपाकात व्यत्यय तर येतोच; परंतु स्वास्थ्याच्या दृष्टीने हे हानिकारकही आहे.

ग्रामीण स्त्रियांच्या या संकटाचे निवारण करण्यासाठी ग्रामीण ऊर्जा प्रयोगशाळा, बेंगलोर या संस्थेद्वारे कार्यक्षम लाकूड जाळण्याची चूल तयार करण्यात आली. यात लाकूड दीर्घकाळपर्यंत पेटत रहाते आणि वारंवार चुलीत फुंकण्याची गरज नाही. ही चूल चांगली उष्णता आणि जास्तीत जास्त इंधनाचा वापर करण्यास मदत करते. या चुलीची कार्यक्षमता पारंपारिक चुलीपेक्षा दुप्पट आहे.

(५) **बलवान बैलगाडी** : आज देखील दळणवळणाच्या साधनात बैलगाडी हेच शेतकऱ्याचे मुख्य साधन आहे. शेतावरून घरी किंवा घरून बाजारात मालाची ने–आण करण्यासाठी शेतकऱ्याला परवडण्यासारखे वाहन म्हणजे बैलगाडी होय; परंतु आजची खेड्यातली जी बैलगाडी आहे तिच्यात कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि बैलांना ती ओढण्यास कमी कष्टाची होईल असे त्यात बदल करण्यास वाव आहे, हे लक्षात आले.

महाराष्ट्रात सांगली येथे स्कूल ऑफ अॅप्लाइड रिसर्चने सुधारित बैलगाडी तयार केलेली आहे. ही बैलगाडी पारंपारिक बैलगाडीपेक्षा आकाराने मोठी असून जमिनीच्या चढ–उतारावर ती सहज चालू शकते. गाडीला सहज आणि हव्या त्या दिशेस वळवता येते.

(६) **शुद्ध पाण्याचे तंत्र** : आपल्या देशात अन्नाचा प्रश्न जेवढा भेसूर आहे तेवढाच पिण्याच्या पाण्याचा आणि त्याहीपेक्षा शुद्ध पाण्याचा तर भयानक. कारण या देशातली पन्नास टक्के मुले ही केवळ अशुद्ध पाण्यामुळे मृत्युमुखी पडतात. कारण सर्व रोगांचे मूळ हे अशुद्ध पाण्यात आहे. पाणी हेच आपले जीवन आहे. शुद्ध पाणी याचा अर्थ अधिक चांगले जीवन. म्हणून तर संयुक्त राष्ट्रसंघाने १९८१ ते १९९० या कालखंडाला आंतरराष्ट्रीय पिण्याच्या पाण्याची पूर्तता आणि स्वच्छता दशक म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूरच्या नॅशनल एनव्हॉयर्नमेंटल इंजिनियरिंग रिसर्च इन्स्टिट्यूटद्वारा विकसित क्लोरिनच्या टॅबलेटचे छोटे जलशुद्धीकरण युनिट उपयोगात आणलेले आहे. या पद्धतीत कोणत्याही इंधनाची आवश्यकता नाही. या पद्धतीचा वापर इतका सोपा आहे की, कोणताही खेडुत ही पद्धती वापरू शकतो व हाताळू शकतो.

वरील यंत्र–तंत्रज्ञानाव्यतिरिक्त पशुचाट, फेरोसीमेंट धान्य साठवण्याचे भांडे, कागदी पाटी, स्वस्त शौचालय, रोपे लावणारे यंत्र (ट्रान्सप्लांटर) पालापाचोळा किंवा कचरा व भुश्यापासून इंधनासाठी गोळे तयार करणारे यंत्र इ. इ. प्रौद्योगिकी प्रदर्शन व प्रशिक्षण कुवे येथील केंद्रात दिले जाईल.

या केंद्राची उभारणी सी. वी. आर. आय. चे शास्त्रज्ञ श्री. एम. पी. सिन्हा यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

या प्रौद्योगिक प्रदर्शन व प्रशिक्षण केंद्राचे संचालक म्हणून राजस्थानचे श्री. ओ. पी. माथूर यांची गोकुळ प्रकल्प प्रतिष्ठानने नियुक्ती केलेली आहे. सध्या या केंद्रात सुरेश गंगावणे आणि बालाजी पोफळे यांना प्रशिक्षित करून आजूबाजूच्या ग्रामीण भागात या विज्ञान–तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणासाठी व प्रदर्शनासाठी पाठवण्यात येणार आहे.

–प्रा. वैजनाथ कळसे

"मला शक्य असते तर मी या ग्रंथाच्या लाख प्रती काढून ग्रामीण भागातील मुलाबाळांच्या हाती पडतील अशी व्यवस्था केली असती."
– कलकत्त्याहून **श्री. बा. जोशी**

'कार्व्हर' पहिल्या आवृत्तीचे असे उत्स्फूर्त व भरघोस स्वागत झाले.

मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी शाळांसाठी – शिक्षणसंस्थांसाठी या ग्रंथाची शिफारस केली.

**दुसरी आवृत्ती**

**एक होता कार्व्हर** सौ. वीणा गवाणकर

मूल्य : तीस रुपये

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव, पुणे ३०

# आर्थर कोएस्लर
# कम्युनिझमबद्दलच्या भंगलेल्या स्वप्नांचा प्रवास

**त्या दिवशी त्याच्या मनातील कम्युनिस्ट जळमटं गळून पडली. रशिया एकमेव आशा आहे वगैरे स्वप्नं चक्काचूर झाली. त्या उध्वस्त आशा कोएस्लरनं फेकून दिल्या आणि नवाच कोएस्लर जन्माला आला!**

**रघुपती भट्ट**

आर्थर कोएस्लर कम्युनिस्ट झाला. कारण त्याची मानसिक अवस्था कम्युनिझम स्वीकारण्यासाठी परिपक्व झाली होती आणि श्रद्धेने मनाला एक बल येते. कोएस्लरच्या मते त्याच्या वेळचा सगळा समाजच एखाद्या श्रद्धेसाठी आसुसलेला होता.

कोएस्लरचा बाप सगळे उद्योग करून बसला होता. नवा एखादा उद्योग दिसला की, तो करण्यासाठी तो झटकन पुढे सरसावत असे. अशा प्रकारे आपली सगळी पुंजी त्यानं संपवली आणि तरुण कोएस्लरच्या खांद्यावर घरादाराची जबाबदारी पडली. विलक्षण तंगीत दिवस काढावे लागल्यामुळे संवदेनशील कोएस्लर कम्युनिझमकडे झुकत गेला. आसपासच्या लोकांचे दारिद्र्य पाहिले की, कोएस्लरला भांडवलदारांच्या करणीची चीड येऊ लागली. कम्युनिस्ट जाहीरनाम्यातील वाक्य न वाक्य त्याला पटू लागलं. सांस्कृतिक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रागतिक लेखकांच्या संघटना, प्रायोगिक नाट्य, रशियन सिनेमे, फॅसिझमविरुद्ध समित्या इ. होतेच. पहिल्या महायुद्धाचे परिणाम, महागाई, बेकारी, श्रद्धेचा अभाव इ. गोष्टींमुळे सगळा युरोपियन समाजच एखाद्या श्रद्धेसाठी तहानलेला होता.

ही नवी श्रद्धा लोकांना रशियामध्ये उदय पावलेल्या 'कम्युनिझम'मध्ये दिसली.

कोएस्लर त्या काळात बर्लिनमध्ये राहात होता. 'युलस्टीन' मटाच्या वृत्तपत्रांच्या बर्लिनहाउसमध्ये संपादकाची जागा तो भूषवत होता. 'सायन्स' विषयक लिहिण्यात त्याची ख्याती होती.

३१ डिसेंबर १९३१ ला त्याने कम्युनिस्ट पार्टीच्या सदस्यत्वासाठी अर्ज केला. खरं म्हणजे सदस्यात्वासाठी कोणत्या तरी प्रकारच्या कम्युनिस्ट सेलमध्ये जाणे ही पद्धत होती. यामध्ये रस्त्यावरचे सेल्स आणि कामगारासाठी सेल्स असे प्रकार होते; पण एका मित्राने सल्ला दिला की, एकदा 'सेल'मध्ये तो गेला की तो कम्युनिस्ट आहे हे जगजाहीर होईल आणि त्यामुळे 'डलस्टीन' मधील नोकरी त्याला गमावावी लागेल तेव्हा त्याने अर्ज करावा.

काही दिवसांतच त्याला उत्तर आले. पक्षाचा प्रतिनिधी त्याला एका गिरणीत भेटून चर्चा करणार होता. तो त्या गिरणीत गेला. तेथे त्याला अर्धा तास वाट पाहिल्यानंतर पक्षाचा प्रतिनिधी 'इनेलर' भेटला. त्याने कोएस्लरला एका हॉटेलमध्ये नेले. कोएस्लरचे डलस्टीन वृत्तपत्रसमूहात स्थान कोणत्या प्रकारचे आहे याची त्याने चौकशी केली.

कोएस्लरने उत्साहाने सगळी माहिती तर सांगितलीच; पण नोकरी सोडून देऊन पक्षप्रचारक म्हणून किंवा शक्य झाल्यास रशियामध्ये ट्रॅक्टर-ड्रायव्हर म्हणून काम करण्याची सुद्धा तयारी दाखवली (त्या वेळी रशियामध्ये ट्रॅक्टर-ड्रायव्हरची अत्यंत टंचाई होती, पण इनेलरनं सांगितलं की रशियामध्ये काम करण्याचा बहुमान पार्टीतील जुन्या लोकांसाठी आहे. प्रत्येक नव्या कम्युनिस्टाने आपल्या देशात क्रांती करण्यासाठी कार्यरत राहावे. कोएस्लर आहे त्या स्थितीतच पक्षकार्य करू शकेल.

त्या दिवशी कोएस्लरची सदस्यत्वाबद्दलची चाचणी पूर्ण झाली होती. कोएस्लरने त्याला मिळणारी राजकीय माहिती पक्षाला पुरवावी असं ठरलं. एका खोट्या नावाखाली त्याला मेंबरशिपकार्ड मिळणार होतं.कोएस्लरच्या एका मित्रानं त्याला सांगितलं होतं, 'तू जर शिक्षण पूर्ण केलं नाहीस तर तू उडाणटप्पूच राहशील.' या मित्राचं स्टाइनबर्ग हे नाव कोएस्लरनं पक्षसदस्यत्वासाठी घेतलं. 'कोएस्लर'ला संपर्क मनुष्य म्हणून कॉम्रेड एडगर नावाचा मनुष्य काम पाहणार होता आणि कॉम्रेड एडगरचा संपर्क कॉम्रेड पॉला नावाची मुलगी होती.

त्या वेळी कम्युनिस्ट पक्षावर जर्मनीत बंदी नव्हती तरी भूमिगत होण्याची त्याची तयारी चालली होती. त्यामुळे कोएस्लरला दिसलं की, पक्षामध्ये सर्वांना फक्त नावानंच बोलवलं जातं. कोणाचंही आडनाव किंवा पत्ता यांचा पत्ताच नव्हता. 'तुमच्या भाईवर प्रेम करा; पण त्याच्यावर तसूभरदेखील विश्वास ठेवू नका.' अशी त्या वेळी पक्षाची स्थिती होती.

'इनेलर'नं कार्ड देताना सांगितलं,

'आता तू पार्टीचा सदस्य आहेस तेव्हा मला किंवा पॉलाला 'तुम्ही' न म्हणता तू म्हणत जा!'

पहिल्या भेटीतच एडगरनं 'कोएस्लर'च्या बूर्झ्वा विचारसरणीवर हल्ला चढवला आणि 'द्वंद्वात्मक' विचारसरणीचा परिचय त्याला करून दिला. पॉला त्यांचं बोलणं टाइप करून घेत होती.

तेथून पुढे पॉला रिपोर्टस् टाइप करून घेऊ लागली. कोएस्लरला बोलताना येरझाऱ्या घालायची सवय होती. तशीच एडगरलासुद्धा असे. त्यामुळे त्यांच्या खोलीत काटकोनात फेऱ्या होत. पॉला आपल्या कामाव्यतिरिक्त बोलत नसे. आपल्या कॉम्रेडशी बोलताना ती एकदम फुलून येत असे; पण कोएस्लर म्हणजे तिच्या मते कितीही उपयुक्त मनुष्य असला तरी शेवटी परका मनुष्यच होता.

कोएस्लर आणि एडगर यांचे संबंध बरे होते; पण जाताना मात्र एडगर गेल्यानंतर पाच मिनिटांनी कोएस्लरने बाहेर पडावे असा करार होता. हे एडगरची गुप्तता राखण्याठी होते.

## कॉम्रेड इव्हान

बरेच दिवस असे कंटाळवाणे गाणे चालू राहिले. मग एक तरुण मुलगा कोएस्लरच्या दैनिकात काम करण्यासाठी आला. त्याचे वडील शासनयंत्रणेत अधिकारावर होते. त्याला कोएस्लरच्या हाताखाली देण्यात आले. कोएस्लरचे आणि त्याचे छान जमले. हळूहळू कोएस्लरच्या विचारसरणीचा त्याच्यावर प्रभाव पडला. त्याच्या घरी बडीबडी मंडळी येत असत, त्यामुळे त्याला बरेच ऐकायला मिळे. ही माहिती त्याने कोएस्लरला सांगायला सुरवात केली. त्यामुळे कोएस्लरचे पक्षाला जाणारे वृत्तांत थोडे भरीव बनू लागले.

एकदा कोएस्लरला समजलं की, प्रशियन पोलीस एस. ए. हेडक्वार्टर्सवर छापा घालणार आहेत; पण त्यानं माहिती देऊनसुद्धा पक्षाच्या पत्रानं त्याबद्दल लिहिलंच नाही. उलट समाजवादी नाझींचे चाळे खपवून घतात असं मूर्खासारखं त्यानं लिहिलं. सगळ्या वृत्तपत्रांनी उलट लिहिलेलं असताना कम्युनिस्ट पत्रानं असं का लिहिलं ते विचारल्यावर एडगर म्हणाला, 'अजून तू बूर्झ्वा विचार करतोस. समाजवाद्यांची ही करणी त्यांच्या मनोवृत्तीवर बुरखा पांघरण्यासाठी आहे. वरकरणी हे समाजवादी नाझीविरोधी दिसले तरी वस्तुनिष्ठ दृष्ठीनं ते नाझींचे चमचे आहेत. खरं म्हणजे समाजवादीच आमचे खरे शत्रू आहेत. कारण त्यांनी कामगारवर्गात दुही आणली.'

कोएस्लर म्हणाला की, १९१९ मध्ये कम्युनिस्ट पक्षच समाजवाद्यांपासून वेगळा झाला होता. एडगर म्हणाला, 'पुन्हा तू बूर्झ्वा विचार करतोयस. प्रथम आम्ही अल्पसंख्येत होतो; पण कष्टकरीवर्गाच्या क्रांतिकार्याची संकल्पना आमची. आमचे नेतृत्व नाकारून समाजवाद्यांनीच कष्टकरीवर्गात दुही आणली.'

हळूहळू कोएस्लर बूर्झ्वा विचार सोडून द्वंद्वात्मक विचार करायला शिकला. म्हणजे जे स्पष्ट दिसते त्याच्या अगदी वेगळा विचार करायचा. कारण कम्युनिस्ट पक्ष नैतिकदृष्ट्या आणि तात्त्विकदृष्ट्या न चुकणारा होता.

पक्षाची न चुकणारी अनेक धोरणे कोएस्लरला पाहायला मिळाली. एकदा नाझींबरोबर हातमिळवणी तर एकदा समाजवाद्यांबरोबर. 'फॅसिस्ट दिसेल तेथे प्रहार करा!' म्हणणे पुरातन ठरले.

एकदा कोएस्लरला जपानला पाठवायचे ठरले; पण पुन्हा ते फिसकटले. एक दिवस कोएस्लरच्या हाताखालील तरुण मुलाला साक्षात्कार झाला की, कोएस्लरला बातम्या पुरवून आपण देशद्रोह केलाय. त्याने तशा प्रकारचे लेखी निवेदन डलस्टीन समूहाला दिले. मग कोएस्लरची डलस्टीन वृत्तपत्रसमहातून हकालपट्टी झाली. कोएस्लरने हिशेबाने मिळालेले सगळे पैसे आईवडलांकडे पाठवून दिले आणि पक्षकार्य करण्यासाठी तो पूर्ण मोकळा झाला.

मग 'कॉम्रेड इव्हान' या नावाने तो 'रेड ब्लॉक' नावाच्या कम्युनिस्ट सेलमध्ये सामील झाला. या ब्लॉकमध्ये बरेच कलावंत आणि लेखक कॉम्रेडस् होते. या सर्वांनी या नव्या सदस्याचे आपल्या सेलमध्ये हार्दिक स्वागत केले.

या सेलचा प्रमुख होता आल्फ्रेड कांटोरोविट्झ नावाचा एक लेखक. त्याचा स्वभाव एकदम विनोदी होता. पुन्हा जेव्हा कोरास्लरने कम्युनिझमशी फारकत घेतली तेव्हा त्याच्याशी संबंध न तोडणारा तो एकटाच होता. या सेलमध्ये असतानाच कोरास्लरने बरीच पत्रके तयार केली. या सेलमध्ये डॉ. विल्यम राइश यांचा आणि कोएस्लरचा परिचय झाला. हे गृहस्थ फ्रॉइडची मते मार्क्सवादी दृष्टिकोनातून समजावून देत. त्यांनी नुकतेच एक पुस्तक लिहिले होते. त्यात त्यांनी असा सिद्धांत मांडला होता की, कष्टकरीवर्गामध्ये जी वैषयिक वैफल्याची भावना असते त्यामुळे त्यांच्या राजकीय प्रवृत्तीला बाधा येते. कामप्रवृत्तीच्या पूर्ण आणि निर्बंध तृप्तीशिवाय कष्टकरीवर्ग आपल्यामध्ये असलेल्या क्रांतिकारक शक्तीला आणि ऐतिहासिक कार्याला ओळखू शकणार नाही. या सेलमध्ये दोन नटही होते.

## सर्व तेच तेच

सेलमध्ये काही कायदेशीर तर काही बेकायदेशीर चालत असे. सेलमधील सभा या प्रमुखाच्या भाषणाने चालत. १९३२ मध्ये बऱ्याच निवडणुका झाल्या. त्या वेळी कोएस्लरने प्रचारकार्यात भाग घेतला. या प्रचारकार्याचे स्वरूप मजेदार असे. हे फक्त रविवारी सकाळीच केले जायचे. बेल दाबायची, दरवाज्यात पाय ठेवायचा (दरवाजा ताडकन् बंद केला जाऊ नये म्हणून) आणि मग प्रचारपत्रके द्यायची, राजकीय चर्चेला तोंड द्यायचे. थोडक्यात झाडण्या विकण्यासारखे जागतिक क्रांती विकायचे चालले होते. फक्त नाझींची घरे वगळायची. कारण तेथे गेल्यास बहुधा मार खायला लागण्याची शक्यता असायची.

कोएस्लरचे मत आहे की, मास्कोहून आदेश मिळणे, मास्कोने सूत्रे चालवणे हे जर नसते तर जर्मन कम्युनिस्टांची तयारी,त्याग, लोकांचा पाठिंबा या जोरावर जर्मनीत कम्युनिस्टांना संधी होती. 'आम्ही त्या निवडणुकांत हरलो, कारण आम्हाला वाटत होते त्याप्रमाणे आम्ही मासेमार नव्हतो.' कोएस्लर लिहितो, 'आम्ही गळाला लावलेले आमिष होतो.' वरून आलेल्या आज्ञा स्वीकारणे एवढेच त्या वेळी जर्मन कम्युनिस्टांना माहिती होते, त्यामुळे योग्य

उमेदवार निवडण्याचे स्वातंत्र्यही त्यांना नव्हते. इतक्या विचित्र गोष्टी त्या वेळी पक्षाकडून त्यांच्या मनावर ठासल्या की, कोएस्लरला 'श्रद्धा' या प्रवृत्तीचेच आश्चर्य वाटत राहाते.

पक्षाची विचारशक्ती कमकुवत होती; पण शब्दसंख्याही तशीच होती. 'कमी वाईट' हा एक शब्द होता. तुमचा प्रश्न अजून 'भरीव' हवा. (भरीव) 'सांप्रदायिक' हा एक शब्द.तुमचा कल डाव्या सांप्रदायिकत्वाकडे झुकतोय. लेनिनने एकदा हेरोस्ट्रोटसचे उदाहरण दिले होते. त्यामुळे गुन्हेगारी हेरोस्ट्रॅटिक मूर्खपणा बऱ्याच कॉम्रेडस्च्या तोंडी असायचा. या ठराविक शब्दसंख्येमुळे कम्युनिस्टांचे वेगवेगळे प्रवाह झटकन ओळखून यायचे. एकदा एक तरुण मुलगी गेस्टापोंना सापडली. तिच्याविरुद्ध काही पुरावा नव्हता. ती आत्मविश्वासपूर्वक पोलिसांबरोबर बोलत होती. अचानक 'भरीव' हा शब्द तिच्या तोंडात आला. लगेच तिला विचारण्यात आलं, 'हा शब्द कोठे शिकला?' ती मुलगी त्या शब्दामुळे हातोहात सापडली.

कम्युनिस्टांची साहित्यिक,कलात्मक आणि संगीतविषयक आवडसुद्धा अशीच मर्यादित होती. लेनिन कधी तरी म्हणाला होता, 'सगळ्या इतिहासाच्या पुस्तकांपेक्षा बाल्झॅकच्या कादंबऱ्यांनी मला फ्रान्सविषयी जास्त शिकवले.' त्यामुळे बालझॅक हा महान लेखक आणि इतर लेखकांच्या लिखाणात 'त्यांना ज्या किडणाऱ्या समाजाने जन्माला घातले त्या समाजाच्या विकृत जीवनमूल्यांचे परावर्तन होत होते. चित्रांच्या बाबतीत ज्या चित्रांमध्ये धूर ओकणारी चिमणी किंवा धुराडे अगर एखादा ट्रॅक्टर नाही ते 'पलायनवादी' चित्र. त्यामुळे प्रायोगिक चित्रांना बऱ्यापैकी डिमांड होता. पुन्हा तोही गेला. संगीतामध्ये 'सामूहिक आवाज' किंवा 'कोरस' सर्वांत उत्कृष्ट मानले जायचे. 'वैयक्तिक' दाखवायचे असेल तर ते विशिष्ट व्यक्तिनिरपेक्ष असे हवे असा नाटकाबाबत या कम्युनिस्टांचा आग्रह होता.

मानसशास्त्रात 'कामवासना' आणि वर्गाची जाणीव या दोन्ही ठळक गोष्टी महत्त्वाच्या. इतर सगळे बूर्झ्वा–फालतू असेही हे कम्युनिस्ट मानत.

'कामवासना' अधिकृतपणे मान्य असली तरी त्याबद्दल नेमके मत नसल्याचे कोएस्लरच्या लक्षात आले. कुटुंबसंस्था, विवाह (एकपत्नीत्व/एकपतित्व) ही भांडवलशाहीची अपत्ये होती किंवा समाजाने मान्य केलेली 'वेश्यावृत्ती'; पण स्वैराचारसुद्धा पक्षाला मान्य नव्हता. लेनिनने एक सिद्धांत मांडला 'कामतृप्ती' म्हणजे ग्लासभर पाण्याने तहान भागवणे एवढेच महत्त्वाचे. म्हणजे नीतिव्यवस्था (बूर्झ्वा!) वाईट. स्वैराचारही वाईट. त्यावर उपाय म्हणजे कष्टकऱ्यांची नीतिमत्ता. म्हणजे लग्न करायचे, जोडीदाराशी एकनिष्ठ राहून 'कष्टकरी' प्रजा निर्माण करणे. हे पुन्हा बूर्झ्वा नव्हे? नाही. पोलिसाहाती असणारी बंदूक आणि कष्टकरी क्रांतिकारकाच्या हाती असणारी बंदूक यात कसा फरक आहे? तोच फरक या दोन बूर्झ्वा नीतिमत्ता आणि कष्टकरी नीतिमत्तेत आहे.

त्याच त्याच म्हणी, वाक्प्रचार, एखादा प्रश्न थोडक्यात विचारायचा, मग पुन्हा तोच प्रश्न अगदी पूर्ण शब्दांत तीच ती विशेषणे वापरून उत्तर म्हणून वापरायचा. ट्रॉटस्कीचा 'क्रांतिकारक' भूतकाळ. उदार वृत्तपत्रांचे मानवतावादी बे बे. याला द्वंद्वात्मक विचारसरणी म्हणतात हे कोएस्लरच्या ध्यानात आले.

एक–दोन तास 'द्वंद्वात्मक' ऐकले तर तुम्ही मुलगा आहात की मुलगी आहात हे तुम्हाला कळणार नाही आणि जे पुन्हा 'अवतरणात' सांगितले जाईल त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवाल. कोएस्लर एक उदाहरण देतो. दोन तासांच्या द्वंद्वात्मक विचारसरणीनंतर तुमचे मत असं होईल. समाजवादी हे १) तुमचे मुख्य शत्रु आहेत. २) तुमचे नैसर्गिक मित्र आहेत आणि ३) समाजवादी आणि भांडवलशाही देश शेजारी शेजारी शांतपणे नांदू शकतील ४) सुखाने नांदू शकणार नाहीत.

एंजल्सने जेव्हा लिहिले की, एका देशामध्ये समाजवाद शक्य नाही तेव्हा म्हणे त्याला नेमकं उलटं म्हणायचं होतं आणि ज्यांना हे मान्य नाही ते फॅसिझमचे हस्तक आहेत. कारण १) तुमच्याशी सहमत न होऊन त्याने पक्षात दुही आणली २) पक्षाचं ऐक्य धोक्यात आणून फॅसिझमच्या विजयाची शक्यता त्याने निर्माण केली आणि म्हणून वरकरणी जरी फॅसिस्टांनी जरी समजा त्याचे हालहाल केलेले असले तरी वस्तुनिष्ठरीत्या त्याने फॅसिस्टांचा हस्तक म्हणून काम केलेय.

कोएस्लरला समजून आले की, जातिवंत कार्यकर्ते 'कष्टकरी समाज' पंथाचे असून बुद्धिमंतांचा द्वेष करतात. कोएस्लरसारखे लोक वैतागून, हालअपेष्टांना कंटाळून पक्षात आले होते, त्यांचा तो हक्क नव्हता. हे रात्रंदिवस त्यांच्या मनावर बिंबवले जात होते. लेनिनन सांगितलं म्हणून त्याच्यासारख्यांचं अस्तित्व सहन केलं जातं. कारण रशियामध्ये डॉक्टर, इंजिनियर आणि परदेशी तज्ज्ञांची गरज होती. नाझी 'उपयुक्त ज्यू'ना जसं वागवत होते तसं कोएस्लरसारख्यांना वागवण्यात येत होतं. पक्षातील 'आर्य' म्हणजे 'कष्टकरी समाज' पक्षसदस्यत्वासाठी अर्ज केला तर आजोबापर्यंतचं हे रेकॉर्ड पाहिलं जात होतं. त्यातही आदर्श कष्टकरी म्हणजे रशियातील कष्टकरी. त्यातही लेनिनग्राडमध्ये काम करणारे किंवा बाकूमधील तेलाच्या कारखान्यात काम करणारे 'महान' कष्टकरी!

'आदर्श कष्टकरी' कसा असतो? रुंद खांद्यांचा, मनमोकळा चेहरा आणि अगदी साधे अवयव असणारा. त्याला 'वर्गा'ची पूर्ण जाणीव असते. त्याची कामवासना पूर्ण नियंत्रणाखाली असते. तो बळकट आणि शांत असतो. तो जरी प्रेमळ असला तरी प्रसंगी क्रूर बनू शकतो. त्याचे पाय मोठे असतात, हात लांब असतात. 'क्रांती'ची गाणी म्हणण्यासाठी त्याचा आवाज खोल भरडा असतो.

कोएस्लरला समजलं की, जो कष्टकरी 'कम्युनिस्ट' असतो तो खरा कष्टकरी नसतोच.तो बहुतेक कामगारांतल्या सरंजामदार-

**कम्युनिस्टांची साहित्यिक, कलात्मक आणि संगीताची आवडसुद्धा मर्यादित होती!**

र्गातील असतो. बुद्धिमंतांच्या वर्गातल्या लोकांना 'कष्टकरी' बनणे शक्य नसले तरी त्यांनी शक्य तेवढा प्रयत्न करावा.

कोएस्लरच्या काही मित्रांनी 'नेकटाय' सोडून पोलो स्वेटर्स घालून, नखं काळी करून तसं बनण्याचा प्रयत्न केला; पण तो मूर्खपणा होता. खरा मार्ग म्हणजे सामान्य माणसाला जे समजणार नाही त्यापैकी न लिहिणे आणि त्यापेक्षा तसला विचारही न करणे.

कोएस्लरनं 'सामान' टाकून दिल्याप्रमाणे सगळा 'व्यासंग' टाकून दिला आणि फक्त अत्यावश्यक तेवढ्या 'मार्क्स' च्या उक्ती तेवढ्या संभाषणात वापरायला सुरुवात केली. मगच 'रेड ब्लॉक' मधील कष्टकरी कम्युनिस्टांबरोबर त्याची जवळीक निर्माण झाली.

¤

रेड ब्लॉकमधील सभा 'राजकारणा' वरच्या एखाद्या व्याख्यानानं सुरू होत. पुन्हा त्याच्यावर चर्चा होई. एखादा 'निर्णय' पक्षानं घेतलेला असेल तर त्यावर चर्चा नसे. बऱ्याच वेळा हे वरचे निर्णय 'सामुदायिक' मताविरुद्ध असत. ज्यांच्याविषयी असत, त्यांचा सल्लाही त्यात नसे. त्यामुळे जर्मन कम्युनिस्टाने दोन घोषणा काढल्या.'आघाडीवर चर्चा होत नाही' आणि 'कम्युनिस्ट कोठेही असो, तो आघाडीवरच असतो.'

त्यामुळे कोएस्लरला त्या चर्चेत नेहमी एकमत आढळे. एकापाठोपाठ एकाने उठून व्याख्यात्याला पुष्टी द्यायची. सर्वांनी 'ते योग्यच' याबद्दल झटून भाषणे झोडायची आणि मग एकदा असं झालं की, त्यांच्या नेत्यानं त्यांना सांगितलं येत्या निवडणुकीत 'प्रशियातील अन्न' 'सत्तर लाख बेकार जर्मन' किंवा 'नाझींचा धोका' याबद्दल पक्षाच्या घोषणा असणार नाहीत तर 'जपानी चाच्यांच्या आक्रमणाला चिनी कम्युनिस्ट कष्टकऱ्यांनी दिलेले तोंड' याबद्दल असतील. आता जर्मनीत यश मिळवायचे तर जर्मन प्रश्न महत्त्वाचे की कोणत्या दूरच्या देशातील ?

आपण आश्चर्यचकित झालो होतो की नाही हे कोएस्लरला आठवत नाही; पण त्याने त्या वेळी एक पत्रक लिहिले आणि त्यात सिद्ध केले की, बर्लिनमध्ये काय घडतेय यापेक्षा 'शांघाय' मध्ये काय चाललंय हे जर्मन कष्टकरी समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे आणि त्याबद्दल पक्षाच्या जिल्हा कार्यालयाने त्याला दिलेली शाबासकी पाहून त्याला खूप समाधान वाटले.

अशा चर्चा चालू असताना 'कष्टकरी' सदस्य अक्षरशः पेंगत असत. सगळे झाल्यावर त्यांच्यापैकी एखादा उठे आणि मुख्य व्याख्यानातील थोडा भाग मोठमोठ्याने म्हणून दाखवी. मग त्याचे विलक्षण कौतुक होत असे.

अशा प्रकारे कोएस्लरचे पक्षांतर्गत जीवन चाललेले असताना कम्युनिस्ट पक्षाने भूमिगत होण्याची तयारी चालवली होती. पाच पाच लोकांचे गट करण्याचे महत्कार्य चालू होते. या पायात एक नेता असणार होता. पक्षाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे महत्त्वाचे होते. कारण एखाद्या गटातील कोणाला पकडलेच तर तो जास्त लोकांची नावे देऊ शकणार नव्हता आणि या तयारीचा अर्थच असा होता की, कम्युनिस्ट पक्षाने नाझी पक्षाचा विजय हा अपरिहार्य म्हणून स्वीकारला होता.

'नाझी' आणि 'कम्युनिस्ट' यांचे छुपे युद्ध चालू होते, नाझी गाड्यांमधून येत आणि कम्युनिस्टांच्या सेलच्या खिडक्यांवर गोळीबार करून निघून जात. याला प्रत्युत्तर देण्यासाठी कम्युनिस्टांची एक युद्धआघाडी होती; पण कोमींजवळ गाड्या कमी होत्या. काही वेळा कोएस्लरची गाडी वापरली जायची. कोएस्लर ड्रायव्हर म्हणून काम करायचा आणि कम्युनिस्टवीर वेषांतर करून गाडीत बसायचे.

एकदा 'रेड ब्लॉक' वर हल्ला होणार अशी बातमी आली. त्या दिवशी कोएस्लर आणि त्याचे मित्र (तीसएक) काठ्या, सळया वगैरे घेऊन सज्ज होऊन बसले. त्याच दिवशी 'एर्न्स्ट' नावाचा एक कोएस्लरचा मित्र त्याच्याकडे आला होता. तो शास्त्रज्ञ होता. कोएस्लरवर जेव्हा गस्त घालण्याची पाळी आली, तेव्हा त्याने आपल्या या बुद्धिमान मित्राला बरोबर घेतले. 'ही अद्भुतरम्य बहादुरी का चाललीय ?' त्याने विचारले. कोएस्लरने जेव्हा त्याला सगळी कल्पना दिली तेव्हा तो म्हणाला, ते मला माहिती आहे; पण तुझ्या जीवनाचं तू काय करतोयस ?'

'मी क्रांतीला मदत करतोय !' कोएस्लर.

'का ?'—तो.

'मला माहिती नाही'—इति कोएस्लर.

तो मित्र म्हणाला, 'क्रांती कशी होते हे मला माहिती नाही; पण माझेवरचे चित्र पाहिले की, तुझे हे सारे मित्र 'पराभूत सैन्यातील पळून आलेले हताश' भिडू दिसताहेत.'

त्याचं खरं होतं हे कोएस्लरला नंतर पटलं. पॅपेनचं बंड झालं. एक लेफ्टनंट आणि आठ जवान यांनी प्रशियाचं समाजवादी सरकार पदच्युत केलं. ऐंशी लाख अनुयायी असणाऱ्या समाजवादी पक्षाला काही करता आलं नाही आणि कम्युनिस्ट पक्ष ज्यानं एक वर्षापूर्वीच 'समाजवादी' हेच आपले मुख्य शत्रू अशी घोषणा करून नाझींशी हातमिळवणी केली होती,त्यानं संपाची सिद्धता केली; पण त्याला अजिबात प्रतिसाद मिळाला नाही. कम्युनिस्ट 'भागूबाई' ठरले होते, समाजाची सहानुभूती घालवून बसले होते.

### रशियातले अनुभव

पण पक्षाच्या वृत्तपत्रानं जाहीर केलं, हा संप म्हणजे निर्विवाद विजय होय. समाजवादी निष्क्रिय असताना संप पुकारून पक्षानं समाजवाद्यांचं फॅसिस्ट स्वरूप उघड केलं आहे.'

आणि काही दिवसांतच सगळं कोसळलं. थालमान आणि इतर कम्युनिस्टनेत्यांना अटक झाली आणि जर्मन कम्युनिस्टांचे भवितव्य अंधारात आले. (आणि आजही चित्र तसेच आहे.) अनेक हजार कम्युनिस्टांची कत्तल झाली आणि तेवढेच किंवा जास्त छळ—छावण्यात रवाना झाले.

आणि मग रशिया आणि जर्मनीतील पक्षनेत्यांनी निर्णय घेतला की, या अंतर्गत शत्रूवर कारवाई झाली पाहिजे. हे अंतर्गत शत्रु समाजवाद्यांना शत्रु मानत होते. ते फॅसिस्टांचे हस्तक होते, लुटारू होते.

कम्युनिस्टांचा पराभव झाला नव्हता तर त्यांनी योजनापूर्वक माघार घेतली होती.

कोएस्लरला त्याच वर्षी रशियन व्हिसा मिळाला. या व्हिसावरून कोएस्लरला 'क्रांतिकारक लेखकांच्या' संघटनेचे रशि-

याला येण्याचे आमंत्रण मिळाले. 'बूर्झ्वा दृष्टीतून सोव्हिएट रशिया' नावाचे पुस्तक कोएस्लरने लिहायचे होते.

या पुस्तकाची कल्पना अशी–'के' नावाचा एक गृहस्थ रशियाविरुद्ध पूर्वग्रहाने दूषित असतो. तो रशियामध्ये येतो आणि तेथे पहिल्या पंचवार्षिक योजनेत रशियामध्ये झालेली प्रगती पाहून त्याच्या मनातील सर्व पूर्वग्रह नाहीसे होतात आणि तो कॉम्रेड के. बनतो. कोएस्लरला 'कम्युनिस्ट इंटरनॅशनल' साठी शिफारस मिळाली होती. त्यांनी परत सर्व सोव्हिएट अधिकाऱ्यांसाठी कोएस्लरला शिफारसपत्र दिलं. क्रांतिकारक कष्टकरी जर्मन लेखकांचा प्रतिनिधी असणाऱ्या कोएस्लरला सर्वांनी त्याच्या कार्यपूर्तीसाठी सहकार्य द्यावं असं त्यात होतं.

या पत्रामुळे कोएस्लरला सगळ्या रशियात गाईडशिवाय फिरता आलं. पाळीशिवाय रेल्वेची तिकिटे मिळाली, सरकारी निवासस्थानं मिळाली, फक्त सनदी नोकरांना मिळणारे अन्न मिळाले आणि हजारो रुबल्स कमाई झाली.

कोणत्याही शहरात तो गेला की त्याने स्थानिक लेखकांच्या संघटनेत जायचे. तेथे कार्ड दाखवले की तो स्थानिक पुढारी, बुद्धिमंत यांच्या भेटी घडवी. कोणाला तरी कोएस्लरची व्यवस्था पाहायला सांगितले जाई. ताबडतोब स्थानिक मासिकाच्या संपादकाला बोलावले जाई. तो म्हणे, तुमचे साहित्य प्रकाशित करण्याची खूप वर्षांपासून इच्छा आहे.' मग कोएस्लर एखादी जुनी कथा त्याला देऊन टाकी. मग २।३ हजार रुबलसचा चेक कोएस्लरला मिळे. मग एखादा प्रकाशक येऊन कोएस्लरच्या भावी पुस्तकाच्या त्या प्रादेशिक भाषेतील भाषांतराचे हक्क मागे. त्यानंतर करार होई आणि पुन्हा काही हजार रुबल्स.

अशा प्रकारे कोएस्लरने एकच कथा दहा प्रकाशकांना विकली आणि त्याच्या भावी पुस्तकाच्या रशियन, जर्मन, युक्रेनियन, जॉर्जियन आणि आर्मेनियन भाषांतील भाषांतराचे हक्क विकून बऱ्यापैकी पैसा जमा केला.

'कोएस्लर' नाव त्या वेळी फारसे प्रसिद्ध नव्हते, तरीसुद्धा रशियन प्रकाशकांनी न वाचलेल्या, न लिहिलेल्या पुस्तकांबद्दल पैसे दिले. कारण त्यांना वरून तसे आदेश होते. रशियात येणाऱ्या बऱ्याच लेखकांना आढळते की, त्यांचे साहित्य लोकांना अक्षरशः पाठ आहे; पण ते बऱ्याच गोष्टी विसरतात किंवा त्यांना माहिती नसतात.

त्यातील प्रमुख गोष्ट म्हणजे त्यांना भेटणारे लोक ठरलेले असतात आणि भेटीच्या वेळी काय बोलायचे याची संपूर्ण तयारी करून आलेले असतात.

कोएस्लरच्या दोघा जर्मन मित्रांना कित्येक वर्षे अशा प्रकारचे 'रॉयल्टी चेक्स' मिळत होते. पैकी एकाने कधीच पुस्तक लिहिले नाही. ते मात्र लोकशाहीतील भ्रष्टाचाराबद्दल कडाडून लिहीत; पण सोव्हिएट रशियाविरुद्ध त्यांनी अवाक्षरही लिहिले नाही.

रशिया म्हणजे लेखकांचा स्वर्ग असेल; पण स्वर्गातील फळे चाखण्यासाठी नाहीत. ती राखण्यासाठी जे देवदूत आहेत त्यांच्या हातात तळपणाऱ्या तरवारी आहेत.

रशियामध्ये कोएस्लरनं इतर जे पाहिलं ते तितकंसं समाधानकारक नव्हतं; पण पक्षांतर्गत प्रशिक्षणामुळे त्याने ते धक्के पचवून घेतले. हे अगदी नैसर्गिकच आहे असं त्यानं समजून घेतलं.

जे जे लोक त्याच्याशी बोलले त्यांना जणू काही कोणी ऐकेल याची भीती वाटत होती. त्यांचं बोलणं ऐकताना 'प्रावदा'चं संपादकीय ऐकतोय असं वाटे. त्याच त्या म्हणी, वाक्प्रचार सगळ्यांकडून ऐकून कोएस्लरला वाटलं की, या सगळ्यांनी कोणतं तरी संभाषणाचं पुस्तक वाचलंय आणि त्याचा ते सराव करताहेत.

१९३२/३३ ला युक्रेनमध्ये जो दुष्काळ पडला होता त्याची छाया कोएस्लरला पाहायला मिळाली. फाटके कपडे, खपाटी पोटं, भेगाळलेले पाय आणि आशेने पहाणारे चेहरे हजारोंच्या संख्येने भीक मागताना दिसत होते.

एका खोलीत चादरी लावून ३।३ कुटुंबे राहाताना दिसली. ज्या हॉटेलमध्ये कोएस्लर राहात होता त्या हॉटेलमधील मोलकरीण भुकेने भोवळ येऊन पडली. एकंदरीत रशियामध्ये असणारा 'कष्टकरी' समाज हालात दिवस काढत होता. एक किलो लोण्याची किंमत कष्टकऱ्याच्या एक महिन्याच्या पगाराएवढी होती. एक बुटाचा जोड घ्यायला दोन महिन्यांचा पगार पुरत नव्हता!

## राजकीय हालचाली

पण कोएस्लरला या गोष्टींचा धक्का जाणवला नाही. मोलकरीण भोवळ येऊन पडली कारण ती नुकतीच खेड्यावरून आलेली होती. तिला रेशनकार्ड मिळायचे होते. भिक्षा मागणारे हजारो खपाटी पोटांचे लोक म्हणजे 'जमिनीच्या सामुदयिकतेला विरोध करणारे एके काळचे जमीनदार' होते. ते क्रांतीचे शत्रू होते. कामापेक्षा भीक मागणे पसंत करणारे क्रांतीचे शत्रू इ. स्पष्टीकरणे कोएस्लरनं स्वीकारली.

कोएस्लर 'द्वंद्वात्मक' विचार करण्यात एवढा प्रवीण झाला होता की, त्याने रशियन नेत्यांपेक्षा अधिक उत्तमरीत्या सगळे समजावून घेतले.

जगातील इतर कष्टकरी सध्याच्या रशियन कष्टकऱ्यांपेक्षा सुखात असला तरी इतरांचे राहणीमान ढासळते आहे, रशियनांचे वाढते. पंचवार्षिक योजना पूर्ण होताना यामध्ये समानता येईल. रशियामध्ये पडलेला दुष्काळ अटळ होता. परदेशप्रवासावर बंदी, वृत्तपत्रांवर बंदी आणि भांडवलदारांनी निर्माण केलेली चित्रे या गोष्टींवर बंदी आवश्यक आहे, असं कोएस्लरलाही त्या वेळी वाटत होतं.

एकदा व्याख्यान संपल्यावर श्रोत्यांनी ज्या शंका विचारल्या त्यामुळे कोएस्लर स्तंभित झाला. शंका अशा– 'जेव्हा तुम्ही बूर्झ्वा प्रेस सोडला त्या वेळी रेशनकार्ड काढून घेऊन तुम्हाला ताबडतोब खोलीतून बाहेर फेकून देण्यात आलं होतं का?' आणि फ्रान्समध्ये भुकेने तडफडून किती 'श्रमिक कुटुंबे दररोज मरतात?' त्यांच्या विचारण्यात तथ्य नव्हते

**रशियामध्ये कोएस्लरनं इतर जे पाहिलं ते तितकंसं समाधानकारक नव्हतं!**

असे नाही; पण त्यांना सरकारकडून मिळ- णारी माहिती बरीच अतिरंजित असायची.

पण कोएस्लरला पटलं की, नव्यानं क्रांती झालेल्या आणि आजूबाजूनी शत्रू असलेल्या सोव्हिएट रशियाच्या भल्याच्या दृष्टीने प्रचारयंत्रणा आवश्यकच होती.

अत्यावश्यक खोटं, अत्यावश्यक निंदा, अत्यावश्यक बंधने, विरोधी गट आणि शत्रुवर्ग यांची अत्यावश्यक कत्तल, पुढच्या पिढीसाठी चालू पिढीचा अत्यावश्यक त्याग वगैरे सगळंच 'कम्युनिझम'मध्ये मुर- लेल्या कोएस्लरला त्या काळात समर्थनीय वाटलं.

१९३३ च्या हेमंतात त्यानं रशिया सोडला. त्यानं पुन्हा पक्षाची जुनी कचेरी पकडली. आता पक्षाचं धोरण बदललं होतं. 'शांततेसाठी व फॅसिझमविरोधी लोकप्रिय आघाडी' अशी एक घोषणा आली होती. आता त्यात समाजवादी कॅथॉलिक्स आणि हुजूर पक्षाचेही स्वागत होते. आता 'कम्युनिस्ट' हा उल्लेखच पक्षाकडून केला जात नव्हता. १९३५ मध्ये कम्युनिस्टनेता मार्शल काचिन याने समाजवादी फॅसिस्ट 'लिऑन ब्लम' याचे चुंबन घेतले आणि प्रेक्षकांनी दोन्ही पक्षांची बोधगीते गाइली. अखेरीस कष्टकरीवर्ग एकत्र झाला होता.

त्याचं कारण होतं. रशियाचं परराष्ट्र- धोरण बदललं होतं. राष्ट्रसंघात त्याला प्रवेश मिळाला होता; पण ते काही कारण असलं तरी लोकप्रिय आघाडीनं लोकांचं प्रेम मिळवलं होतं. कोएस्लरच्या दृष्टीनं तो त्याचा पार्टीतील दुसरा हनिमूनच होता.

त्यानंतरची कोएस्लरची जर्मनीतील चार वर्षे विलक्षण राजकीय धुलचालीत गेली. या कालावधीतच कोएस्लरला उपाशी राहाण्याचे अनेक प्रसंग अनुभवावे लागले. कम्युनिस्ट चळवळीचा नेता 'विली म्युझेमबर्ग' या राजकीय हालचालींचा सूत्रधार होता. तो श्रमिकांतूनच आलेला, विलक्षण मोहक, प्रभावी व्यक्तिमत्त्व लाभ- लेला आणि कामाची हातोटी लाभलेला असा होता. (कम्युनिस्ट पक्षापासून फुटून निघाल्यावर त्याचा अत्यंत रहस्यमय परि- स्थितीत खून झाला!)

विलीने 'राइश स्टॅग' दहनाची 'प्रति सुनावणी' घेतली. त्यामुळे नाझींच्या कारवाया जगाला कळल्या. त्याने अनेक समित्या स्थापल्या, अनेक पत्रके छापली. त्याच्या समित्यांवर जगद्विख्यात लोक असत. 'विली'चे नाव कोठेही नसायचे. कम्युनिस्ट-नेत्यांत 'विली' तेवढाच कोएस्लरला कामात राक्षस आढळला. त्याच्या उत्साहाला अॅक्टिव्हिटीजना मर्यादा नव्हती. त्याच्या प्रचारकार्यात जातिवंत कौशल्य होते. त्यांच्या संघटनकौशल्याला दुसरा पर्यायच नव्हता.

## स्पॅनिश तुरुंगवास

विलीबरोबर कोएस्लरने काम केले. मधल्या काळात कोएस्लरने पक्षासाठी एक 'विनोदी' नियतकालिक चालवले. भूमिगत कम्युनिस्टांच्या मुलांसाठी चालवलेल्या सदनात काम केले. फॅसिस्टांच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी स्थापन केलेल्या एका संस्थेचा तो संपादक होता. या काळात त्याने १२-१२ तास बिनपैशाचे किंवा अल्पमूल्यात पक्षाचे काम केले. त्या वेळी तो एका मुलांच्या हॉस्टेलमध्ये झोपत असे.

कोएस्लर म्हणतो, 'कामासारखे मादक पेय नाही. एखाद्याचा विवेक विकत घ्यायचा असेल तर त्याला एखादे काम धनापासून आणि प्रसिद्धी न मिळता करू देऊन त्यातून तो कोणते तरी लोकहितकारक काम करू पाहतोय असं वाटवण्याइतका दुसरा प्रभावी मार्ग नाही.'

कोएस्लर आणि त्याचे अनेक मित्र यांना कळून चुकले होते की, कम्युनिस्ट चळवळीत काही तरी चुकते आहे; पण सर्वांची श्रद्धा अशी की, कम्युनिस्ट चळवळ ही श्रमिकांची इतिहासाच्या इच्छेने निर्माण झालेली चळवळ आहे. एकदा तुम्ही त्यातून बाहेर पडलात तर मग तुम्हाला काही करता येणार नाही. आत राहा, तोंड बंद ठेवा, मगच कधी तरी जेव्हा रशिया आणि कम्युनिस्ट इंटरनॅशनल जागतिक क्रांती घडवून आणील तेव्हा तुम्हाला काही तरी करता येईल. तोपर्यंत तुम्हाला 'मान्य' 'अमान्य' 'स्वीकारणे' 'धिक्का- रणे' (त्याच गोष्टी!) तुमचे शब्द गिळणे, ओकारी परतवणे इत्यादी गोष्टी करून आपली उपयुक्तता कम्युनिस्ट पक्षाला पट- वून द्यावी लागेल.

१९३६ जुलैमध्ये जनरल फ्रँकोचा उठाव झाला. कोएस्लर 'विली' कडे गेला. 'स्पॅनिश प्रजासत्ताक सैन्यात' दाखल होण्याची इच्छा त्याने व्यक्त केली. त्याच्या- कडे 'पेस्ट लॉइड' चे प्रेसकार्ड होते. (कोएस्लरने कधीही त्या पत्रासाठी लिहिले नव्हते; पण प्रत्येक हंगेरियन निर्वासिताकडे अशा प्रकारची प्रेसकार्डस् असायची.) विलीने त्याला सुचवले की, त्याने फ्रँकोच्या हेड- क्वार्टर्सलाच भेट द्यावी.

'पेस्टर लॉइड' हे गरीब वृत्तपत्र होते, तेव्हा कोएस्लरने आपल्या दुसऱ्या एका ओळखीचा उपयोग करून घ्यायचे ठरवले.

पण फ्रँकोच्या ठाण्यात पोचल्याबरोबर त्याला त्यांनी ओळखले आणि 'कम्युनिस्ट' म्हणून त्याची संभावना झाली; पण सुदैवाने तो तेथून निसटला; पण तेवढ्या अवधीत त्यानं फ्रँकोच्या सैन्यात वापरली जाणारी जर्मन विमाने आणि जर्मन वैमानिक पाहिले आणि ताबडतोब लंडनमधील 'न्यू क्रॉनि- कल' कडे त्याने हे गुपित पाठवले आणि त्यामुळे 'फ्रँको' च्या रोषाला तो पात्र झाला. त्यानंतर ६ महिन्यांनी फ्रँकोच्या सैनिकांनी त्याला पकडले.

चार महिने त्याला स्पॅनिश तुरुंगवास भोगावा लागला. सगळ्यात वाईट असा सक्तीचा एकांतवास त्याला भोगावा लागला. आपल्याला हे ठार करणार याची त्याला खात्री होती. फक्त प्राथमिक अशा ज्या गोष्टी त्या वगळून सरळ आपल्याला गोळी घालावी अशी त्याची इच्छा होती. ब्रिटिश सरकारने हस्तक्षेप केल्यामुळे त्याची मुक्तता झाली. या मधल्या तुरुंगवासात 'कोए- स्लर'ची मनोवृत्ती पूर्ण बदलली. त्याला त्याची जाणीव झाली नाही; पण बाहेर कोएस्लर वेगळा होता. छळाची भीती, अनैसर्गिक प्रकारच्या मृत्यूची भीती हे त्याचे कारण असावे असे त्याला वाटते. कदाचित् या लढ्यात गरीब खेडूत ठार मारण्यासाठी नेले जात असताना गयावया करत असलेले, रडत असलेले त्याने पाहिले, त्याचाही तो परिणाम असेल आणि कदाचित् सक्तीच्या एकांतवासात मनाची एक अवस्था, ज्यामुळे मनास सुख लाभते, त्यामुळेही त्याच्यात बदल झाला असेल असे त्याला वाटते.

कोएस्लर म्हणतो, 'मी शिकलो की,

'माणूस' ही वास्तवता आहे आणि 'मनुष्यजात' किंवा 'माणसे' हा अत्यंत पोकळ शब्द आहे. राजकारणाच्या गणितात माणसे घटक म्हणून वापरता येणार नाहीत. कारण त्यांचे वागणे 'शून्य' आणि 'अनंत' यांच्या प्रतीकाप्रमाणे असल्यामुळे ती सगळं गणित चुकवून टाकतात. ध्येयामुळं साधनांचे समर्थन होत असेल तर ते अगदी मर्यादित स्वरूपातच. नीतितत्त्वं ही समाजाच्या उपयुक्ततेचं कार्य नव्हेत. उदारता, दान-मदत ही बूर्झ्वा समाजाची भावावस्था नव्हे तर या दोन्ही गोष्टी म्हणजे 'गुरुत्वाकर्षणा' प्रमाणे समाजाला त्याच्या 'कक्षात' फिरवत ठेवणाऱ्या आहेत. संस्कृतीच्या रक्षक आहेत.

¤

कोएस्लरची कहाणी इथे संपत नाही. आपण आता कम्युनिस्ट राहिलो नाही हे त्याला झटकन समजले नाही. सुटल्याबरोबर त्याने पक्षाला तार केली, 'हे दक्षलक्षांनो, मी तुम्हाला प्रेमभराने आलिंगन देतो आहे' यापेक्षा विचित्र म्हणजे त्याच तारेत त्याने पुढे लिहिले, 'माझी पोटदुखी आता बरी झालीय.' पोटदुखी म्हणजे पक्षातला तऱ्हेवाईकपणा वगैरे.

त्यानंतर त्याने एक पुस्तक लिहिले. त्यानंतर न्यू क्रॉनिकलतर्फे एक मध्यपूर्वेची सफर, त्यानंतर एक व्याख्यानमालिका, काही वेळा कम्युनिस्ट श्रोते स्पेनमध्ये ट्रॉटस्काइट कम्युनिस्ट कसा विद्रोह करताहेत हे विचारत. (पक्षाच्या मते ते फ्रँकोचे हस्तक होते.) पण कोएस्लर सांगे की, कदाचित् त्याचे स्वतःचे वेगळे ध्येय वाईट असेल; पण त्यांना विद्रोही म्हणता येणार नाही. विशेष म्हणजे या उत्तरावर ब्रिटनमधील कम्युनिस्ट पक्षाचे समाधान होत असे.

त्यानंतर 'कोएस्लर'ला धक्कादायक माहिती समजत गेली. रशियन 'शुद्धीकरण' मोहिमेत त्याचा मेव्हणा आणि त्याच्या दोन घनिष्ठ मित्रांना अटक झाली होती. त्याचा मेव्हणा कम्युनिस्ट पक्षाचा सदस्य होता आणि व्होल्गा जर्मन रिपब्लिकमधील एका दवाखान्यात डॉक्टर होता. पेशंटच्या अंगात 'गरमी'ची इंजेक्शन्स टोचली असा त्याच्यावर आरोप होता. मॅक्झिम गॉर्कीवर अशाच एका इंजेक्शनने विषप्रयोग केला असा आरोप ठेवून चौघा डॉक्टरांना सरकारने (क्रांतिकारक श्रमिकवर्गाच्या!) कामाला लावले होते. गुप्तरोग बरे होत नाहीत असे सांगून त्याने लोकांचे नीतिधैर्य खचवले होते आणि अर्थातच तो परकीय सत्तेचा हस्तक होता. त्याला अटक झाल्यानंतर त्याचे काय झाले याचा पत्ता नाही.

अलेक्स वाइसबर्ग आणि त्याची बायको इव्हा ही दोघेही कोएस्लरचे घनिष्ठ मित्र. अलेक्स हा फिजिसिस्ट होता आणि 'युक्रेन' मध्ये काम करत होता. कोएस्लरने ज्या वेळी रशिया सोडले तेव्हा त्याला तो पोचवायला आला होता. 'काहीही घडो, सोव्हिएट रशियाचा फलक उंच धरून ठेव' असं त्यानं सांगितलं होतं. त्याला १९३७ मध्ये अटक झाली. त्यानं म्हणे स्टॅलिन कॉकशेसला शिकारीला आल्यावर त्याला मारण्यासाठी वीस डाकू नेमले होते! कबुलीजबाब त्याने नाकारला. तुरुंगात ३ वर्षे काढल्यावर त्याला गेस्टापोंच्या ताब्यात देण्यात आलं. (त्यातूनही तो वाचला आणि त्यानं एक पुस्तकही लिहिलंय.)

ॲलेक्सची बायको इव्हा हिनं चहाच्या कपाचा जो नमुना तयार केला होता त्याच्यावर 'स्वस्तिक' काढल्याचा एक आरोप आणि येणाऱ्या अधिवेशनात स्टॅलिनला मारण्यासाठी दोन पिस्तोल्स अंथरुणाखाली दडवल्याचा एक आरोप तिच्यावर करण्यात आला. १८ महिने तिने तुरुंगात काढले. या काळात रशियन पोलिसांनी तिला पश्चात्तापदग्ध पापी' बनवण्याचा प्रयत्न केला. तिनं नस कापून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला; पण त्यातूनही ती वाचली आणि मॉस्कोमधील ऑस्ट्रियन राजदूत (तिच्या आईचा तो मित्र होता.) यानं मध्यस्थी केल्यामुळं ती वाचली, तिची सुटका झाली.

इव्हाची आणि कोएस्लरची ती सुटून आल्यावर भेट झाली. तिचे तुरुंगातील अनुभव आणि रशियन अधिकाऱ्यांची कबुलीजबाब घेण्याची पद्धत यामुळे कोएस्लर अक्षरशः हादरला. त्याच्या प्रसिद्ध 'डार्कनेस ॲट नून' (मध्यान्हीचा अंधार) या कादंबरीचा बराच मसाला इव्हाने त्याला पुरवला. ॲलेक्सची सुटका होण्यासाठी आपण सर्व प्रयत्न करू असे आश्वासन कोएस्लरने इव्हाला दिले. त्यापूर्वीच आइन्स्टाइनने मध्यस्थी केली होती. कोएस्लरने तीन नोबेल प्राईजविजेत्या फिजिसिस्टांच्या सह्या करून घेऊन स्टॅलिनला एक तार केली. तारेचा मजकूर असा होता की, व्हाइसबर्गवरचे आरोप जाहीर करावेत आणि त्याची जाहीर सुनावणी व्हावी. ज्यांनी सह्या केल्या ते सगळे सोव्हिएट रशियाच्या बाजूचे होते. नंतर ते पक्षसदस्यही बनले. तरी त्यांनी सह्या केल्या होत्या?

अलेक्सची केस त्यांना माहीत होती. त्यांनाच नव्हे तर कोएस्लर म्हणतो 'सगळ्या मार्क्सवादी शास्त्रज्ञांना, बुद्धिमंतांना, पत्रकारांना रशियात काय चाललेय हे माहीत होते. प्रत्येकाचा कोणी तरी मित्र, नातेवाईक एक तर छळ छावण्यात गेला होता, खोटे आरोप लावले जाऊन गोळीने उडवला गेला होता!'

### पक्षसदस्यत्वाचा राजिनामा

पण तरी सुद्धा कोएस्लर म्हणतो, आम्ही लोकशाहीतील न्यायपद्धतीचे दोष काढत होतो. आमचे आवाज अन्यायाविरुद्ध चूप बसत होते. आमच्या घरातील एखादा आमच्यासमोरच न खटला चालवता, कोणताही आरोप सिद्ध नसताना जगाच्या सहाव्या लोकसंख्येच्या समाजवादी, श्रमिक सत्तेच्या देशात गोळीने उडवला जाताना सुद्धा...'

सोव्हिएट रशियामध्ये जेवढे क्रांतिकारक मारले गेले, जेवढे देशभक्त गुलामीत जखडले गेले तेवढे इतिहासात इतर कधीही आणि इतर कोणत्याही देशात उदाहरण शोधायचे म्हटले तर सापडणार नाहीत असं कोएस्लरला वाटतं.

आणि या सर्व गोष्टींची सध्याच्या सर्व कम्युनिस्टांना, मार्क्सवाद्यांना कल्पना आहे; पण ते मूग गिळून चूप आहेत.

कोएस्लरनं स्वतःच सात वर्षांहून अधिक

**इव्हाचे तुरुंगातले अनुभव ऐकून कोएस्लर अक्षरशः हादरला!**

काळ अनंत मूर्खपणा आणि गुन्हे मार्क्सिझमच्या नावाखाली होताना पाहिले. कम्युनिझमवर अशा परिस्थितीत श्रद्धा ठेवणे म्हणजे स्वतःच्या फसवणुकीचा दोरावरून चालण्याचा खेळ असं तो म्हणतो. हा खेळ चांगली, बुद्धिमान माणसे खेळत आली ही बाब उदास करणारी आहे.

कोएस्लरचे हे दोन मित्र ज्या कारणासाठी बळी दिले जात होते त्यापेक्षा ते दोन मित्र व त्यांचं जीवन त्याला महत्त्वाचं वाटलं. त्यानं त्यांची बाजू घेतली.

कम्युनिस्ट पक्षाने कोएस्लरच्या कृत्याची दखल घेतली नाही. कारण तो 'स्पेन'मध्ये तुरुंगात असताना पक्षाने प्रसिद्धीसाठी त्याचा उपयोग करून घेतला होता. आता त्याला थोडा वेळ तसंच राहू देणं योग्य होतं. पुन्हा मग त्याला फ्रँकोचा एजंट म्हणून जाहीर करता आलं असतं.

१९३८ मध्ये त्याला एकदा 'स्पेन'वर भाषण द्यायचे होते. भाषण देण्यापूर्वी पक्षाचा एक प्रतिनिधी त्याला भेटला. स्पेनमधील ट्रॉटस्काइट कम्युनिस्ट हे फ्रँकोचे हस्तक असल्याबद्दलचा एक परिच्छेद कोएस्लरने आपल्या भाषणात घालावा असं त्यानं सुचवलं. कोएस्लरनं ते नाकारलं. पुन्हा त्यानं कोएस्लरला सुचवलं की, त्यानं आपल्या भाषणाचा मसुदा त्याला दाखवावा आणि त्यातील मुद्द्यांवर चर्चा करावी. कोएस्लरनं त्याही गोष्टीला नकार दिला.

कोएस्लरचं भाषण ज्यांच्यासमोर झालं ते सगळे निर्वासित झालेले बुद्धिमंत होते. त्यापैकी निम्मे कम्युनिस्ट होते. भाषणाचा विषय होता 'स्पेनमधील परिस्थिती' कोएस्लरच्या भाषणात पक्षावर किंवा सोव्हिएट रशियावर त्यामध्ये टीकेचा एक शब्द नव्हता; पण त्यामध्ये काही वाक्ये कम्युनिस्टांना खुपणारी होती. त्यातील पहिले असे: 'कोणतीही चळवळ, पक्ष किंवा व्यक्ती बिनचूक असू शकत नाही.' दुसरे 'शत्रूची गय करणे हे तुमच्या ध्येयाच्यामागे दुसऱ्या मार्गाने धावणाऱ्या मित्राला शिक्षा करण्यासारखेच मूर्खपणाचे आहे' आणि तिसरे वाक्य म्हणजे प्रसिद्ध जर्मन लेखक थॉमस मान याचे अवतरण होते. 'उपयुक्त असत्यापेक्षा धक्का देणारे सत्यच चांगले असते.'

या तीन वाक्यांमधून कोएस्लरनं कम्युनिस्ट चळवळीवर आघात केला होता. स्वतःला बिनचूक समजणारी, शत्रूची गय करून एकाच ध्येयासाठी दुसऱ्या मार्गाने जाणाऱ्या मित्रांचा घात करणारी, कटु सत्यापेक्षा सुखद वाटणाऱ्या असत्याच्या मागे जाणारी कम्युनिस्ट चळवळ. कोएस्लरला हे सात वर्षांच्या अनुभवानंतर पटले होते. कम्युनिस्ट नसलेल्या श्रोत्यांनी टाळ्या वाजवल्या; पण कम्युनिस्ट श्रोते मात्र गंभीर चेहरा करून बसले होते. नाझींना 'सर्व माणसे समान असतात, त्यात वंश, वर्ण भेद नसतात.' असे सांगितल्यावर त्यांची जी प्रतिक्रिया झाली असती तीच कोएस्लरला या महात्म्यामध्ये आढळली.

त्यानंतर काही दिवसांनी पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडे कोएस्लरने आपल्या पक्षसदस्याचा राजीनामा पाठवून दिला.

## स्वप्नभूमी भंगली !

कोएस्लरनं पक्षाचा राजीनामा दिला होता; पण सोव्हिएट रशियाशी निष्ठा व्यक्त केली होती. एकंदरीत पक्षपद्धत, नोकरशाहीची वाढ आणि मानवी हक्कांची पायमल्ली या गोष्टींना त्यानं विरोध दर्शवला होता; पण त्यानं असा विश्वास व्यक्त केला होता की, किसानकामगारांच्या राज्याचा पाया मजबूत आहे. उत्पादनसाधनांच्या राष्ट्रीयीकरणातून ती व्यवस्था कशीही परत समाजवादाच्या रस्त्यावर येईल असं त्यानं म्हटलं होतं.

काहीही होवो; पण सोव्हिएट रशिया हा एकमेव या जलद सडत निघालेल्या जगातला आशेचा तारा आहे असं आर्थर कोएस्लरनं आपल्या कम्युनिस्ट पक्षाला सादर केलेल्या राजिनाम्यात म्हटलं होतं. म्हणजे कोएस्लरमध्ये अजून आशेला जागा होती.

त्यानंतर, कोएस्करला जे सहप्रवासी भेटले, त्यांमध्ये द्वंद्वात्मक तोल निसटलेले बरेच होते. त्यात ट्रॉटस्काइटस् होते, प्रजासमाजवादी होते. अधिकारशाही मागणारे उदारमतवादीही होते. सगळ्यांचा आधार निसटला होता. सगळेच त्रिशंकू—अवस्थेत तरंगत होते.

शेवटचा आघात झाला तो मॉस्कोला रिबेनट्रॉपने भेट दिली तेव्हा. रिबेनट्रॉपच्या स्वागतासाठी रशियातील श्रमिकांच्या कष्टकरीवर्गाच्या सरकारने 'स्वस्तिक' उभारला आणि श्रमिकांच्या सैन्याच्या बँडने नाझींचे गाणे वाजवून दाखवले त्याचदिवशी कोएस्लरच्या आशा संपल्या !

त्या दिवशी त्याच्या मनातील कम्युनिस्ट जळमटं गळून पडली. त्या दिवशी 'रशिया' एकमेव आशा आहे वगैरे स्वप्नं चक्काचूर झाली. त्या उध्वस्त आशा कोएस्लरनं फेकून दिल्या आणि नवाच कोएस्लर जन्माला आला !

'स्वप्नभूमी' असत्य आहे हे दिसत असतानासुद्धा पुन्हा स्वप्नात राहावेसे वाटते. कम्युनिस्ट रशियाबद्दलच्या स्वप्नांचे असेच झाले. त्यांच्याकडे नव्या कल्पना व घोषणांना तोटा नाही.

निष्पाप, निरागस बुद्धिमंतांना 'शांतता' 'लोकशाही' 'श्रमिकांचे राज्य' 'प्रगतीकडे घोडदौड' अशा स्वप्नांना विकणारे बेरड म्हणजे हे कम्युनिस्ट विचारवंत. कोएस्लरनं त्या स्वप्नांना उघड करण्याचे, त्यांचे बुरखे फाडण्याचे प्रयत्न केले.

जेकबनं लाबानच्या मेंढ्यांची निगराणी सात वर्षे केली. कारण त्याला जेकबची सुंदर मुलगी रॅचेल मिळणार होती. तो काळ संपल्यावर, त्याच्या अंधाऱ्या तंबूत नव-वधूने प्रवेश केला. सकाळ झाल्यावर, त्याला आढळलं की, त्याने सुंदर रॅचेलवर प्रेम केलं नव्हतं तर अत्यंत कुरूप अशी 'ली' त्याच्या तंबूत होती !

कोएस्लरनंसुद्धा कम्युनिस्ट पक्षात सात वर्षे काढली. त्यालाही जेकबला जो अनुभव आला तोच अनुभव आला.

बिचारा कोएस्लर, तो म्हणतो की, जेकबनं पुन्हा सात वर्षे काम केलं आणि त्याला सुंदर, मोहमयी रॅचेल मिळाली. जो आतापर्यंत भास होता तो आता प्रत्यक्ष रक्तामांसाच्या वस्तुस्थितीत बदलला होता.

कोएस्लरलासुद्धा पुन्हा सात वर्षे काम करून तरी जेकबसारखी रॅचेल मिळेल का ?

□

('The God That Failed' मधील 'आॅर्थर, कोएस्लर'च्या निबंधावरून)

# कोएस्लर : परामानसशास्त्रासाठी पाच लक्ष पौंड

प्रा. व. वि. अकोलकर

सुविख्यात लेखक श्री. आर्थर कोएस्लर व त्यांच्या पत्नी श्रीमती सिंथिआ यांनी १९८३ च्या मार्चमध्ये आत्महत्याकेली.त यांनी आपल्या मृत्युपत्रान्वये पाच लाख पौंडांहून अधिक रक्कम Psychic Phenomena चे–परामानसिक घटनांचे–संशोधनासाठी ग्रेट-ब्रिटनमध्ये अध्यासन (Chair) स्थापन व्हावे यासाठी दिली आहे. एडिनबर्ग विद्यापीठात ते अध्यासन स्थापन होत आहे.

सामान्य लोकांकडून अचिकित्सक वृत्तीने स्वीकारल्या जाणाऱ्या 'चमत्कारिक' घटनांची शहानिशा करण्याची योग्य पद्धती विद्यापीठे घालून देऊ शकतात, अशा घटनांच्या निमित्ताने सैद्धांतिक पातळीवर निर्माण होणाऱ्या प्रश्नांची जाणीवही लोकांना करून देऊ शकतात. तसेच विद्यापीठांमध्ये परामानसशास्त्रीय संशोधन-कार्यासाठी विविध विज्ञानशाखांतील तज्ज्ञांचे सहकार्य लाभण्याची व विचारांचे आदानप्रदान होण्याची शक्यता असते. ह्या गोष्टी लक्षात घेऊन अनेक देशांमध्ये विद्यापीठीय स्तरावर परामानसशास्त्रीय संशोधनार्थ प्रयोगशाळा व आर्थिक सोयी निर्माण होत गेल्या आहेत. अमेरिकेत स्टॅनफोर्ड विद्यापीठात (१९११ मध्ये), ड्यूक विद्यापीठात (१९२७ मध्ये), हार्वर्ड विद्यापीठात (१९२० पासून), 'न्यूयॉर्क सिटी', 'कॅलिफोर्निया', 'पिट्सबर्ग', 'डेन्वर', 'व्हर्जिनिया', तसेच 'एमोरी' विद्यापीठांमध्ये संशोधन होत आहे. कॅनडात 'मॅगिल', फ्रान्समध्ये 'स्ट्रासबोर्ग', हॉलंडमध्ये 'उट्रेक्ट' आणि 'ॲमस्टरडॅम', दक्षिण आफ्रिकेत 'विटर वॉटर स्रांद' भारतात 'आंध्र' या विद्यापीठांमध्ये (१९६७ पासून) विद्यापीठस्तरावर परामानसशास्त्रीय संशोधन होत आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये, लंडन विद्यापीठाने १९४० मध्ये, ऑक्सफोर्ड विद्यापीठाने १९४४ मध्ये, केंब्रीज विद्यापीठाने १९४३ मध्ये अमेरिकेत १९३३ मध्ये, ड्यूक विद्यापीठाने १९६९ मध्ये तसेच १९७१ मध्ये आंध्र विद्यापीठाने परामानसशास्त्रीय संशोधने मान्य करून पीएच. डी., डी. फिल. यांसारख्या पदव्या दिलेल्या आहेत. सोव्हिएट संघराज्यात प्रो. डॉ. एल. एल. वॅसिलिएव यांनी The Mysterious Phenomena of the Human Psyche (१९५९) आणि Experiments in Mental Suggestion (१९६३) ह्या ग्रंथांमध्ये प्रसिद्ध केलेल्या टेलेपथीविषयक प्रयोगांचे महत्त्व लगेच रशियन सरकारला जाणवले व लवकरच शासकीय मान्यता प्राप्त असलेली पहिली प्रयोगशाळा लेनिनग्राद येथे स्थापन झाली. अमेरिकन असोसिएशन फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स (AAAS) ने परामानसशास्त्रीय संशोधन हे वैज्ञानिक स्वरूपाचे असल्याचे मान्य करून १९६९ मध्ये पॅरासायकॉलॉजिकल असोसिएशनला संलग्न करून घेतले आहे. अनेक विद्यालयात, संस्थांमध्ये व रुग्णालयांतही परामानसशास्त्रीय संशोधन होत आहे.

आर्थर कोएस्लरांच्या पाच लक्ष पौंडांच्या देणगीतून एडिनबर्ग विद्यापीठात स्थापन होणारे अध्यासन म्हणजे विद्यापीठ-पातळीवर परामानसशास्त्रास उत्तरोत्तर मिळत गेलेल्या मान्यतेचा आणखी एक टप्पा होय.

## विज्ञान व परामानसशास्त्र

कोएस्लर यांना परामानसशास्त्राविषयी आस्था होती व परामानसशास्त्रीय संशोधनासंबंधीचे त्यांचे विचार त्यांनी The Case of the Midwife Toad (१९७१), Roots of Co-incidence (१९७२) या ग्रंथांमध्ये तसेच १९७२ साली पॅरासायकॉलॉजिकल असोसिएशनच्या मेळाव्यास उद्देशून केलेल्या भाषणात व्यक्त केले आहेत.

'द केस ऑफ द मिडवाइफ टोड' मध्ये त्यांनी पुढील आशयाचे विचार व्यक्त केले आहेत–

अतींद्रिय संवेदन (ESP) या स्वरूपाच्या घटना तुरळकपणे घडतात. प्रयोगशाळेत त्यांना पकडता येत नाही. त्यामुळे परामानसशास्त्राचे टीकाकार म्हणत असतात की, त्याविषयीचे संशोधन करणारी मंडळी प्रस्थापित विज्ञानाने मिथ्या ठरविलेल्या संकल्पनांचा पडताळा घेऊ पहात असतात. निर्णायक म्हणून मानल्या जाणाऱ्या परामानसशास्त्रीय प्रयोगांची पुनरावृत्ती करण्याचे संघटित प्रयत्न करावयाचे सोडून हे टीकाकार त्या प्रयोगांबाबत फसवणुकीचा संशय व्यक्त करीत राहतात. परिणामी पुढील दुश्चक्र निर्माण होते : अजून त्या संकल्पनांना सिद्धांता (theory) चा आधार नाही म्हणून तद्विषयक पुरेसे संशोधनकार्य होत नाही आणि संशोधन होत नाही म्हणून सिद्धांतस्थापनेचा टप्पा गाठला जात नाही! असाच प्रकार अर्जित गुणविशेषांचे अनुवंशतः संक्रमण–इनहेरिटन्स ऑफ अक्वायर्ड कॅरेक्टरिस्टिक्स–या प्रश्नाच्या बाबतीत दिसतो.

नोबेल पारितोषिक मिळालेले तीन वैज्ञानिक, रॉयल सोसायटीचे दहा सन्मान्य सभासद (फेलोज) आणि नऊ थोर पदार्थवैज्ञानिक यांनी परामानसशास्त्रीय संशोधनकार्याबाबत आस्था दर्शवली ती का? कोएस्लर म्हणतात की, ह्या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या आत्मवृत्तामध्ये सापडते. ह्या वैज्ञानिकांनी वैफल्यभावपूर्वक असा विचार व्यक्त केला आहे की, 'सत् (Reality) चे फक्त काही पैलूच विज्ञान स्पष्ट करते. अंतिम प्रश्नांची उत्तरे विज्ञानास गवसणार नाहीत.'

भौतिक विज्ञानाच्या क्षेत्रात चालत असलेल्या मूर्तिभंजनाचा आढावा कोएस्लरनी घेतला आहे. तो असा :

समुद्राची भरती चंद्रामुळे, ही केपलरची कल्पना निसर्गनियमाविरुद्ध गणली गेली; पण न्यूटनने स्वीकारली. गुरुत्वाकर्षण हे माध्यम निरपेक्ष असू शकते. ह्या कल्पनेसही पदार्थविज्ञान हळूहळू सरावत गेले. आता तर क्वांटम फिजिक्सने पूर्वीच्या कल्पनांची मोडतोडच चालवली आहे. आइन्स्टीन, ब्रॉग्ली व श्रोडिंगर यांनी जड द्रव्याचे ( matter ) द्रव्यत्वच निकालात काढले आहे. कारण-कार्यनियतत्व ह्याऐवजी ह्यायसेनबुर्गचे अनिश्चितता व संभवनीयता Indeterminism व Probability ही तत्त्वे मान्यता पावत आहेत. अवकाशामध्ये ऋणभार असलेल्या विद्युत्कणांचे खड्डे आहेत असे डिरॅक यांनी म्हटले आहे. एकच कण एकाच वेळी दोन छिद्रांमधून जाऊ शकतो असे थॉमसनने म्हटले आहे. शून्य स्थिरभार ( rest mass) असलेल्या प्रोटॉनमधून घनभारयुक्त असे दोन प्रोटॉन निर्माण होतात ही कल्पना पुढे येत आहे. विश्वामध्ये काळी छिद्रे असून त्यामध्ये तारे शोषले जाऊन नष्ट होतात असेही कोणी म्हणत आहेत. अशा या मोडतोडीचा उल्लेख करून कोएस्लरनी म्हटले आहे की, या मूर्तिभंजनाच्या मानाने, प्रस्थापित विज्ञानास परामानसशास्त्रामुळे बसत असलेले हादरे सौम्यच म्हणावे लागतील. अर्थात हे हादरे सुसह्य करून घेण्याचे व परामानसशास्त्राची सांगड भौतिक विज्ञानाशी घालण्याचे प्रयत्नही होऊ लागले आहेत......त्यांपैकी काही कोएस्लरना असमाधानकारक वाटत. उदा.–अतींद्रिय संवेदनांचे स्पष्टीकरण क्वांटम सिद्धांतांच्या आधारे देण्याचा प्रयत्न; Mindons नामक कणांच्या बनलेल्या सर्वव्यापी मनोद्रव्यांची ए. फिरग्रॉफ यांची कल्पना; मेंदूतील मज्जातंतूंना थेट जाऊन भिडणाऱ्या Psi–trons ची ॲड्रिअन डॉब्स यांनी केलेली कल्पना. मात्र, 'कालांतराने विज्ञान व परामानसशास्त्र एकत्र येण्याची चिन्हे दिसत आहेत.' असे कोएस्लरनी म्हटले आहे, या संदर्भात, त्यांनी, विज्ञान हे 'निर्यांत्रिक सत्' ( non-mechanical Reality ) ह्या संकल्पनेकडे वाटचाल करीत आहे. या गोष्टीकडे लक्ष वेधले आहे. सर जेम्स यांनी १९३७ मध्ये म्हटले होते की, विश्व हे एका विराट विचाराचा (Thought) आविष्कार असावा असे जवळजवळ सर्व पदार्थवैज्ञानिकांना वाटू लागले आहे. मनाचा प्रभाव भौतिक द्रव्यावर पडतो असे ध्वनित करणारी विचारसरणी पदार्थविज्ञानात दिसू लागली आहे.

## योगायोग

Engene Wigner या नोबेल पारितोषिकाच्या मानकऱ्यांच्या मते भौतिक जगताचा जसा मनावर, तसा मनाचाही भौतिक जगावर परिणाम होत असतो. जीवविज्ञानाच्या क्षेत्रात, नोबेल पारितोषिकविजेते सर जॉन एक्लस यांनी प्रयोगांचा आधार देऊन १९५३ मध्ये म्हटले की, व्यक्तीच्या संकल्पाचा (Volition) परिणाम म्हणून मेंदूतील एक मज्जातंतू प्रभावित होऊन मेंदूतील क्षेत्रांमध्ये प्रक्रिया घडून येत असतात. इतर मज्जावैज्ञानिकांनीही दाखवून दिले आहे की, 'व्यक्ती संकल्पबलाने स्वायत्तमज्जासंस्था ( ANS ) प्रभावित करू शकते. तसेच मेंदूतील विद्युत्लहरी अल्फालयीत आणू शकते.

Roots of Co-incidence ह्या ग्रंथात तसेच १९७२ च्या त्यांच्या भाषणात कोएस्लर यांनी 'योगायोग' म्हणून मानल्या जाणाऱ्या घटनांविषयी त्याचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात : भौतिक विज्ञानाची कारण-कार्यसंबंधाविषयीची ( Causality) सध्याची कल्पना ज्यांच्या बाबतीत लागू पडत नाही; परंतु ज्या एकमेकींशी संबद्ध ( linked ) असल्याचे दिसते व ज्या अर्थमय असतात अशा घटना कधीकधी घडून येत असतात. अशा घटना अगदीच 'अ–कस्मात्' घडून येणे हे असंभवनीय होय. भौतिक कारण त्व तत्त्वाहून भिन्न ( a-causal ) असे तत्त्व अशा तथाकथित 'योगायोगां'च्या मुळाशी असले पाहिजे' अशा घटनांची दोन उदाहरणे कोएस्लरनी उद्धृत केली आहेत. ( १ ) त्यांना एका वास्तुशिल्पज्ञाने कळवले की, त्याच्या भावाने लंडनच्या भुयारी रेल्वेपुढे उडी टाकली होती. त्याचे माकडहाड पिचले, ओटीपोट फाटले व आतड्यांना जबर जखमा झाल्या; परंतु गाडीचे चाक त्याच्या अंगावरून जाण्यापूर्वीच गाडी थांबली. कारण एका डब्यातील एकजणाकडून अगदी अभावितपणे धोक्याची साखळी ओढली गेली होती. ( २ ). जे. बी. प्रीस्टले यांनी कळवलेला त्यांचा पुढील अनुभव हे दुसरे उदाहरण. लंडन येथे सदरलॅंडची तीन चित्रे जॅकवेस्ताने ( पत्नीने ) खरेदी केली होती व ती चित्रे लंडनहून आमचे घरी आली होती. एक चित्र टोळाचे –ग्रास हॉपरचे–होते. त्या दिवशी रात्री पत्नी पलंगावर जाते तोच तेथे तिला 'टिवटिवल्या'चा आवाज ऐकू आला. पांघरुणे मागे ओढून पाहते तो बिछान्यात एक टोळ होता! आमच्या घरात किंवा त्या खोलीत त्यापूर्वी कधीसुद्धा टोळ दिसला नव्हता!' असे 'योगायोग', विश्वातील सर्व गोष्टींमध्ये अदृश्य असे अन्वयन असते ( hidden affinities ) असे मत व्यक्त करून कोएस्लर म्हणतात, 'ही कल्पना पुरातन आहे व यातुविद्येस ( magic ) आणि ज्योतिषविद्येस तीच आधारभूत आहे. विज्ञानही ह्या कल्पनेकडे झुकत आहे. कारण. अखिल विश्वाचे नियंत्रण पृथ्वीवरील ( intertial forces ) वर असते हे अर्न्स्ट माख यांचे मत आइन्स्टिन यांनाही मान्य होते व ते मत आता पदार्थविज्ञानाचे अवियोज्य अंग बनले आहे.'

कोएस्लरची धारणा अशी होती की, 'निसर्गामध्ये कार्यकारणतत्त्वाबरोबरच, एकमेकींना विरोधी नव्हे तर एकमेकींना पूरक अशा दोन प्रवृत्ती असतात. ह्या दोन प्रवृत्ती सजीव सृष्टीमध्ये विशेषकरून दिसून येतात. एक म्हणजे पृथगात्मकता प्रवृत्ती ( Individuation ) आणि दुसरी म्हणजे एकात्मसमष्टि प्रवृत्ती ( Integration ). स्वतःचे वैशिष्ट्य असलेला प्रत्येक घटकसुद्धा अनेक घटकांची एकात्म अशी समष्टि असते आणि संपूर्ण विश्व ही सुद्धा एकात्मसमष्टी आहे. ह्या दोन प्रवृत्ती परामानसिक घटनांच्या रूपाने प्रकर्षाने अभिव्यंजित होत असतात.'

# दार्जिलिंग - इथे हिमालय गगना भिडतो !

अशोक कुलकर्णी

दरवर्षाप्रमाणे या वर्षीही सुट्टी घेऊन भारतातलं कुठलं ठिकाण पाहायला जायचं यावर मी व सौ. चर्चा करीत होतो. त्या वेळी घरी आलेल्या माझ्या एका स्नेह्याने सांगितलं, 'हे बघ, तू दार्जिलिंगला जा !'

'अरे, तशी हिलस्टेशन्स मी पुष्कळ पाहिली आहेत!' मी म्हटलं.

'दार्जिलिंग' हे नाव किती विचित्र आहे, त्यामुळंसुद्धा तिकडे जावंसं वाटत नाही.'– सौ. चा शेरा.

'अहो वहिनी, माझं ऐका. दार्जिलिंगला जाच तुम्ही. तिथला सूर्योदय एकदा पाहिलात की तुमच्या मनातून तो मावळणारच नाही !' –स्नेही.

स्नेही एवढं सांगतोच आहे तर मग जाऊ या दार्जिलिंगला असं आम्ही ठरवलं. मग मी तिथे कसं जायचं, काय पहायचं वगैरे माहिती जमा करू लागलो. एका पुस्तकात 'दार्जिलिंग' या नावाचा अर्थ मिळाला. दार्जिलिंग या शब्दात दोन संस्कृत शब्द आहेत. 'दुर्जय' आणि 'लिंग' म्हणजे असाध्य असे शंकराचे स्थान. तिबेटी भाषेप्रमाणे विचार केला तर या नावाची फोड 'दोर्जे+लिंग' अशी होते. 'दोर्जे' म्हणजे गडगडाटासह होणारा पाऊस आणि 'लिंग' म्हणजे जागा. जेथे गडगडाटासह जोरदार पाऊस होत असतो अशा या भगवान शंकराच्या दुर्जय अशा स्थानी आम्ही जाणार होतो.

दार्जिलिंगला जाण्यासाठी प्रथम मुंबई ते कलकत्ता हा रेल्वेप्रवास केला. तेथून बसने सिलीगुडीला गेलो. सिलीगुडीहून पुढचा प्रवास जीपने, मिनीबसने अथवा छोट्या टॉय-ट्रेनने करावा लागतो. आम्ही मिनीबसचा सुखदायी, मनात वाटेल तेव्हा बस थांबवून बसमधून उतरून सृष्टिसौंदर्य पाहता येईल असा पर्याय स्वीकारला.

सिलीगुडी ते दार्जिलिंग हा प्रवास आहे सारा ऐंशी किलोमीटरचा. सपाट रस्त्यावर एवढ्या प्रवासाला फार तर दोन तास लागतील; पण हा सर्व रस्ता चढणीचा आणि अवघड वळणांचा आहे. त्यामुळे या प्रवासाला साडेतीन तास लागतात !

दुपारी दीडच्या सुमारास आमची छोटी बस सुरू झाली...

सिलीगुडीतून बाहेर पडून दार्जिलिंगच्या चढणीला लागेपर्यंत सुरुवातीला दुतर्फा चहाचे मळे दिसत होते. नंतर दाट जंगलातून वाटचाल सुरू झाली. एका बाजूला हिरव्यागार झाडीने झाकलेला डोंगर तर दुसरीकडे हिरव्या झाडीने भरलेली दरी. रस्त्याच्या दोहो बाजूंनाही सलामी द्यायला झाडांची रांग उभी आणि रस्त्यावर झाडांच्या फांद्यांच्या, पानांच्या फटीफटीतून खाली येऊन सूर्यकिरणांची रांगोळी पसरली होती.

आता झाडीचे दृश्य बदलले. दोन्हीकडे पुन्हा चहाचे मळे दिसू लागले. चहाची चौकोनी चौकोनी झुडुपे दूरवर पसरलेली आणि त्यातून जाणाऱ्या छोट्या पाऊलवाटा. यत्र-तत्र-सर्वत्र हिरव्या तारुण्याची नव्हाळी पसरलेली. सपाटीवरील चहाच्या झुडुपांपेक्षा ही उतरणीवरील झुडुपे जास्त गर्द हिरवी दिसत होती.

'सुखना' गावावरून बस पुढे गेली. साग, साल, टूनच्या झाडांची दाटी वाढू लागली. हिरव्या रंगात अधूनमधून पांढऱ्या, जांभळ्या, गुलबक्षी रंगाच्या बोगनवेली, केशरी रंगाची पॉइनसेटिया दिसू लागली. या झाडांच्या दाटीतून काळे-कबरे खडक आपली डोकी वर काढत होते.

सिलीगुडीहून निघाल्यानंतर दार्जिलिंगचा चढ सुरू झाल्यानंतर जवळजवळ सर्व रस्ताभर टॉय-ट्रेनचा छोटा रेल्वेमार्ग साथ देत होता. गंमतीचा भाग म्हणजे, या रेल्वेरुळांना कोणत्याही तऱ्हेची संरक्षक भिंत नव्हती. रस्त्याच्या कडेला रेल्वेमार्ग आपला सुखैनैव धावतोय. त्यावरून कुणीही चालावं-धावावं-खेळावं. जसा काही आपल्याच मालकीचा ! मध्येच गाडी आली की तेवढ्या वेळापुरतं रुळावरून बाजूला व्हावं. पुन्हा त्यावर बागडावं.

आता आमची बस सर्वांकित वळणे घेत कठीण चढ आक्रमू लागली. मध्येच 'ढिढारिया' गाव आलं. या गावाचं मूळ नाव 'तीन धारियाँ'! पहाडातून पडणाऱ्या तीन धारी प्रपातामुळे हे नाव सुचलं असावं आणि नेहमीप्रमाणे इंग्रजांनी त्याचं 'ढिडारिया' करून वाट लावली. उदकाच्या (पाण्याच्या) धारा बरसणाऱ्या डोंगरांनी वेढलेल्या ठिकाणी वसलेल्या 'उदकमंडळम' या काव्यमय नावाचं नाही का इंग्रजांनी 'उटकमंड' असं विचित्र करून टाकलं ? त्यातलाच हा बट्ट्याबोळी प्रकार !

## घाटातलं सौंदर्य

आता सर्वत्र तुटके कडे दिसू लागले. त्यावर उगवलेली रंगीबेरंगी रानटी फुलं आमचं लक्ष वेधून घेऊ लागली आणि दूरवर दिसू लागला एक सुंदर छोटा धबधबा. त्याचं नाव 'पगला झरा !' दार्जिलिंगच्या पहाडात पडणाऱ्या पावसाचं हे मुख्य आउटलेट. हा झरा पावसाळ्यात डोंगरातील मोठमोठे दगडगोटे उडवीत अतिशय वेगाने खाली कोसळतो. मग या झऱ्याजवळून जाणं धोकादायक होतं म्हणून याला 'पगला झरा' असं नाव ठेवलंय. या बंगालराज्यात पगला हा शब्द लाडका दिसतोय. या राज्यातल्या एका नदीचं नाव 'पागलवंडी' आहे तर एका झाडाची पानं वेडीवाकडी आहेत म्हणून त्याचं नाव 'पगला झाड' आहे.

'पगल्या' झऱ्यापाशी आमची बस येताच आम्ही बस थांबवून खाली उतरलो. अतिशय उंचावरून काळ्या-कबऱ्या खडकातून

कोसळणारा तो शुभ्र फेसाळता प्रपात पाहून आम्ही अवाक् झालो. आजूबाजूचे उंच हिरव्या झाडींने झाकलेले पहाड... वरती निळे आकाश... निसर्गाच्या या भव्य रूपात आम्ही अगदी खुजे खुजे वाटू लागलो. आम्ही या प्रपाताचे फोटो घेतले. त्याचं रुचकर पाणी प्यालो. आजूबाजूच्या रानटी फुलांचा उग्रगंध नाकात भरून घेतला आणि मार्गस्थ झालो. या पगल्या झऱ्याचं साम्य आपला रायगड अर्धा चढून गेल्यावर वाटेत रस्त्यावर कोसळणाऱ्या धबधब्याशी आहे. त्याला तेथील मावळेलोक 'झोत' म्हणतात. तोही पावसाळ्यात असाच अतिवेगाने कोसळतो. काही वेळा तर हा झोत सर्व रस्त्याच्या वर पाण्याची कमान उभी करतो.

## आम्हीही गर्दीत मिसळलो

आता थंडी वाढू लागली. प्रत्येकाने आपली 'थंडी-प्रावरणे' अंगावर लपेटून घेतली. बस पांढऱ्या ऑर्किडच्या जंगलातून पुढे चालली होती. तेवढ्यात कुर्सेआंगचा बाजार आला. बाजारातून बस जाताना तेथील लहान मुले आम्हाला हात हलवून 'टाटा' 'टाटा' करीत ओरडत होती. त्यांचे ते लाल गुलाबी आनंदी चेहरे आणि ओरडणं पाहून वाटे की ही मुलं असं ओरडायला थकतच नसतील. मनात विचार आला की, या गोजिरवाण्या मुलांचं भवितव्य काय ? रानटी फुलांसारखे उगवायचे नि उन्हात कोळपून मावळायचे !

हळूहळू सावल्या लांबू लागल्या. कातर वेळ झाल्यासारखी बाहेरची दृश्यं अंधुक होऊ लागली. डोंगरावरील हिरवी झाडे आपलं हिरवेपण गमावू लागली. त्यावर काळसर अंधाराची पुटं चढू लागली. मोठमोठे डोंगर एखाद्या काळ्याकभिन्न राक्षसासारखे दिसू लागले. आकाशातील लालसर छटाही कमी होऊ लागली. दरीत धुकं पसरलं होतं. सर्वत्र अंधाराचं साम्राज्य पसरू लागलं. वातावरणात एक प्रकारचा भीतिदायक खिन्नपणा दाटू लागला. मला वाटलं आता संध्याकाळचे साडेसहा वाजून गेले असतील म्हणून घड्याळात पाहिलं तो काय ? फक्त साडेचार वाजले होते. म्हणजे एवढ्या लौकर इथे काळोख होतो !

थंडी खूप वाढली होती. एकेक छोटी छोटी गावे झपाट्याने मागे टाकीत आमची बस मार्ग आक्रमीत होती आणि संध्याकाळी ५ च्या सुमारास मुंबईतील रात्री आठ वाजल्यासारखा काळोख पडला असताना थंडीत कुडकुडत आम्ही दार्जिलिंगला आमच्या ठरलेल्या हॉटेलच्या दाराशी उतरलो. हॉटेलमधल्या खोलीचा ताबा घेऊन तेथील ब्लँकेट-रजयांत स्वतःला लपेटून घेतलं.

दार्जिलिंगमधील आमचा रहिवास तीन-चार दिवसांचा. तेवढ्या काळात इथे काय काय पाहायचं. माझी व सौंची त्यावर चर्चा झाली. मी म्हटलं, 'शक्य असतील ती सर्व स्थळं पाहायची.' सौ. चं म्हणणं 'महत्त्वाची नेमकी स्थळं पाहू. उगंच हे पाहिलं ते पाहिलं असा बडेजाव मिरवायला स्थळांची खोगिरभरती नको !' मी म्हटलं, 'एखादं स्थळ प्रेक्षणीय नाही हे ठरवण्यासाठी तरी ते स्थळ पाहायला हवंच की !' शेवटी हो ना करीत काही स्थळं पाहायची ठरविली. सुरुवात म्हटलं बुद्धमंदिरापासून करावी. कारण बुद्धमंदीर हा प्रकार आपल्याला तसा नवीनच.

तेव्हा 'घूम'च्या बुद्धमंदिराकडे आमची जीप धावू लागली. पिवळ्या संप्रदायातील बुद्धधर्मीयांचं मंदीर शंभराहून अधिक वर्षांचं जुनं आहे. लाल-निळ्या-सोनेरी रंगातलं हे डोंगरउतारावरील मंदीर आपलं लक्ष वेधून घेतं. मंदिराबाहेर तिबेटी पद्धतीचे प्रार्थनेचे ध्वज आणि पताका दिसल्या. आपण जशा कागदी पताका लावतो तशाच; पण या पताका कापडी असतात. पांढऱ्या अथवा पिवळ्या रंगाच्या मलमलसारख्या कापडाच्या या पताका असून त्यावर तिबेटी भाषेत काळ्या अक्षरांत बुद्धधर्मीय प्रार्थना लिहिलेल्या असतात. मंदिरात प्रवेश केल्यावर आत केवढा तरी मोठा पितळेचा काळपटलेला ड्रम फिरताना दिसला. त्यावर मंत्रही कोरलेले होते. मंदिरात येणारे-जाणारे बुद्धधर्मीय हा ड्रम हाताने फिरवत तोंडाने मंत्र पुटपुटत त्याभोवती प्रदक्षिणा घालीत होते. हा ड्रम म्हणजे बुद्धधर्मीयांचं प्रार्थनाचक्र. ही चक्रे हातात धरून फिरवण्याइतक्या छोट्या आकाराचीही मिळतात. एके काळी तिबेटमध्ये असं भविष्य वर्तवलं होतं की, तिबेटी भूमीवर ज्या वेळी प्रार्थनाचक्राशिवाय अन्य चक्रे येतील त्या वेळी तिबेटच्या स्वातंत्र्याला खग्रास ग्रहण लागेल आणि चिन्यांच्या जीपच्या, विमानांच्या चाकांनी-चक्रांनी तिबेटी भूमीवर प्रवेश करून तिच्या स्वातंत्र्याला खग्रास ग्रहण लावलंच की !

मंदिराच्या आत भव्य सोनेरी बुद्धमूर्ती होती. मूर्तीसमोर लोण्याचे दिवे लावलेले होते. अॅल्युमिनियमच्या छोट्या छोट्या तसराळ्यांतून स्वच्छ नितळ असं पाणी भरून ती देवासमोर रांगेने ठेवलेली होती. बुद्धधर्मात त्या तसराळ्यांच्या संख्येला, ते ठेवण्याच्या पद्धतीलाही महत्त्व असावं ! मंदिराच्या आत एका बाजूला गोरीगोबरी बसक्या नाकाची गोजिरवाणी बुद्धधर्मीय मुले त्यांचा धार्मिक वेष घालून काही पाठ म्हणत होती.

मंदीर पाहून झालं. आता आमचा मोर्चा वळवला 'बतासिया लूप'कडे. 'बतासिया' म्हणजे 'भन्नाट वाऱ्याची जागा' आणि 'लूप' म्हणजे 'वळण.' तेथे गेल्यावर तेथला थंड बोचरा भणाणणारा अनुभवल्यावर बतासियाचा अर्थ आणखीनच समजला. या वळणावर दार्जिलिंगची दोन फूट रुंदीच्या ट्रॅकची पिटुकली रेल्वे इंग्रजी आठच्या आकाराचं वळण घेऊन एकदम एक हजार फूट खाली उतरते. हे वळण म्हणजे तत्कालीन तंत्रज्ञानाची मोठी झेप म्हणता येईल. ही छोटी रेल्वेगाडी प्रवाशांना घेऊन सिलीगुडी ते दार्जिलिंग हा प्रवास करते. तशा टॉयट्रेन माथेरान उटी वगैरे ठिकाणीही आहेत; पण ही सर्वांत जुनी असावी. सप्टेंबर १९८१ मध्ये या रेल्वेने नॉट-आउट सेंचरी मारलीन ! या रेल्वेला त्या काळी ४३ लाख रुपये खर्च आला म्हणे. या बतासिया लूपलाच मुळी ११ लाख लागले. रेल्वे होण्यापूर्वी कलकत्त्याहून दार्जिलिंगला येणे म्हणजे महादिव्य असे. तट्टावरून, बैलगाडीतून, वाटेतील नद्यांना बोटीतून पार करीत, चालत असे प्रवासाचे सर्व प्रकार करून पंधरा दिवसांच्या भयानक दगदगीतून, कष्टातून आणि खर्चातून पार पडल्यावर माणूस दार्जिलिंगला पोचत असे. रेल्वेच्या सोईनंतर हा प्रवास अडीच दिवसांवर आला आणि दगदगीऐवजी घाटातून सृष्टिसौंदर्य पाहात पाहात प्रवास करण्याची सोय झाली. या रेल्वे-लूपभोवतीचा डांबरी रस्ताही त्याच लूपच्या आकाराचा आहे. डांबरी रस्त्याच्या आतल्या अंगाला रेल्वेचं लूप आणि लूपच्या आतील भागात प्रवाशांची गर्दी. आम्हीही त्या गर्दीत मिसळलो, तेवढ्यात एक इंजिन व एक डबा असलेली छोटी गाडी पफ् पफ् करीत धूर

सोडीत आली. लूपवरून झोकदार वळणे घेत जाऊ लागली. आम्ही गार्डाला हात हलवून अभिवादन केले. या जागेत आम्हाला रंगीत फोटो काढणारे, इन्स्टंट फोटो काढणारे, दुर्बिणीतून कांचनगंगेची शिखरे दाखविणारे, माळा–खडे–लोकरी वस्त्रे विकणारे असे पोटापाण्याचे अनेक धंदे करणारे दार्जिलिंगवासी भेटले. मग मी व सौने फोटो काढून घेतला. दुर्बिणीतून येथून दिसणारी कांचनगंगेची हिमधवल शिखरे पाहिली. मजा आली. दुर्बिणीतून पाहताना या शिखरांना सहज हात लावता येईल असं वाटलं; पण .. सत्य आणि सत्याचा आभास यात अंतर असतंच ना !

## माणसांची वैशिष्टये

दार्जिलिंगमध्ये डोंगरउताारावर हिमालयीन प्राण्यांचे एक 'प्राणिसंग्रहालय' आहे. तेथे अस्वल, चित्ता, सायबेरियन वाघ वगैरेही प्राणी आहेत; पण कुठल्याही शहरात प्राणिसंग्रहालय असतंच त्यामुळं इथलं प्राणिसंग्रहालय पाहण्यात काही खास रस वाटला नाही..

या प्राणिसंग्रहालयाच्या शेवटच्या टोकाला 'माउंटेनिअरिंग इन्स्टिटयूट' आहे. शेर्पा तेनसिंगाने एव्हरेस्टशिखर जिंकल्यावर ही संस्था स्थापण्याची कल्पना आली. त्याप्रमाणे या संस्थेची स्थापना १९५४ साली झाली. संस्थेच्या प्रवेशद्वाराशीच दोरीच्या साहाय्याने पर्वत चढणाऱ्या गिर्यारोहणाचं चित्र आहे. तेथे गिर्यारोहणासाठी लागणाऱ्या अवजाराचे प्रदर्शन आहे. 'गिर्यारोहण' या विषयावरील पुस्तकांचे दुकान आहे. एक छोटे चित्रपटगृहही येथे आहे. तेथे आम्ही गिर्यारोहणावरील एक चित्रपट पाहिला.

दार्जिलिंगमध्ये प्रवाशांना आकर्षण वाटण्याचे एक ठिकाण म्हणजे 'रोपवे'. मोनोकेबल पद्धतीची ही रोपवे चहाच्या वाहतुकीसाठी बिजनबारी ते रंगीत नदीच्या व्हॅलीपर्यंत २९ लाख रुपये खर्चून बांधलेली आहे. आता हिचा उपयोग प्रवाशांना फिरवण्यासाठी होतो. ही रोपवे थेट सिक्कीमपर्यंत नेण्याची योजना आहे. आम्ही रोपवे पाहायला गेलो त्या वेळी ती चालू नव्हती.. काही तरी दुरुस्तीकाम चालू होतं. खालच्या झाडाझुडुपांनी झाकलेल्या, धुक्याने लपेटलेल्या दरीतून आजूबाजूची पर्वतशोभा पाहत जाणाऱ्या या रोपवेच्या दरीत घुसलेल्या विजेच्या तारा पाहिल्यावर रोपवे चालू नसल्याची हळहळ वाटली.

रोपवेच्या थोडं पुढे गेलं की, डोंगरउतारावरील चहाचे मळे दिसतात. तसे चहाचे मळे दार्जिलिंगला येताना बरेच पाहिले होते. त्यामुळे येथे आणखी विशेष काय पाहायचंय असं मी मनात म्हणतोय तेवढ्यात सौ. ने मला हलवलं आणि म्हणाली, 'अहो, चहा खुडणाऱ्या स्त्रीच्या पोषाखात फोटो काढून घेऊ या का ?' म्हटलं 'घ्या काढून !' तेथील इन्स्टंट फोटोग्राफरकडे चहाच्या मळयात काम करणाऱ्या स्त्रीचा वेष तयारच असतो. तो साडीवरून लपेटून घ्यायचा. चहा खुडून तो ज्या टोपलीत टाकायचा त्या टोपलीचा पट्टा डोक्यावर ठेवायचा की ती टोपली पाठीवर रुळू लागते. मग चहा खुडायची पोज घ्यायची की लगेच 'खटॅक...' रंगीत इन्स्टंट फोटो हातातच यायचा. आमच्या ग्रुपमधल्या सर्व स्त्रियांनी असे फोटो काढून घेतले आणि हा वेष असतो सुंदर रंगीबेरंगी सिल्कचा ! प्रत्यक्षात हा असला महागडा वेष घालून तेथील स्त्रिया चहा खुडत असतील का ? शक्यच नाही; पण हौसेला मोल नाही आणि फजितीला पारावर नाही' हेच खरं !

दार्जिलिंगमध्ये प्रेक्षणीय स्थळांच्या यादीत 'लेबाँग रेसकोर्स' हे एक नाव आहे. जगातील सर्वांत उंचावरील आणि सर्वांत लहान असा हा रेसकोर्स. स्थळ म्हणून याच्यात काहीही प्रेक्षणीय नाही.

दार्जिलिंगमधील वास्तव्यात एक–दोन दिवस नुसतेच बाजारात आणि इतस्तत: भटकलो. तेथील माणसे, त्यांचं जीवन पाहिलं. येथील रहिवासी चिनी-जपान्यांसारखे दिसतात. मंगोलियन वंशाचे असावेत. बसके नाक आणि फटीसारखे डोळे, उंचीही बुटक्यात जमा ! रंग मात्र एकजात गोरा. नुसताच गोरा नाही तर त्यावर सफरचंदी लालसर गुलाबी छटा. एखाद्याचा रंग थोडा रापलेला दिसेल; पण ठार काळा रंग अजिबात कुणाचाही दिसला नाही आणि मुख्य महत्त्वाची वैशिष्टये दोन : एक म्हणजे सर्वांचे केस सरळ ! कुरळे केस कुणाचेही नाहीत. स्त्रियांचेही नाहीत आणि पुरुषांचेही नाहीत. दुसरं वैशिष्टय म्हणजे कुणाही स्त्रीपुरुषाच्या डोळयावर चष्मा नाही. अगदी चाळिशी उलटल्यावर वाचायला लावायचा चष्मासुद्धा कुणाच्या डोळयांवर नव्हता. याचं कारण काय असावं ?

येथे सिक्कीमचे लेपचा–रोंगपा, नेपाळचे नेपाळी–नेवारी, भूतानचे भूतिया, तिबेटचे तिबेटी असे लोक राहतात. त्यामुळे येथे हिंदू व बौद्ध हे प्रमुख धर्म आहेत. ख्रिश्चन धर्माचाही थोडा प्रसार इंग्रजी राज्यात झालेला आहे. येथील लोक अतिशय धार्मिक. देवळं, बुद्धमंदिरं खूप आहेतच; पण प्रत्येक हॉटेलातही हॉटेलमालकाच्या धर्माच्या देवाच्या मूर्ती अथवा फोटो असतातच. आम्ही स्थलदर्शनासाठी जीपमधून गेलो. एका ठिकाणी उतरलो. तेथील स्थळ पाहिले आणि परत येऊन जीपमध्ये बसताना ड्रायव्हरकडे पाहिलं तर त्याच्या कपाळावर ओलसर कुंकू आणि तांदूळ चिकटलेले दिसले. मी चौकशी केली तेव्हा ड्रायव्हर म्हणाला, 'तुम्ही सर्व स्थळं पाहायला गेलात त्या वेळी मी इथल्या देवळात जाऊन आलो. हा ड्रायव्हर चांगला तरुण होता हे महत्त्वाचं.

येथील मुलामुलींत शिक्षणाची आवड अगदीच नाही. साधारण आठवी–नववीपर्यंतचे शिक्षण कसंबसं करायचं. हिंदी सिनेमे पाहायचे. लांब केस वाढवून हिरोगिरी करत हिंडायचं, नाही तर तिघाचौघांचं टोळकं करून रस्त्यावर रिंगण करून उभं राहायचं आणि काळया रबरबँडचं एक बंडल करून ते पायांनी एकमेकांकडे उडवीत खेळायचं. भर रस्त्यात खेळणं हे मुंबईतील मुलांना फक्त 'मुंबई बंद'च्या वेळी मिळतं; पण येथे रस्त्यावर वाहतूक अगदीच कमी. दुपारी दोनपर्यंत 'साइट–सीइंग' करणाऱ्या जीपची वाहतूक संपली की रस्ते हिरोगिरी करायला, खेळायला मोकळे.

शिक्षण नाही मग पोटापाण्याचा व्यवसाय काय ? बायका चहाच्या मळयात काम करणे, बतासिया लूप, बुद्धमंदीर वगैरे ठिकाणे पाहायला आलेल्या प्रवाशांना थंडीत गरमागरम कॉफी विकणे, जीप अथवा मिनीबस चालविणे, येथील हॉटेलात नोकऱ्या करणे अथवा घडीच्या छत्र्या, परदेशी साड्या अशा तस्करी व्यवहारातील वस्तू विकणे अशी कामे करतात. येथे भटकताना एका बऱ्याशा घरात आम्ही

गेलो होतो. ते घर बांबूच्या काठ्यांवर उंचावर बांधलेलं असं साधंच होतं घरातल्या लोकांशी गप्पा मारल्या. बाबा जीप चालवण्याचं काम करतात. आई चहाच्या मळ्यात काम करते. एक मुलगा आठवीपर्यंत शिकून शिक्षण सोडून जीप ड्रायव्हिंग शिकतोय. बाकीची मुलं शाळेत जात होती; पण एकूण त्यांना शाळेच्या अभ्यासात रस नव्हता. एकूण घरातील जीवनमान मागासलेले दिसत होते. त्यांना त्यांच्या दार्जिलिंगमध्ये काय चाललंय याचीही विशेष माहिती नव्हती. मग जगाची माहिती तर दूरच राहो. कुठलाही पेपर वाचीत नाहीत किंवा इतरही काही वाचन नाही. रेडिओवरील कार्यक्रमात फक्त हिंदी गाणी ऐकतात. मला त्यांच्या स्वसंतुष्टवृत्तीचे आश्चर्यच वाटले. जग चंद्रावर पोचलं असलं तरी दार्जिलिंगवासी अजून त्यांच्या घरातच कूपमंडूकपणे राहताहेत. मागासकाळात जुनाट वास्तव्यात खितपत पडलेले आहेत.

दार्जिलिंगमधील वास्तव्य काहीही खरेदी न करता करणं हे कसं शक्य आहे? त्यात आमच्या या ग्रुपमध्ये पुरुषांपेक्षा बायकाच जास्त! मग खरेदीसाठी जाणं आलंच. येथे इंपोर्टेड घडीच्या छत्र्या, पँट-शर्टची कापडं, परदेशी साड्या स्वस्तात मिळतात. थंडीची आवरणं म्हणजे स्वेटर्स, मफलर, हातमोजे, जर्किन वगैरे वस्तू मुंबईपेक्षा स्वस्त मिळतात. त्यामुळे सौ. ला एक स्वेटर आणि सौ. ने हौसेने माझ्यासाठी पँटचं कापड घेतलं. येथील फोटोग्राफरच्या दुकानात शिरल्यावर येथून दिसणाऱ्या हिमालयाच्या कांचनगंगा-शिखरांचे विविध कोनांतून विविध मोसमांत घेतलेले सुंदर सुंदर रंगीत फोटो दिसले. त्यांचे आकारही लहानापासून ते मोठ्या पोर्ट्रेट-एवढे मिळतात. फक्त ते पाहायचे, त्यांच्या किंमती ऐकायच्या आणि वाटल्यास खिशाला परवडलेसा एखादा लहानसा फोटो घेऊन दुकानाबाहेर सटकायचं.

तेवढ्यात कुणी तरी बातमी दिली की, येथल्या 'तिबेटन रिफ्यूजी सेंटर' मध्ये चांगल्या कलाकुसरीच्या वस्तू मिळतात. आता खरेदी म्हटलं की, बायकांचा उत्साह उतू जातो. मी म्हटलं, 'तिकडे कशाला जायचं? आपल्या उल्हासनगरला नाही का रिफ्यूजी सेंटर?' सौ. चं म्हणणं, 'अहो, गेलं म्हणजे काही खरेदी केलीच पाहिजे असं नाही. नुसती चौकशी करू.' आणि वर माझ्याच बोलण्याचा आधार घेऊन तिने टोला दिला, 'आणि का हो, हे ठिकाण आपण अजून पाहिलंय कुठे?' हे ठिकाण फालतू आहे की नाही हे पाहण्यासाठी तरी जायलाच हवं तुमच्या म्हणण्याप्रमाणे!' आता काय बोलणार यावर? निघालो रिफ्यूजी सेंटरमध्ये. तेथे पोचल्यावर बायकांचा जथा घुसला. 'शोरूम' मध्ये. मुंबईतल्या शोरूम्सचा चकचकाट येथे नसला तरी येथे ठेवलेल्या वस्तू मात्र सुंदर आहेत! लाकडावरील कोरीव कामाच्या वस्तू; चर्मोद्योगाच्या वस्तू आणि तिबेटी पद्धतीने विणलेले मऊ गालिचे येथे आहेत. एकेक गालिचा पाहून डोळे निवले आणि त्यांच्या प्रचंड किंमती ऐकून डोळे पांढरे झाले! बायकांची खरेदी चालली होती तेवढ्या वेळात मी या संस्थेच्या आवारात फिरलो. ही संस्था तिबेटवरील चिनी आक्रमणानंतर तिबेटी निर्वासितांसाठी दलाई लामांनी स्थापन केली. येथे परंपरागत तिबेटी हस्तकलेच्या वस्तू बनविल्या जातात. नवीन मुलांना त्याचं शिक्षण दिलं जातं. येथील वस्तूंची निर्यात जगातील सोळा देशांत होते. या संस्थेच्या आवारात तिबेटी निर्वासितांची बैठी घरं, छोटं हॉस्पिटल, बुद्धमंदिर, बैठ्या खेळांचं रिक्रिएशन सेंटर, मोफत वह्या-पुस्तकं देणारी शाळा वगैरे वास्तू आहेत. या सर्व वास्तू अतिशय साध्या आहेत. कुठेही श्रीमंती थाट नाही; पण या संस्थेतील सर्वांत सुंदर गोष्ट कुठली असेल तर येथे आपली जीप शिरल्याबरोबर जीप-भोवती जमा होणारी गुलाबी गोबऱ्या चेहऱ्याची गोजिरवाणी पण फाटक्या ढगळ कपड्यांतली तिबेटी मुलं आणि ही सर्व मुलं त्यांच्या भाषेत जेव्हा चिवचिवाट करतात, तेव्हा त्यांना पाहताना फारच मजा येते. हा चिवचिवाट कानाला कलकलाट वाटत नाही!

## आणि तो सूर्योदय

दार्जिलिंगच्या वास्तव्यात आमचं शरीर व्यापून हाडं हाडं वाजवणारी गोष्ट कुठली असेल तर, ती म्हणजे येथली प्रचंड थंडी! मुंबईच्या माणसांना वातानुकूलित २३.८ अंशाचं तपमान कसंबसं सहन होतं. २०.८ अंशापर्यंत खाली उतरलं की, मुंबईकर कुडकुडू लागतात. मग येथे तर तपमान शून्यापासून ३-४ अंश ८ पर्यंत असतं. या थंडीत आमचे हाल काही विचारायला नकोत! अंगावर थर्मल, दोन स्वेटर्स, ओव्हरकोट, हातमोजे, पायमोजे, बूट, मफलर, कानटोपी एवढा सर्व सरंजाम आणि गरम पेयाचे घुटके तरी थंडी काही थांबायची नाही! आमच्यातील काही आज्यांनी तर संचालकांकडे 'दार्जिलिंग-मध्ये राहाणं बस्स झालं, चला निघू या!' असा धोशा लावला होता. हॉटेलात काम करणारी मुलं सांगायची की, त्यांनाही काही वेळा ही थंडी सोसवत नाही. मग १८५९ साली दार्जिलिंगचा हा प्रदेश सिक्कीम नरेशाकडून इंग्रजांनी भाड्याने घेतला तेव्हा त्यांनी ज. लॉइड आणि डॉ. चॅपमन यांना हा प्रदेश वसाहतयोग्य करण्यास पाठवले. त्या वेळी येथे साध्या मातीच्या झोपड्या होत्या. त्या झोपड्यांतून हे दोघे इंग्रज राहू लागले. त्यांच्याकडे थंडीची पुरेशी वस्त्रेही नव्हती. गरम पेयांची सोय नव्हती. अंगातल्या जिद्दीशिवाय संरक्षक काही नव्हते. या दार्जिलिंगच्या जीवघेण्या थंडीत मातीच्या झोपडीत पुरेशा वस्त्राभावी त्यांनी रात्रीच्या रात्री कुडकुडत कशा काढल्या असतील आणि उण्यापुऱ्या चार वर्षांत त्यांनी तीस इमारती आणि ब्रिटिश पद्धतीचे सत्तर बंगले कसे बांधून घेतले असतील, ते तेच लोक जाणे! त्यात येथे संध्याकाळी पाचलाच रात्र होते. रात्र झाली की थंडी आणखी वाढायची. एकदा रात्री ब्लँकेट-रजया घेऊन अंथरुणात शिरलं की, सकाळी या प्रचंड थंडीत उठणं अगदी अशक्य वाटायचं. येथील थंडी अनुभवल्यावर टायगरहिलवर सूर्योदय पाहायला जायला कित्येकांनी नकार दिला. काहींनी, 'आम्ही पुष्कळ ठिकाणी सूर्योदय पाहिले आहेत. इथे आणि काय वेगळं दिसणार आहे या थंडीत?' असं म्हणून आपली सुटका करून घेतली. मी ठाम निर्धारानं म्हटलं, 'कुणी येणार नसलं तर मी एकटा जाईन!' मग काहीजण यायला तयार झाले.

थंडीत कुडकुडत, स्वतःवर चिडत पहाटे चारला उठलो. गरम पाण्यानं मुखमार्जनादी उरकून गरम कॉफीचे दोन प्याले पोटात रिचवले. साधारण पावणेपाचच्या सुमारास सर्व थंडी-आवरणांनी स्वतःला लपेटून घेऊन जीपमधून टायगरहिलकडे निघालो. बाहेर सर्वत्र अंधाराचं साम्राज्य पसरलेलं होतं. अंगाला चावरे वारे झोंबत

होते. नीरव शांतता पसरली होती. फक्त जोरवा आवाज त्या शांततेचा भंग करीत होता. शहरापासून ११ किलोमीटरवर आठ हजार फूट उंचीवर आम्ही पोचलो. तेथे एक छोटे हॉटेल आहे. त्याच्या तिन्ही बाजूंना सूर्योदय व आजूबाजूची शोभा पाहण्यास उभे राहण्या साठी कठडे होते. तेथे बरेच प्रवासी जमले होते. आम्हीही त्यात सामील झालो.

पूर्वेला अंधारातून किंचित लालसर पट्टा दिसू लागला. वर काळे ढग दिसत होते. लालसर पट्टा उजळू लागला. त्या पट्ट्यात पिवळे व शुभ्र पट्टे दिसू लागले. हळूहळू दिशा आणखी उजळू लागली. लालसर पट्ट्याच्या वरच्या बाजूला अगदी फिक्कट हिरवे, निळे, पिवळे पट्टे दिसू लागले आणि खालच्या बाजूच्या दरीत पाहिलं तो काय? दरी होतीच कुठे? आम्ही जिथे उभे होतो तिथून थेट पूर्वेच्या डोंगरांपर्यंत शुभ्र करड्या ढगांची दुलईच्या दुलई सर्व दरीभर पसरलेली दिसत होती. म्हणजे दरी नव्हतीच तेथे. सर्वत्र शुभ्र दुलई पसरलेली असं वाटत होतं. त्या मऊमऊ दुलईवरून अनवाणी चालत ढगांचा सुखद मऊपणा पावलांना अनुभवू देत थेट सूर्यापर्यंत चालत जावं, पुन्हा वाटलं हा मऊपणा फक्त पावलांनीच का अनुभवायचा? नको. सर्व शरीरच गडबडा लोळवत ढगांचा मऊपणा अनुभवत सूर्यापर्यंत जावं. तेवढ्यात उत्तरेच्या दिशेने मी दृष्टी फेकली.ओऽहो! हिमालयाची, कांचनगंगेची पाचही शिखरे सोनेरी रंगानं उजळून गेली होती! जणू त्यावर कुणी सोन्याचा रसच ओतलाय किंवा 'कांचनाची गंगा'च त्याला न्हाऊ घालतेय. उगाच नाही कांचनगंगा या तिबेटी शब्दाचा अर्थ. (कांचनगंगा–'खान-चेन-झोंड-ङ्गा') पाच संपत्तींचा समुदाय असा होतो! येथे पाचही शिखरे सुवर्णसंपत्तिने भरलेली दिसत होती. पुन्हा दृष्टि पूर्वेकडे वळवली. डोंगराच्या बाजूला ढगांमध्ये तीन सोनेरी लखलखत्या रेषा दिसू लागल्या. या तीन रेषांपैकी नक्की सूर्य कोणता? याचा अंदाज आम्ही वर्तवू लागलो. अधीरपणे सूर्य आता वर कधी येतो ते पाहू लागलो. एक एक क्षण जाताना अधीरपणा वाढू लागला. करमसीभाई तर एवढा अधीर झाला, त्याने मला सांगितलं, 'अरे अशोक, तमे सूरजना लाइटनिंग कॉल लगाव नी! एटले जल्दी आवसे' 'अहो, रात्री ओव्हरटाइम केला असेल सूर्याने म्हणून उशीर झाला असेल!' हो, एवढ्या थंडीत यायला बसलाय सूर्य! या कुलकर्ण्यांना नाही उद्योग म्हणून आम्हाला एवढ्या थंडीत आणलं ओढून!' एक-कुरकुर आणि एवढ्यात आम्हाला फसवून, आधी पाहिलेल्या तिन्हींपैकी कुठल्याही सुवर्णरेषेतून वर न येता, सूर्याचे लालसर सोनेरी बिंब भलतीकडूनच बाहेर येऊ लागले. आता पूर्ण बिंब शुभ्र दुलईवर तरंगू लागले. सूर्य आणखी वर येऊन आपल्या तेजाने तळपू लागला. पुन्हा कांचनगंगेकडे दृष्टी वळवली. पूर्वीची सुवर्णकांति जाऊन आता सर्व शिखरे शुभ्र रंगात न्हाऊन निघाली होती. कमालीच्या बाहेर शुभ्रता शुभ्र शुभ्र अति शुभ्र. मी पारिजातकाचा शुभ्रपणा पाहिलाय. सीनटक्क्याची शुभ्रता पाहिलीय. पण...पण ही हिमधवल शुभ्रता म्हणजे शुभ्रतेनं शुभ्रतेत खूप खूप शुभ्रता घालून आणलेली शुभ्रता–हा शुभ्र हिमालय गगनाला भिडलाय, की गगनातून येऊन अलगद पृथ्वीवर येऊन बसलाय तेच कळेना! अप्रतिम! बंगालीत म्हणायचं तसं 'भीषण सुंदर!'

आतापर्यंत मी अनेक सूर्योदय पाहिले; पण दार्जिलिंगचा टायगर हिलचा सूर्योदय म्हणजे एकमेवाद्वितीय! येथील सूर्योदयाआधीचा रंगांचा खेळ, ढगांची दुलई, सोनेरी व शुभ्र गगनाला भिडणारी हिमशिखरे आऽहाऽहा! पण हे सर्व पाहताना वाजणारी थंडी मात्र हुऽहुऽहु!

हा सूर्योदय मनातून मावळणं कधीच शक्य नाही, याचा मनावर एक ठसा उमटला आणि येथील निरोगी वातावरणाचं रहस्य कळलं. दूरवरची शिखरांची शोभा पाहण्याची सवय डोळ्यांना असल्यानं येथे कुणाचे डोळे अधू नाहीत. मोठी इंडस्ट्री नसल्यामुळे प्रदूषण नाही, स्वच्छ चांगली हवा! त्यामुळे निरोगी शरीर. मग चेहरे आनंदी असणारच. बस्स! आणखी काय हवंय? पहिल्यांदा वाटलं की, जग कुठे चाललंय याचा इथल्या लोकांना पत्ता नाही. करायचंय काय ते माहिती करून? जगाची माहिती असणारे आम्ही असे काय दिवे लावले आहेत? शेवटी इथून तिथून सगळे 'सॉलोमन ग्रँडी' चेच अवतार! निदान असलेलं आयुष्य स्वच्छ निरोगी वातावरणात घालवणारे दार्जिलिंगवासी मनाने आणि शरिरानेही निरोगी राहतात आणि आनंदी चेहऱ्याने आयुष्य घालवतात!

मार्क ट्वेननी एकदा म्हटलंय, 'ही भूमी पाहण्यासाठी सर्व लोकांची मनीषा असते; पण एकदा का त्यांनी या भूमीवर दृष्टी टाकली की, जगात त्यांना ती इतरत्र कुठेही टाकावीशी वाटत नाही. दार्जिलिंगची ही भूमी पाहिल्यावर वाटतं की, किती सार्थ आहे मार्क ट्वेन म्हणतो ते! □

---


"एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी. स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारांमागचे मर्म उलगडून सांगणारी. कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी मांडल्याने झपाटून टाकण्याचे चांगलेच सामर्थ्य या कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा एक महत्त्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने या नवोदित लेखकान घडवलाय, त्यामुळे बुवाबाजीसारख्या गोष्टींबाबत वाचक अधिक जागरूक बनतील."

**पुस्तक पंढरी : ऑगस्ट १९८२ अंक**
**बाँबे बुक क्लब–ऑगस्ट निवड**

# सबला

लेखक : माधव शिरवळकर.

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : रुपये बारा


---

# कुंपण आणि आकाश



**मंगला गोडबोले**

आमच्या परिचयातला एक मुलगा पस्तिशीपर्यंत लग्नाशिवाय राहिला होता. व्यक्तिशः त्याच्यामध्ये ठळक असा काही दोष किंवा उणीव नव्हती; पण या ना त्या कारणानं त्याचं लग्न लांबत गेलं एवढं खरं! अलीकडे त्याच्यापेक्षा त्याच्या आईवडलांनाच त्याच्या लग्नाची जास्त घाई झाली होती. एवढ्या वयात चांगल्या मुली कशा सांगून येतील म्हणून सारखी काळजी करायचे. मुलींच्या पाळतीवर राहायचे.

आजच त्याच्या लग्नाचं आमंत्रण मला मिळालं आहे. पत्रिका देताना त्याचे वडील कृतार्थपणे म्हणत होते, 'मुलगी चांगल्या घरची आहे, नाकीडोळी नीटम आहे आणि फक्त वीस वर्षांची ! हं ऽ आता जरा शिक्षणाकडे तिचा कल नाही म्हणून...पण आमच्या तरी स्थळात वयाखेरीज दुसरी कुठली उणीव आहे ? शेवटी या स्वर्गातल्या गाठी...'

लग्नाच्या बाबतीमध्ये 'स्वर्गातल्या गाठी' हे आपल्या सर्व प्रश्नांवर कायमचं उत्तर असतंच म्हणूनच ठीक आहे. एरवी विशीच्या मुलीनं, खरोखर गंभीर अशी काही उणीव नसेल तर, पस्तिशीच्या मुलाशी (!) लग्न का करावं ? आणि समजा उणीव असली तरीही त्याबद्दल तिनं वाटेल ती तडजोड का करावी ? केवळ ती मुलगी आहे म्हणून ? तिच्याबाबतीत लग्न ही काही तरी अपरिहार्य गरज आहे म्हणून ? कुठल्याही वयात, कुठल्याही परिस्थितीत, कोणत्याही गुणदोषांनी युक्त असलेला पुरुष लग्नाच्या बाबतीत किमान अपेक्षा बाळगू शकतो, निवडीचा हक्क राखून ठेवू शकतो. लग्नाशिवाय राहू शकतो. देहाच्या गरजा भागवू शकतो. त्या त्या सांस्कृतिक, सामाजिक स्तरामध्ये एका ना एका परीने त्याच्या 'त्या' गरजा बिनबोभाट पुऱ्या होऊ शकतात. मुलीच्या बाबतीत मात्र सर्व गरजा, उपभोग, संरक्षण, सुरक्षितता, भविष्यनिर्वाह या सर्वांवर एकच अक्सीर इलाज म्हणजे लग्न. त्यामुळे तिच्या आयुष्याचं एकमेव ध्येय म्हणजे तिचं लग्न होणं. याबाबत समाजाच्या विचाराचा पालकांवर व पालकांच्या विचारसरणीचा अखेर त्या मुलीवरही इतका पगडा असतो की, लग्नाचं शिवकामोर्तब करून घेण्यासाठी वाटेल ती तडजोड करण्याकडे कल राहातो. मग पुढे आयुष्यभर पश्चात्तापाची पाळी का येईना ! अमुक वस्तू ? तुला लग्नात घेऊ. अमुक हौस ना ? नवरा करेल, अमुक सुखसोय ? नशिबात असेल तर सासरी मिळेल, असं लहानपणापासून मुलीच्या कानांवर पडत असतं. त्यामुळं कळतनकळत लग्न हे तिला स्वर्गसुखाचं प्रवेशद्वार वाटत असतं. विवाहित स्त्रीची प्रतिष्ठा आणि प्रौढ कुमारिकेची, विधवेची अवहेलना आपल्याकडे नेहमीच चालू असते. क्वचित कुठे एखादं लग्न अल्पजीवी किंवा त्रासदायक ठरतंय असं दिसलं तरी त्याला जबाबदार संबंधित स्त्रीच असते असं समाज ठामपणे मांडतो. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे एरवी हुषार, कर्तबगार असलेल्या मुलीसुद्धा लग्नाच्या वेळी क्षणिक मोहाला बळी पडतात. चुकीचे निर्णय घेतात किंवा आई वडिलांवर निर्णय सोपवून स्वतः त्यांच्या आधीन होतात आणि पुढे, केलेलं लग्न टिकवण्यासाठी सगळ्या आयुष्याचा होम करतात. याचं उत्तम समकालीन उदाहरण म्हणजे आठ-पंधरा दिवसांच्या रजेवर भारतामध्ये येणाऱ्या परदेशस्थ युवकांना माळ घालणाऱ्या सुशिक्षित, प्रौढ चि. सौ. कां !

लग्न व्हावंसं वाटण्यात गैर काहीच नाही. पत्नीत्व, मातृत्व, गृहिणीपद याची नैसर्गिक ओढ आणि आकांक्षा बहुतेक स्त्रियांना असते. लग्न हा ती ओढ, आकांक्षा पुरवण्याचा सध्या तरी एकमेव राजमार्ग आहे हे तर खरंच; पण अखेरीस लग्न करायचं ते त्या मुलीला सुख लाभावं म्हणूनच ना ? सुखी, समृद्ध सहजीवन, परिपूर्ण आयुष्य या साध्यासाठी लग्न हे साधन आहे. लग्न हे साध्यच मानायचं ठरवलं की पुढचे सगळे दुष्परिणाम भोगणं आलंच.

पुरुषांच्या बाबतीत पैसा आणि स्त्रियांच्या बाबतीत लग्न या दोन गोष्टींमध्ये आपल्या समाजात साध्य व साधनाची नेहमीच गल्लत होत आली आहे. पैसा मिळवायचा कशासाठी ? लग्न करायचं कशासाठी ? तर अमुक एका दर्जाच्या जगण्यासाठी ! पैशासाठी आणि लग्नासाठी लग्न अशी भूमिका झाली की पुरुष वाटेल त्या मार्गांनी पैसा मिळवतात व स्त्रिया वाटेल ती किंमत देऊन बोहल्यावर चढतात. दोन्हीचेही परिणाम तितकेच गंभीर असतात.

लग्नाच्या बाबतीत मुलीच्या आईवडिलांची एक ठाम भूमिका असते. ती म्हणजे आपल्या जबाबदारीतून मुक्त होण्याची ! परक्याचं धन, जिथली वस्तू ( व्यक्ती नव्हे बरं का ) तिथे गेलेली बरी, अशा रूढ कल्पनांमुळे ठराविक वयाच्या वरच्या मुलीचं आईवडिलांना ओझं वाटायला लागतं आणि आपलं ओझं ते दुसऱ्याच्या शिरावर टाकू बघतात. मग तो 'दुसरा' ओझं वाहण्याच्या कुवतीचा असो किंवा नसो ! मुलीला ओझं बनणं आवडत असो किंवा नसो ! प्रसंग पडल्यास आपली मुलगी स्वतंत्रपणे स्वतःचं जीवन जगू शकेल यावर पालकांचाही विश्वास नसतो आणि या बाबतीत स्वतःला अजमावण्याची संधी त्यांनी मुलीला कधी दिलेलीही नसते. लग्नाचा डाव जर फसला तर कित्येकदा याच मुलीवर केवळ स्वतःचीच नव्हे तर नवऱ्याची व निसर्गक्रमाने झालेल्या मुलांचीही जबाबदारी पडू शकते; पण तो तिचा प्रश्न, तिनं सोडवावा. लग्न करून दिलं की आपण मोकळे असाच बहुसंख्य मातापित्यांचा ग्रह असतो. सध्या वेगवेगळ्या कारणांनी गाजत असलेल्या हुंडाबळीच्या अनेक घटनांमध्ये अन्याय करणाऱ्या सासूसासऱ्यांइतकेच त्या अन्यायाकडे काणाडोळा करणारे आईवडीलही जबाबदार आहेत हे पुराव्याने सिद्ध झालेलं आहे. मुलीच्या वियोगाचं दुःख केलं म्हणजे ती या गुन्ह्यातून सुटण्याची पळवाट तर होऊ शकत नाही ना ?

अर्थात या सगळ्या प्रतिवादातून मुलींची व्यक्तिगत जबाबदारी नजरेआड करण्याचा माझा अजिबात प्रयत्न नाही. लग्न म्हणजे फक्त एक शालू, चार दागिने व एका आठवड्याचा मधुचंद्र नव्हे एवढं करण्याइतक्या आजच्या बहुतेक नववधू वयानं मोठ्या असतात. शिक्षण व अर्थार्जनाची कुवत या भांडवलाच्या बळावर लग्नाच्या बाबतीत किमान अपेक्षा व आग्रह त्यांनी धरलाच पाहिजे. कै. आगरकरांचे शब्द उसने घ्यायचे तर, प्रौढवयात बालविवाह करण्याची प्रवृत्ती त्यांनी सोडली पाहिजे. लग्न झालं तर ठीकच झालं नाही तरीही आपल्याला हव्या त्या दर्जाचं, पद्धतीचं जिणं आपण जगू शकू या साठी त्यांनी सदैव प्रयत्नशील राहिलं पाहिजे पुरुष असणं या एकमेव गुणासाठी समोर येईल त्या कोणाही इसमाला माळ घालण्याचं त्यांनी कटाक्षानं टाळलं पाहिजे; पण त्याचबरोबर पालकांनी, समाजानंही त्यांच्या स्वतंत्र, अर्थपूर्ण जगण्याची बूज ठेवली पाहिजे. ठराविक वयात मुलाना जशा गोवर-कांजिण्या येतात तसंच ठराविक वयात मुलीचं लग्न झालंच पाहिजे. हा आग्रह आता पुरे. माणसांच्या वाढीचे, गरजांचे टप्पे वेगवेगळे असतात. लग्न या एका महत्त्वाकांक्षेच्या पायी ते सगळे तुडवण्याची किंवा गोठवण्याची आवश्यकता नाही.

स्वेच्छेने अविवाहित राहिलेल्या एका कर्तबगार स्त्रीशी अलीकडेच बोलण्याची संधी मिळाली. एरवी ती कमवती आहे, स्वतःचं स्वतंत्र घर करून राहाते आहे हे तर मला दिसत होतंच; पण लैंगिक जीवनाची तरतूद काय ? असल्या नाजूक विषयावर आपल्याकडे सहसा कोणी बोलत नाही. ती मात्र उमदेपणाने सांगून गेली, ' खोटं कशाला सांगू ? सुरुवातीला त्रास झाला. पुरुषाविना राहणं फार जड गेलं; पण पुढं मी माझ्या मनाला इतरत्र गुंतवत गेले आणि हळूहळू ' त्या ' गरजा सतावीनाशा झाल्या. नाही तरी माणसाला सगळं मिळत नाहीच. कुठे तरी घरसोड करावीच लागते. आम्ही तिथे केली. बिघडलं कुठं ?'

किती समंजस भूमिका ! मला आनंद आणि अभिमान वाटला; पण तीच सांगू लागली,

' आता तो त्रास होत नाही तर दुसराच त्रास होतो. लोक सारखे संशयाने बघतात. ' ' त्याविणा ' कोणी राहू शकेल असं वाटतच नाही कुणाला ! त्यात मी तर एकटी ! म्हणजे जशी सार्वजनिक मालमत्ताच ! माझ्याबद्दल बोलणाऱ्यांचं तोंड कोण धरणार ?'

इतर बोलणाऱ्यांची नसली तरी माझं तोंड मात्र तात्पुरतं गप्प झालं. स्त्रीच्या नीतिमत्तेविषयीच्या कल्पना बदलाव्यात, इतर गरजांप्रमाणेच 'त्या' गरजा भागवण्यासही समाजाची संमती असावी हा विचार फार पुढचा झाला. आहे त्या परिस्थितीत किमान समंजसपणा व औदार्य तरी या अविवाहित प्रौढांच्या वाट्याला येईल का ? नाही तर लग्नाचा खुळा हट्ट आहेच ! सर्वांच्या समोर आ वासून बसलेला ! □

# रंगभूमी

## तोरडमलांचे नवे नाटक – ऋणानुबंध

वि. भा. देशपांडे

रसिकरंजन थिएटर ग्रुप, मुंबई, यांच्या वतीने नवे नाटक, रंगभूमीवर पेश झाले आहे. त्याचे नाव आहे ' ऋणानुबंध '. या नाटकाचे लेखक, दिग्दर्शक, निर्माते आणि प्रमुख भूमिकेत आहेत प्रा. मधुकर तोरडमल.

हे नाटक पाहत असताना दोन गोष्टी प्रथमदर्शनीच जाणवतात. एक तर हे सामाजिक, कौटुंबिक नाटक आहे आणि दुसरे म्हणजे हा एक सरळसरळ ' मेलोड्रामा ' आहे. एका गावातील प्रसिद्ध वकिलाचे हे कुटुंब. हा वकील केवळ आपल्या व्यवसायातच प्रसिद्ध आहे असे नव्हे, तर तो गावातील सामाजिक पुढारी आहे. म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीत सतत निवडून येणारा आणि तिचा अध्यक्ष होणारा आहे. याच्या मुखात विठ्ठलाचे–परमेश्वराचे नाव आहे, गळ्यात वारकरी माळ आहे; पण त्याला साजेसे सज्जन, सत्शील वर्तन नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी तो कोणतेही काळे व्यवहार करायला तयार आहे. याच्या घरात बायको, दोन मुले, एक मुलगी, एक आश्रित म्हणून राहिलेली काकू आहे, तसेच कारकून म्हणून जोशीबुवा नावाचे गृहस्थ आहेत. याच्या दोन मुलांपैकी एकजण म्हणजे विश्वास डॉक्टर आहे, दुसरा प्रदीप हा मनोरुग्ण आहे. त्याला वेडाचे झटके येतात. त्याचे घरात असणे हा एक चिंतेचा, चर्चेचा विषय आहे. याचे वयात येणे आणि त्यातून त्याच्या विषयवासनांचे, हिंसेचे रूप अधिक भीषण होणे हा नाटकातला महत्त्वाचा गाभा आहे. कारण याच प्रदीपच्या अस्तित्वामुळेच त्याच्या बहिणीचे म्हणजे पमाचे लग्न दोन–तीनदा मोडते. भावजयीचे घरात राहणे असह्य होत जाते. भावजयीला झालेल्या मुलाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होत जातो आणि ह्या सर्वातून नाटक आकार घेते.

ऋणानुबंध हे केवळ रक्ताच्या नात्याचेच असतात असे नव्हे, तर ते एकूणच मानवी जीवनाशी संबंधित असतात ते जपण्याचा, तोडण्याचा भावनिक, व्यावहारिक प्रयत्न सतत होत असतो. तो नाट्याला आवाहनात्मक आणि आव्हानात्मक असा दुहेरी असतो. या सूत्रावर नाटककाराचा भर आहे त्यातही नाटककाराने लिहिलेली आप्पासाहेब ही व्यक्तिरेखा महत्त्वपूर्ण आहे. तो कुटुंबात आणि समाजात प्रतिष्ठा पावलेला असल्याने त्याच्या वृत्तीत स्वामित्वाचा ( पझिसिवनेस) भाग सतत उफाळून येतो. त्या अहंकाराला



**ऋणानुबंध नाटकात अजय वढावकर – अमिता खोपकर**

□

जराही धक्का लागला की तो अस्वस्थ आहे; पण तितकाच ताकदीचा स्वतःचा डॉक्टर मुलगा त्याला काही निर्णय घेऊन धक्के देतो तेव्हा या आप्पासाहेबाला परिस्थितीचे भान येते. या नाटकातील प्रदीप या व्यक्तिरेखेची निर्मिती ही नाटककाराला सर्वात आव्हानाची होती. जन्मतःच विफल, अपंग असलेले, शरिराची वाढ होणारे हे पोर सगळ्या घरादाराचा 'इस्कोट' करण्याच्या अवस्थेत आल्यावर काय होते ते अतिशय परिणामकारक रीतीने व्यक्त झाले आहे. या व्यक्तिरेखांच्या बरोबरीने अरुंधती आणि काकू याही महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आहेत.

या नाटकातील विषय आणि प्रसंगनिर्मिती ह्यांची जातच भडक असल्याने मांडणीत किंवा आविष्कारात तो भडकपणा अपरिहार्यपणाने आलेला आहे. आपल्याकडे भडकनाट्य किंवा अतिनाट्य ( म्हणजे 'मेलोड्रामा' ) यांना नाके मुरडणारा, नावे ठेवणारा काही प्रेक्षकवर्ग आहे; पण त्याचबरोबर अशी नाटके आवडणाराही प्रेक्षकवर्ग मोठ्या प्रमाणात आहे. तेव्हा अशा नाटकाकडे भडकनाट्य म्हणून तुच्छतेने पाहण्याचे कारण नाही. अनेकांच्या ध्यानात एक गोष्ट येत नाही की, नाटकाचे अनेक प्रकार असतात त्यामध्ये 'मेलोड्रामा' हा मान्य असा नाट्यप्रकार आहे. आपल्याकडे तर अशा नाटकांची एक मोठी परंपराच आहे. जे नाटक तशा आविष्कारपद्धतीची मागणी करते ते तसेच व्यक्त व्हायला हवे. त्याचबरोबर आणखी एक गोष्ट म्हणजे मधुकर तोरडमल यांनी लेखक आणि निर्माता अशा दोन्ही भूमिकात स्वतःचा गोंधळ होऊ दिलेला नाही. आपल्याला आपल्या संस्थेसाठी चार पैसे मिळवून देण्यासाठी किंवा निदान त्यामध्ये गुंतवलेले पैसे परत मिळण्यासाठी जे नाट्यलेखनाचे–प्रयोगाचे हिशेब मांडावे लागतात, ते सरळपणाने मांडलेले आहेत. त्यात कोणत्याही प्रकारचा चोरटेपणा नाही. हे एकदा मान्य केल्यावर नाटककारावर हेत्वारोप करण्यात काहीच मतलब नाही.

व्यवसायाचे गणित मनाशी बांधून ( खरे म्हणजे व्यवसायातला प्रत्येकजण ते बांधीत असतो, त्यात गैर काही नाही. ) लिहिलेले नाटक दिग्दर्शक तोरडमल यांनी तितक्याच मेहनतीने पेश केलेले आहे. पात्रांची निवड, त्यांच्या हालचाली, विरचना आणि या सगळ्यातून साधणारा नाट्यपरिणाम ठसठशीतपणाने साधलेला आहे. गणेश गोरे यांचे नेपथ्य आणि प्रकाशयोजना, अशोक पत्कींचे पार्श्वसंगीत यामुळे नाट्यपरिणाम साधण्यास अधिक मदत झाली आहे.

स्वतः मधुकर तोरडमल यांनी या नाटकातली आप्पासाहेबाची भूमिका अतिशय संयमाने पेश केली. त्यांच्या एकूण भूमिकांच्या प्रवासात ही भूमिका अगदी वेगळी आहे. त्यांचे दिसणे, बोलणे आणि त्यातून घडत गेलेली कृती प्रेक्षकाला सदैव उत्कंठित करणारी आहे. त्यांच्या बरोबरीने काकूच्या भूमिकेत उभ्या राहिलेल्या भावनाबाई एकदमच वेगळ्या आणि चांगल्या वाटल्या. 'माझं काय चुकलं' या मधल्या सासूच्या भूमिकेनंतर काकूची ही भूमिका वेगळी आहे. विशेषतः त्यांनी कधी शब्दांनी तर अनेकदा निःशब्द राहून मुद्राभिनयाने अनेक भाव व्यक्त केले. अजय वढावकरने केलेला प्रदीप हा दीर्घकाळ स्मरणात राहील. अजयला आपण अनेक बालनाट्यांतून आणि प्रौढ नाट्यांतून पाहिलेले आहे; पण त्याच्या वाट्याला फार मोठी भूमिका ( निदान व्यावसायिक नाटकात ) क्वचितच आली. प्रदीपच्या भूमिकेतील अनेक बारकावे, विशेषतः हाताच्या हालचाली, पाहण्याची आणि बोलण्या-चालण्याची पद्धत पुरेशी भीती–सहानुभूती निर्माण करीत होती. ती व्यक्तिरेखा पुरेशा ताकदीने उभी राहिली. अनंत जोग, अमिता खोपकर, तारा पारकर, मंजुषा आणि मोहन मुंगी, माधव आचवल, हर्ष शिवशरण आदी कलाकारांनी यथायोग्य साथ दिली. यामध्ये अनंत जोग आणि अमिता खोपकर विशेष लक्षात राहिले. □

# नाट्यपंढरी



## □ प्रभाव अभिनयाचा !

एक काळ असा होता की, प्रेक्षक गायक नटांच्या गोड गळयावर नि बहारदार गाण्यावर लुब्ध असत. त्यांच्या अभिनयाकडे बारकाईने पाहिले जात नसे. साहजिकच गाणे ही ज्यांची ढाल होती त्या नटांचे अभिनयाकडे दुर्लक्ष होत असे. याचा अर्थ असा नाही की, सगळेच गायक नट हे अभिनयात कच्चे होते. संगीताभिनयाचा सुवर्णसंगम असणारे अनेक गुणी गायक नट आपल्या मराठी रंगभूमीवर होते, म्हणूनच तर संगीत रंगभूमीचे सुवर्णयुग निर्माण झाले!

पण गद्य नटांची वाणी नि मुद्रा हीच त्यांच्या अभिनयाची ढाल-तलवार ! सारी लढाई जिंकायची, मैदान गाजवायचे, ते या दोन्हींच्या जिवावर. या संदर्भात केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर नि नानासाहेब फाटक ही तीन नावे ( तरुण पिढीला ऐकून तरी माहीत आहेत म्हणून ) पुरेशी बोलकी आहेत. इतरही अनेक आहेत; पण ती सारी याच गोलातली आहेत.

दात्यांची वाणी पल्लेदार नव्हती. ‘ महाराष्ट्र नाटक मंडळी ’त, ते उभे राहिले, तेव्हा टिपणीस, प्रधान, पराजपे ही सारी आवाज लावणारी नटमंडळी होती. म्हणूनच दाते मुद्राभिनयावर अधिक केंद्रित ( concentrate ) झाले. त्यांचा आदर्श होता नटश्रेष्ठ गणपतराव भागवत. आवाजाची उणीव त्यांनी मुद्राभिनयाने भरून काढली. केशवरावांच्या अनेक भूमिका गाजल्या. जयंत–प्रेमसंन्यास, कवीश्वर–खडाष्टक, गणोजी–बेबंदशाही, औरंगजेब–आग्र्याहून सुटका, राम–सवतीमत्सर, मनोहर–आंधळयांची शाळा अशा किती तरी. त्यांचा ‘कवीश्वर’ पाहून त्यांच्याबरोबर काम करण्याची इच्छा बालगंधर्वांनी मोकळेपणाने बोलून दाखविली होती; पण त्यांचे विशेष कौतुक झाले ते त्यांच्या सवतीमत्सर नाटकातल्या ‘ राम ’ या व्यक्तिरेखेचे ! दाते त्या धीरोदात्त भूमिकेच्या साऱ्या छटा इतक्या विलक्षण दाखवीत, की ते साक्षात रामच ( रामाचा अवतार ) वाटत. बालगंधर्वांनी त्यांचा राम पाहिला नि त्यांना अगदी भरून आलं ! प्रवेश संपताच ते आत गेले नि दात्यांना (रामाला) अगदी वाकून नमस्कार केला. ( केशवा लोटांगण नारायणाचे ) त्यांचा रामाच्या भूमिकेतला फोटो बालगंधर्व नेहमी जवळ ठेवीत. इतकेच काय दात्यांचा तो फोटो ‘ राम ’ म्हणून पूजेसाठी अनेकांच्या घरी देव्हाऱ्यात जाऊन बसला.

## □ पतिव्रतेची अब्रू घेतोस काय ?

राम गणेश गडकऱ्यांचे ‘पुण्यप्रभाव’ नाटक खूप गाजले. त्या नाटकाचा, विशेषतः ‘ वृंदावन ’च्या भूमिकेचा मोह भल्या भल्या नटांना पडला. पाच–सहा नाटकमंडळचा (गद्य नि संगीत ) या नाटकाचे सातत्याने प्रयोग करीत असत. मूळचे हे नाटक किर्लोस्कर संगीत मंडळीचे. नटश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर हे पहिले ( Original ) वृंदाबन ! किंबहुना गडकऱ्यांनी तो त्यांच्यासाठीच लिहिला होता त्या भूमिकेचे मर्म खुद्द गडकऱ्यांनी त्यांना समजावून दिले होते. त्यांनी सादर केलेला वृंदावन गडकऱ्यांना एकदम आवडला. पुण्यात पुण्यप्रभावचे अपूर्व स्वागत झाले.


नागपूरच्या मुक्कामात ओळीने दहा-बारा खेळ झाले. नागपूरकर प्रेक्षक नाटकावर निहायत खूष होते. ( नाही तर जरा काही खटकले, कमी पडले की, थिएटरात ‘ सीताकांत स्मरण जय जय राम ’च्या आरोळ्या आल्याच ) उलट गडकऱ्यांना एकदा नागपूरला आणा, आम्हाला त्यांना पहायचंय ’ म्हणून प्रेक्षक हट्ट धरून बसले होते. असाच एक दिवस पुण्यप्रभावचा प्रयोग सुरू होता. नाटक नेहमीसारखेच रंगले होते. शेवटी सहाव्या अंकातला वसुंधरा–वृंदावनचा प्रवेश सुरू झाला. हा प्रवेश म्हणजे या नाटकाची परिसीमा ! पातिव्रत्याचा पुण्यप्रभाव. वसुंधरेच्या पातिव्रत्यभंगासाठी नि तिच्या हातातला हार स्वीकारण्यासाठी ‘ हा पहा तुझा हात धरून या हाराचा स्वीकार करतो–’ असे म्हणत वृंदावन एक पाऊल पुढे टाकणार तोच प्रेक्षकात एकदम आरडाओरडा सुरू झाला. एक तगडा भय्या हातात काठी घेऊन स्टेजकडे धावत चालला होता. तोंडाने मोठ्यामोठ्याने बडबडत होता. लोक त्याला समजावीत होते, ‘ भय्या ठैरो सुनो तो सही ! ’ क्या सुनो क्या ? इतने लोगोंके सामने वो साला (वृंदावन) एक पतिवरताकी अब्रू लेगा ? उसे धमकाएगा ! ’ या भय्याला सात्त्विक संताप आला होता. याला म्हणतात अभिनय ! चिंतामणरावांचा ‘ घनःश्याम ’ (भावबंधन) पाहून, त्यांच्या एका मित्राने इतकी भीती घेतली होती की, तो स्वतः तर चिंतामणरावांच्या वाऱ्याला उभा रहात नसे; पण त्यांनी मा. दीनानाथ नि कोल्हापुरे यांना सुद्धा आपल्या सहकाऱ्यापासून (कोल्हटकर, दीनानाथ, नि कोल्हापुरे हे तिघे ‘ बलवंत संगीत मंडळी ’चे मालक होते ) जपून रहा असे बजावले होते.

रसिकहो, ही आपल्या रंगभूमीची परंपरा. आजच्या मंदिराच्या कळसाखालचे पायाचे दगड. मंदिराच्या ‘ नामदेव ’ पायऱ्या !

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW-28


# फॅब धुलाई नजरेत भरते...





# फॅब धुलाई दरवळत राहते!





## नवीन लेमन फॅब

## बोरॅक्स युक्त

## डिटर्जंट वडी




आता आपल्यासाठी भारतात प्रथमच!
लेमन बोरॅक्सचा प्रभावी फॉर्म्युला या डिटर्जंट वडीमधे.
लेमन फॅब बोरॅक्स युक्त डिटर्जंट वडीमधील धुलाईची शक्ती इतर कोणत्याही साधारण वडी पेक्षा अधिक जास्त आहे.
फॅबचा खोलवर मुरणारा फेस अगदी तेलकट आणि चिवट डाग सुद्धा साफ धुवून टाकतो. कपडे अधिक शुभ्र-चमकदार आणि खरोखरच स्वच्छ धुतले जातात.
फॅब धुलाई नजरेत भरते...
फॅब धुलाई दरवळत राहते!

**नवीन लेमन फॅब बोरॅक्स युक्त. स्वच्छ धुलाईसाठी साधारण वडी पेक्षा अधिक शक्तिशाली!**

कोलगेट– पामऑलिव्हचे दर्जेदार उत्पादन

फक्त महाराष्ट्र राज्यात उपलब्ध.

GKGE.B.84.2 Mar.